
# भारत दर्शन : ६

# जीवनाचा काव्योत्सर्ग

काका कालेलकर



१२८०

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू. प्रवास
सं. क्र. ४८८

REFBK-0018129
REFBK-0018129

७५७६३
२१।३।७१
४८७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

भारत दर्शन : ६

# जीवनाचा कायोत्सर्ग

लेखक :

काकासाहेब कालेलकर

७५७७३ मेप्रवास

२१।३।६७

REFBK-0018129

REFBK-0018129

दा. क्र. १८१२८

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २

श्री.: ६५५ [ ३-७० ]

★ ★

© १९७० : काका कालेलकर

★ ★

आवृत्ति पहिली :
शके १८९१; सन १९७०

★ ★

मूल्य रु. २-००

★ ★

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.
३, राउण्ड बिल्डिंग, मुंबई २–यांचेकरितां

★ ★

मुद्रक :
य. गो. जोशी, बी. ए.
आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणें ३०

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| * | प्रास्तावना | ६ |
| * | थोडसं हितगुज | ११ |
| १. | पूर्वतयारी | १३ |
| २. | तयारी | १५ |
| ३. | निरोप | १७ |
| ४. | सुरवात | १९ |
| ५. | नर्मदेच्या परिसरात | २२ |
| ६. | संबळपूरपर्यंत | २८ |
| ७. | अवखळ महानदी आणि हिराकुड | २९ |
| ८. | जमशेटपूर | ३८ |
| ९. | टेल्को आणि टिस्को | ४४ |
| १०. | हुगळी नदीतीरी | ६२ |
| ११. | मोकामे | ९२ |
| १२. | हे विश्वेश्वरा ! विश्वनाथा !! | १०० |
| १३. | त्रिवेणी संगम | ११९ |
| १४. | अकबराबाद ? आता आग्रा | १३१ |
| १५. | अकबराची भोसाडवाडी ' फत्तेपूर शिक्री ' | १८५ |
| १६. | भारताच्या राजधानीत | २०२ |
| १७. | कोरीकरकरीत नगरी | २३६ |
| १८. | सतलज आणि भाक्रा–नांगल | २४३ |
| १९. | हरिद्वार–ऋषिकेश | २४९ |
| २०. | डेहराडून आणि चक्राता | २६० |
| २१. | काय आणलं ? | २७४ |

# प्रस्तावना

प्रवास करणे, प्रवास विषयक गप्पा ऐकणे, प्रवास वर्णने वाचणे आणि प्रवासवर्णने लिहिणे, या गोष्टी माणसाला फार प्रिय आहेत. याचे कारण बहुधा अज्ञाताविषयीची ओढ आणि अनुवंशिक संस्कार असावेत असे वाटते. या पृथ्वीवरील पहिला मानव भटक्याचे जीवन जगत होता. उपजीविकेसाठी आणि शत्रूपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी त्याला ते जीवन पत्करावे लागलेले होते. माणसाने आजपर्यंत केलेली प्रगति त्याच्या भटक्या जीवनाचेच फळ आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही.

व्यवसाय म्हणून नव्हे तर प्रवासाचा छंद ज्याला आहे तो खरा रसिक माणूस. खरोखरच तो छंद असतो, ते एक वेड असते. या वेडाचे एक गमतीचे उदाहरण मला आता आठवते.

माझ्या ओळखीचे एक तरूण गृहस्थ आहेत. त्यांना प्रवास करण्याचे जणू व्यसनच जडलेले आहे. त्यांची नोकरी सामान्य आणि घरची स्थिती बेताची असून देखील त्या पतिपत्नींनी भारताचा जवळ जवळ संपूर्ण प्रवास पूर्ण करीत आणला आहे.

एकदा त्यांच्याशी मी गप्पा मारीत बसलो असता मी त्यांना सहज विचारले,–' तुम्हाला प्रवास करणे आणि तेहि नवरा–बायकोनी मिळून प्रवास रणे कसे शक्य होते ? ' माझ्या प्रश्नावर ते गृहस्थ हसले आणि म्हणाले, या बाबतीत पहिली सुरवात कशी केली ती सांगतो ! '

आणि त्यांनी प्रवासाच्या बाबतीतील आपला पहिला अनुभव सांगितला, सारांश असा !

# अ नु क्र म

प्र स्ता व ना

मस्तीचें ध्यान ५

प्रथम पाद :

जोगचा धबधबा ६

द्वितीय पाद :

जोगचें पुनर्दर्शन २३

तृतीय पाद :

जोगचा कोरडा धबधबा ३१

चतुर्थ पाद :

उंचळ्ळीचा धबधबा ३६

पंचम पाद :

धुवांधार ४२

षष्ठ पाद :

सहस्रधारा ४७

सप्तम पाद :

गुच्छुपाणी ५२

अष्टम पाद :

वेळगंगा आणि सीतानहाणी ५९

नवम पाद :

केचूरचा धबधबा ६२

दशम पाद :

नायगराचा धबधबा ७१

# मस्तीचें ध्यान

" माझ्या शरीराचें काहींहि होवो. मला त्याची पर्वा नाहीं, असें म्हणून स्वतःच्या शरीराविषयीं उदासीन होऊन जणुं त्याला सोडून देणें, टाकून देणें " अशा मनोवृत्तीला कायोत्सर्ग म्हणतात. ( जैन लोकांच्या साधनेपैकीं हें त्यांचें एक व्रत आहे ) नदी वहात असतांना दोन्ही कांठांमधून वहात वहात ती उंचीवरून सखल सपाटी शोधत असते. तिच्या या अशा निम्न गतीमध्यें एखादे वेळीं कड्याच्या शिखरावरून तिला खालीं पडावें लागतें. कड्याची ही खोली किती का भयानक असेना, नदीच्या प्रवाहाला वरून खालीं उडी ठोकतांना स्वतःच्या जीवना-विषयीं कांहींच पर्वा नसते. नदीचें पाणी वरून वहात वहात येतें आणि एकदम वरून खालीं पडावें लागणार असें दिसतांच, कसलाहि विचार न करतां तें स्वतःला वरून खालीं झोकून देतें. उंची किती आहे; खालीं एखाद्या खडकावर पडावें लागणार, का तेथें एखादा तलाव असणार ? याचा कसलाच विचार न करतां आणि खडकाच्या डोक्यावर आपटून स्वतःच्या चिंधड्या होणार आहेत याचीहि क्षिति न बाळगतां धबधबा स्वतःचें जीवनसर्वस्व वरून खालीं सोडून देतो. नदीच्या या जीवन-व्रताला जीवनाचा कायोत्सर्ग म्हटलें तर ते अनाठायीं होणार नाहीं.

नदीच्या कायोत्सर्गाला आपण धबधबा म्हणतों. संस्कृतमध्यें याला प्रपात म्हणतात. गुजरातीमध्यें धोध असें नांव आहे. हिंदीमध्यें धबधब्याला सामान्य लोक काय म्हणतात ठाऊक नाहीं. भेडाघाटजवळ नर्मदेच्या प्रवाहाचा एक छोटासा धबधबा आहे. तेथें पाण्याच्या प्रवा-हाची धार खालीं जोरानें आपटून तिचे तुषार वर उडतात; आणि खेळकर वारा त्या तुषारांचें दंव किंवा धुकें बनवून सगळी खिंड भरून टाकतो. म्हणून तिकडच्या लोकांनीं त्या प्रपाताचें नांव ठेवलें आहे ' धुवांधार. ' जर त्यांनीं त्याला ' धारधुँवा ' म्हटलें असतें ( पाण्याच्या धारेंतून उत्पन्न होणारें धुकें ) तर तें अधिक अन्वर्थक झालें असतें !

पाण्याची जीवनलीला कोणत्याहि स्वरूपांत मनोहर असतेच. मग तो एखादा झरा असो, लहान-मोठी नदी असो, प्रपात असो कीं सरोवर असो. त्यांचें दर्शन रमणीय असलेंच पाहिजे. तलाव आणि सरोवरें ध्यानस्थ मुनीप्रमाणें शांत प्रसन्नपणें, आसपासच्या पहाडांचें आणि झाडाझुडुपांचें प्रतिबिंब आपल्यामध्यें पाडतात; आणि आकाशांतील ढगांचा खेळकरपणाहि आरशाप्रमाणें आपल्यासमोर धरतात. पण जेव्हां सरोवराचा समुद्र होतो तेव्हां त्याला तालबद्ध भरती ओहोटीचें व्रत पाळावें लागतें. आणि समुद्राचा जीवन-विस्तार पाहून वाऱ्याला जेव्हां मस्ती चढते तेव्हां तो समुद्राला जोराचें पाचारण करतो आणि मग समुद्रावर पहाडासारख्या मोठ्या मोठ्या लाटांचें तांडव सुरू होतें. आग-बोटीतून अशा तांडवाची भयंकर लीला पाहिली तर तें भगवंताचें लोक–क्षयकारी विभुति-दर्शनच भासतें ! ज्यांना असें प्रलयंकर तांडव पहायला मिळालें असेल त्यांनाच त्या रुद्र अवताराच्या साक्षात्काराची धन्यता समजणार !

येथें आपण फक्त कायोत्सर्ग करणाऱ्या प्रपाताच्या दर्शनाचा विचार विचार करीत आहोंत.

धब–धब, धब-धब, धब करीत पडणाऱ्या त्या जलप्रपाताचें टक लावून ध्यान धरणें हा खरोखर एक असाधारण अनुभव असतो. प्रत्येक ठिकाणीं मीं याचा अनुभव घेतला आहे; आणि त्याचा उन्मादहि मला ठाऊक आहे. पण जोंवर माझी आत्म्यासंबंधींची कल्पना शांत सरोवरा-सारखी होती तोंवर मला प्रपाताच्या ध्यानांतून समाधिसुख मिळणें शक्य नव्हतें. मला वाटे कीं आत्मा अनंत आणि परिपूर्ण असल्यामुळें त्याच्यामध्यें गतीला अवकाशच नसावा. सर्व कांहीं शांत, स्थिर आणि मंगलमय असावें.

पुढें माझी मांगल्याविषयींची कल्पना बदलली. आत्मतत्त्व पूर्ण असल्यानें त्याच्यामागें प्रगतीचें शुल्ककाष्ठ नसावें हें खरें असलें तरी ‘ आत्मतत्त्व हृदयामध्यें संस्फुरत असतें ’ याचा अनुभव झाल्याबरोबर हास्य आणि तांडव हा भेदहि विरून गेला आणि आत्मतत्त्वाचा साक्षात्कार सरोवरांत आणि समुद्रांत जसा एकाच प्रकारें होऊं लागला

त्याचप्रमाणें आकाशांतील ढगांमध्यें आणि नदीच्या प्रपातामध्यें आत्म्याचें समानस्वरूप मीं पाहूं लागलों, अनुभवूं लागलों. आणि आतां तर समुद्रांतील प्रलयकारी तुफान असो किंवा नायगरा आणि जोगच्या प्रपातांची अखंड लीला असो, दोन्ही ठिकाणीं आत्मतत्त्वाचें सारखेंच दर्शन होऊन त्या दर्शनांत मीं ध्यानमग्न होऊं शकतों.

परवां परवां जबलपूरला जाऊन भेडाघाटकडील नर्मदेचें दर्शन घेतलें आणि ज्या ठिकाणीं पूर्वी धुवांधारचें दर्शन घडतांच मीं उन्मत्त होत असें त्याच ठिकाणीं आसन मांडून ध्यानाला बसलों; आणि या खेपेला निराळाच अनुभव झाल्यानें एक नवी धन्यता अनुभवूं शकलों.

प्रपाताच्या दर्शनाचीं दहा शब्दचित्रें व त्यांचा आनंद या लेख-संग्रहांत व्यक्त झाला आहे. धुवांधाराच्या परवांच्या दर्शनानें आणि ध्यानानें जो एक निराळाच आनंद अनुभवायला मिळाला त्यामुळें हीं जुनीं सर्व वर्णनें मीं नव्याच प्रकारानें आठवूं लागलों आहें. कायोत्सर्गाची ही महती आहे यांत शंका नाहीं.

आशा करतों कीं, वाचकाच्या मनांत देखील हें पुस्तक वाचून दोन्ही प्रकारच्या आनंदाची अपेक्षा जागृत होईल!

महाशिवरात्री
६-३-७० —काका कालेलकर
राजघाट, नवी दिल्ली

( शुद्धिपत्र : सहाव्या प्रकरणाला षष्ठम-पाद ऐवजीं षष्ठपाद असें आणि दहाव्या प्रकरणाला दशम-पाद ऐवजीं दशमपाद वाचावें. )

# जोगचा धबधबा

अगदीं लहानपणापासून, कारवारला प्रथम होतों त्या वेळेपासून, गिरसप्पाविषयीं ऐकलें होतें. यावेळीं ऐकलें होतें कीं कावेरी नदी पहाडावरून खालीं पडते आणि त्याचा इतका मोठा आवाज होतो कीं दोन मैलांवर रचून ठेवलेली घागरींची उतरंड देखील त्या हवेच्या धक्क्यानें कोसळून पडेल. मग त्या धबधब्याचा आवाज कुठवर पोंचत असेल कल्पना करा! मागाहून जेव्हां भूगोल शिकलों त्यावेळीं मनांत शंका आली कीं, कावेरी तर थेट कुर्गमधें उगम पावून पूर्वसमुद्राला जाऊन मिळते. ती पश्चिम घाटाच्या पहाडावरून खालीं पडणें शक्यच नाहीं. तर मग गिरसप्प्याच्या रूपानें पडते ती नदी दुसरीच असली पाहिजे. तिला शक्य तितक्या त्वरेनें होन्नावरजवळच पश्चिम समुद्राची भेट घ्यायची होती. म्हणूनच तर सव्वाशें दीडशें पुरुष उंचीवरून तिनें धाडकन् उडी टाकली आहे. त्या नदीचें नांव काय?

नायगऱ्याच्या धबधब्याचीं कितीतरी वर्णनें माझ्या वाचनांत आलीं होतीं. प्रकृतिमातेनें अमेरिकेला बहाल केलेला तो एक अद्भुत अलंकार आहे, साऱ्या दुनियेभरचे लोक त्याची यात्रा करण्यासाठीं जातात, मोठ्या मजबूत पिंपांत बसून त्या धबधब्यांतून पार होण्याचे कित्येक लोकांनीं प्रयत्न केले आहेत, वगैरे वर्णनें जसजशीं अधिक वाचावीं तसतसें कुतूहल वाढतच जाई. निरनिराळ्या बाजूंनीं घेतलेलीं चित्रें आणि अक्षिपट (Bioscopes) नायगऱ्याला डोळ्यांसमोर मूर्तिमंत करूं लागले. जसजसें नायगऱ्याचें अप्रत्यक्ष दर्शन याप्रमाणें वाढूं लागलें तसतशी लहानपणीं ऐकलेल्या त्या गिरसप्पाच्या धबधब्याची मानसपूजाहि वाढूं लागली. पुढें जेव्हां कळलें कीं नायगरा तर फक्त १६४ फूट उंचीवरून खालीं पडतो आणि गिरसप्पाची उंची आहे ९६० फूट, तेव्हां तर माझ्या अभिमानाला पारावार उरला नाहीं. सर्वांत मुख्य आणि जगांतील सर्वांत उंच पर्वत हिंदुस्थानांत आहे; सिंधु, गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांच्यासारख्या नद्यांचा कोठल्याहि देशाला अभिमान वाटावा. सर्वांत लांब नदी आपल्याच येथें आहे हें सिद्ध करण्यासाठीं अमेरिकेला दोन नद्यांच्या लांबीची बेरीज करावी लागली आहे. मिसोरी आणि मिसिसिपी यांची वेगवेगळी गणना केली

तर त्यांची लांबी कितीशी होईल? ज्याप्रमाणें हिंदुस्थानचा इतिहास पृथ्वीतळावरील जुन्यांतला जुना इतिहास होय, त्याचप्रमाणें हिंदुस्थानची भूरचना देखील साऱ्या जगांत अद्भुत आहे.

मग हिन्दुस्थान काय एका धबधब्याच्या बाबतींतच हार खाईल? साऱ्या जगानें मान्य केलें आहे कीं अशोकासारखा दुसरा सम्राट इतिहासकालांत झाला नाहीं. भूगोलांतहि लोकांनीं कबूल केलें पाहिजे कीं मन्यतेंत गिरसप्प्याच्या ( त्याचें खरें नांव जोग आहे ) पंक्तीला बसूं शकेल असा एकहि धबधबा नाहीं.

कारकळ राजकीय परिषदेसाठीं दक्षिण कर्नाटकांत गेलों होतों, त्यावेळीं आशा वाटली होती कीं अगुंबा घाट चढून शिमोग्याहून गिरसप्पा पहाण्यास जाईन. पण त्यावेळीं तसें होऊं शकलें नाहीं.

मनसा चिन्तितं कार्यं दैवेनान्यत्र नीयते !

निराशेच्या भरांत मीं मानून घेतलें कीं ती चिरसंचित आशा शेवटीं कायमची वंचित झाली आणि आतां गिरसप्पाचें दर्शन करायचें झालें तर तें ध्यानाच्या द्वाराच करणें भाग आहे.

पण एवढें मात्र जाणून घेतलें होतें कीं जोग म्हैसूर संस्थानाच्या सरहद्दीवर आहे. तेथें जाण्याचे दोन रस्ते आहेत. वरचा रस्ता शिमोगा, सागरावरून आणि दुसरा मुखाकडचा. त्यासाठीं होन्नावर बंदरावरून होडींत बसून जंगलें पार करून गिरसप्पा गांवापर्यंत जावयाचें आणि तेथून घाट चढावयाचा. दोन्ही रस्त्यांनीं जाऊन आलेल्या लोकांचें सांगणें आहे कीं एका बाजूची शोभा दुसरीकडे मिळायची नाहीं, एकीपेक्षां दुसरी उतरती आहे असें तर मुळींच म्हणतां येणार नाहीं. एका रस्त्यानें जाऊन आलों आणि दुसऱ्या बाजूचा मात्र साक्षात् अनुभव घेतला नाहीं तोंपर्यंत मला कबूल करणें भाग आहे कीं जोगाचें मीं अर्धेंच दर्शन घेतलें आहे.

गुजरात महापुराच्या संकटांत सांपडला होता त्याच सुमारास गांधीजी आपले आजारपणाचे दिवस बंगलोरमध्यें घालवीत होते. मीं त्यांना भेटायला गेलों होतों. तेथून फिरत फिरत गांधीजी सागरापर्यंत पोहोंचले. बरोबर श्री. गंगाधरराव आणि राजगोपालाचारी होते. सागरला गेल्यानंतर गिरसप्पा बघायला न जाणें तर मला अगदीं अशक्य होतें. मोटारीनें एकाच तासाचा

रस्ता. शिमोग्याला तुंगेच्या तीरावर फिरावयास गेलों असतां मी गांधीजींना आग्रह केला होता कीं, 'आपण गिरसप्पा पाहण्यास कां चलत नाहीं? लॉर्ड कर्झन केवळ गिरसप्पा पाहण्यासाठीं म्हणून खास या बाजूस आले होते. या बाजूला येणें पुनः सहजासहजीं थोडेंच होणार आहे?' गांधीजी म्हणाले, 'मला तेवढासुद्धां स्वच्छंद करतां येणार नाहीं, तुम्ही अवश्य जा. तुम्ही बघून याल तर विद्यार्थ्यांना एखादा भूगोलाचा धडा तरी शिकवाल.' मीं पुन्हा युक्तिवाद केला, 'या जगांतील हें एक अद्भुत दृश्य आहे. नायगऱ्यापेक्षां जोग सहापट उंच आहे, ९६० फुटांवरून पाणी खालीं पडतें. आपण एकदां तरी तो पाहिलाच पाहिजे.'

'पावसाचें पाणी आकाशांतून पडतें, तें किती उंचीवरून पडतें?' मी हरलों. मनांत म्हटलें, 'स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत् किम्।'

मला ठाऊक होतें कीं गांधीजींना संगीताप्रमाणें सृष्टिसौंदर्याचीहि अतिशय आवड आहे. फिरायला गेलों असतां सूर्यास्ताच्या शोभेकडे किंवा ढगांमधून डोकावणाऱ्या एखाद्या एकाकी चांदणीच्या शोभेकडे त्यांनीं कधींच माझें लक्ष वेधलें नव्हतें असें नाहीं, पण जनतेच्या सेवेसाठीं म्हणून निघालेले गांधीजींसारखे सेवक महात्मे स्वच्छंद कसा करतील?

कुलशिखरिणः क्षुद्रा नैते न वा जलराशयः।

ही एक गोष्ट अशी निकालांत निघाल्यावर मीं दुसरी गोष्ट पुढें केली. 'आपण येत नाहीं म्हटल्यावर महादेवभाई देखील येत नाहींत. आपण त्यांना सांगाल तरच ते येतील.'

'महादेवाची इच्छा असेल तर त्यानें खुशाल तुमच्याबरोबर जावें; माझी ना नाहीं. पण तो येणार नाहीं. मीच त्याचा गिरसप्पा आहें.'

बाकीचे आम्ही पडलों लौकिक आदर्शाला भजणारे. चर्मचक्षूंनीं पहाडावरून पडणारा धबधबा पाहिल्याशिवाय आमचें समाधान होण्यासारखें नव्हतें. म्हणून जेवणापूर्वीच आम्ही सागरहून निघालों आणि मोटारीच्या मदतीनें अरण्याचा मार्ग कापीत सुटलों. डोंगर पोखरून रेल्वेवाले जेव्हां बोगदा तयार करतात तेव्हां आपल्याला फार आश्चर्य वाटतें. पण मुंबईच्या वस्तीहूनहि अधिक भरगच्च अशा सह्याद्रीच्या जंगलामधून रस्ता तयार करणें हें त्यापेक्षांहि अधिक अवघड काम आहे. येथें तुमचा डायनामाइट (सुरुंग) उपयोगाचा नाहीं. बुंधा कापल्यानंतर

सुद्धां एक एक झाड फांद्यांच्या जाळ्यांतून मोकळें करण्याचें काम हिन्दु-मुसलमानांचीं भांडणें मिटविण्याइतकेंच कठीण आहे. खंडाळ्याच्या घाटांतील खोल बोगद्यांत मध्यभागीं पोंचल्यावर जी एक भयानक रमणीयता मनुष्याच्या अनुभवास येते तशीच नेमकी या जंगलांतहि अनुभवतां येते. अशा जंगलांत शोभतील असे प्राणी म्हणजे हत्ती, वाघ आणि अजगर. त्यांत माणूस इतका कांहीं क्षुद्र प्राणी भासतो, कीं हा येथें कसा काय आला असेंच वाटतें.

असो. जंगल पार करून आम्ही शरावतीच्या किनारीं आलों. या बाजूस तिला भारंगी असेंहि म्हणतात. भारंगी म्हणजे बारगंगे. गंगानदीपेक्षां या नदीचें माहात्म्य बारापट आहे असें येथले लोक मानत असतील तर आपण त्यांच्याशीं हुज्जत घालीत बसणार नाहीं. प्रत्येक मुलाला आपली आईच सर्वश्रेष्ठ वाटणार ;

पाऊस झिमझिम पडत होता. येथें गगनभेदी महावृक्षहि होते आणि लहान-मोठीं झाडेंझुडपें देखील होतीं; अमर गवतहि होतें आणि जमिनीवर तसेंच झाडांच्या जून सालींवर उगवणारें शेवाळ देखील होतें. पैलतीरावर लहानमोठीं झाडें नदीचें पाणी कितीसें गार आहे किंवा खोल आहे तें अजमावण्यासाठीं आपले पानाळ हात पाण्यांत बुडवीत होतीं आणि धुक्याचे कित्येक ढग वसू सोडलेल्या आळशी पोळाप्रमाणें इकडेतिकडे रेंगाळत होते.

नदी पाहिली रे पाहिली कीं मनांत प्रश्नचिह्न उगवतें कीं ही नदी आली कोठून आणि जाते कोठें ? माझ्या मनांत तर नेहमीं नदी आली कोठून हा सवालच प्रथम उठतो. पुष्कळांचें देखील असेंच होत असेल. याचें कारण काय ? नदी कोठें जाते हें शोधून काढणें सोपें आहे. नदीच्या हवालीं स्वतःला केलें कीं ती आपल्याला अनायासें आपल्या सोबत घेऊन जाते. इतकी हिंमत नसेल तर एखादें झाडाचें खोड पोखरून त्या नावेंत बसलें कीं पुरे. पण नदी कोठून आली हें शोधून काढण्यासाठीं उलट दिशेनें जावें लागतें. तें काम ऋषीच करूं शकतात. भारंगीचें अथवा शरावतीचें पाणी पहाडांतून येत आहे कीं ढगांतून अशी शंका उत्पन्न होण्यासारखें त्या दिवशींचें दृश्य होतें.

होडींत बसून आम्ही पैलतीरीं गेलों. कांठावरच्या जमिनींतून कितीतरी बालनिर्झर उड्या मारीत मारीत नदींत पडत होते. त्यावरून आम्ही सहजच अनुमान काढूं शकलों कीं आधल्या दिवशीं चांगलाच पाऊस पडून नदीचें पाणी खूप वाढलें होतें. आज तें जवळ जवळ पांच फूट उतरलें होतें. होडी आम्हांला

खालीं उतरवून उरलेल्या लोकांना आणण्यासाठीं परत गेली. शांत पाण्यावर वल्ह्यांचा डब डब आवाज करीत होडीची ये-जा चालते, ती पहातांना किती मौज वाटते ! आणि आपल्या प्रियजनांना स्वतःच्या पोटांत स्थान देऊन होडी जेव्हां खोल पाण्याच्या पृष्ठभागावरून त्यांना वाहून आणीत असते, तेव्हां चिंतेचें कांहीं कारण नसतांहि मनाला भीति वाटल्यावांचून रहात नाहीं. राजगोपालाचार्य आपल्या मुलाला व मुलीला घेऊन होडींत बसत होते, तेव्हां मी म्हणालों, कीं एका कुटुंबांतील सर्वच लोक एकाच वेळीं एका होडींत बसणें योग्य नाहीं असें आपल्या पूर्वजांनीं सांगितलें आहे. एक तर पित्यानें आमच्याबरोबर यावें नाहींतर मुलानें; दोघांनीं एकदम येऊं नये. सोबतचे लोक या चालीची चर्चा करूं लागले. कुणाला यांत प्रतिष्ठेचा दर्प आला तर कुणाला दुसरेंच कांहीं सुचलें. सर्वनाशाचा संभव टाळण्यासाठीं हा नियम आहे इतकी साधी गोष्टहि कुणाच्या ध्यानांत आली नाहीं. तो अर्थ स्पष्ट करून वातावरण विषण्ण करण्याची माझी इच्छा नव्हती. म्हणून पूर्वजांची निंदा ऐकत ऐकत मी पैलतीराला पोहोंचलों. होडी ' मंझधार ' ( प्रवाहाच्या मध्यावर ) पोंचली तेव्हां मंत्र उच्चारून आचमन करण्याचें मीं विसरलों नाहीं. नदीच्या दर्शनाबरोबर स्नान, पान आणि दान हे विधि झालेच पाहिजेत, तरच नदीचा संपूर्ण साक्षात्कार करून घेतला असें म्हणतां येईल.

दुसरी तुकडी येऊन पोंचली आणि उजवीकडील रस्त्यानें आम्ही निघालों. नदीचा तो डावा कांठ होता. रस्त्यावरील झाडें मशिदीच्या खांबांप्रमाणें सरळ उंच जात असलेलीं पाहून आम्हांला आनंद वाटला. आमची टोळी इतकी मोठी होती कीं त्या निर्जन अरण्यांत बघतां बघतां आमचे गप्पाविनोद आणि आमचें सात मजली हसणें यांनीं वातावरण गजबजून गेलें. पण तें देखील किती वेळ ! आम्ही थोडे दूर गेलों आणि नदीनें आपला गंभीर ध्वनि सुरू केला. त्या आवाजाला कशाची उपमा द्यावी ? इतका गंभीर आवाज दुसरा ऐकला असेल तर ना ? मेघगर्जना गंभीर असते खरी आणि ती सारें आकाश व्यापून टाकते हेंहि खरें, पण ती सतत टिकत नाहीं. येथें तुम्ही ऐकून ऐकून थकलांत तरी आवाज कांहीं थांबायचा नाहीं. येथें काय ढग कोसळत आहेत; तोफा उडत आहेत; पहाडावरील मोठमोठ्या शिळांच्या लाह्या फुटत आहेत; कीं नदी आपलें ध्यान मौन सोडून महारुद्राचा स्तवराज गात आहे ?

'आतां कसला देखावा असेल ?' 'आतां कसलें दृश्य नजरेसमोर येईल ?' अशा कुतुहलानें डोळे फाडून चहूंकडे पहात पहात आम्ही मुसाफरखान्यापर्यंत पोहोंचलों. येथून धबधब्याचें दर्शन सर्वांत उत्तम प्रकारें करतां येतें. त्याच ठिकाणीं म्हैसूर सरकारकडून ही अतिथिशाळा बांधण्यांत आली आहे. जेथून निरीक्षण करावयाचें त्या चबुतऱ्यावर आम्ही जाऊन पोहोंचलों.

पण काय ? सर्वव्यापी धुक्याशिवाय कांहींच दिसेना; आणि धबधबा तर गंभीर आवाजानें सारी दरी दणाणून टाकीत होता. भर दुपारीं सुद्धां सूर्याचें दर्शन होत नव्हतें. जिकडे पहावें तिकडे धुकें, धुकें आणि धुकें ! धुक्याचे लोटावर लोट जणूं काय कुरुक्षेत्रावरली महायुद्धाची दंगल माजवीत आहेत आणि जोग त्याला आपल्या तालाचा ' जोग ' ( योग-साथ ) देत आहे. इतक्या आशेनें येऊन अशा प्रकारची फजिती पूर्वीं कधींहि आमच्या वांट्याला आली नव्हती. मिनिटांमागून मिनिटें धांवत होतीं आणि आमच्या निराशेबरोबर धुकेंहि वाढतच होतें. शेवटीं मौन सोडून आम्ही आपापसांत गोष्टी करूं लागलों. गोष्टींसाठीं खास विषय होता असें नाहीं. पण निराशेची पोकळी भरून काढण्यासाठीं कांहींतरी हवें होतें, इतकेंच.

इंद्रदेव कोपला आहे कीं, वरुणदेव रुसला आहे याचा मी विचार करीत होतों, इतक्यांत वायुदेव मदतीस धांवून आला आणि एका क्षणासाठीं फक्त एकाच क्षणासाठीं—धुक्याचा तो जाड पडदा दूर झाला आणि जन्मभर ज्याची तळमळ लागून राहिली होती तें अद्‌भुत दृश्य एकदांचें आणि तेंहि एकाएकीं नजरेस पडलें ! महादेवाच्या मस्तकावर गंगा अवतरावी तसा एक मोठा धबधबा खालच्या कड्यांतून बाहेर पडलेल्या हत्तीसारखा खडकावर पडून, पाण्याचा चक्काचूर करीत दशदिशांना त्याचे सर उधळीत होता.

छे ! त्या दृश्याचें वर्णनच करतां येणार नाहीं. आश्चर्यमुग्ध होऊन मी उद्‌गारलों :

> नमः पुरस्तात्, अथ पृष्ठतस् ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व !
> अनन्त–वीर्यामित–विक्रमस् त्वम् सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥

लगेच समोरचा हत्तीएवढा दगड डोक्यावरील धबधब्याच्या जटा उडवीत म्हणाला :

सुदुर्दर्शं इदं रूपं दृष्टवान् असि यन् मम ।
देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शन-काङ्क्षिणः॥

धुक्याचा पडदा पुनः पहिल्याप्रमाणेंच पसरला आणि मग आम्हीं पाहिलें तें स्वप्न होतें कीं माया होती कीं मतिभ्रम होता अशी आमची स्थिति होऊन गेली ! एवढी विस्तीर्ण दरी, तें रुंद पात्र, ती भयानक खोली आणि त्याच्यामधें पाण्याचा नव्हे तर पिठाचा–छे, मैद्याचा–तो अद्‌भुत धबधबा : सारें दृश्य कल्पनातीत होतें. आपण साध्या डोळ्यांनीं पहात आहोंत तें सारें खरोखरीचें आहे अशी प्रतीति दृढ होण्यापूर्वीच धुक्याचा क्षीरसागर पुनः पसरला आणि समोरच्या काव्यासमवेत आम्हीहि त्यांत बुडून गेलों.

आतां कुणी कुणाशीं बोलत नव्हते. जें पाहिलें त्याच्याच विचारांत सारे गढून गेले. कांहींच नव्हतें त्यांतून एवढी उंच व खोल सृष्टि कोठून अस्तित्वांत आली आणि पहातां पहातां पुनः कोठें अदृश्य झाली याच आश्चर्यानें आम्हांला वेढून टाकलें.

मनांत आलें कीं एक क्षण तर एक क्षण, पण जें पहाण्यास आलों तें पाहिलें, विलक्षण रीतीनें पाहिलें. त्या क्षणजीवी दर्शनाचें स्मरण व ध्यान करण्यांत वाटेल तेव्हां घटकामागून घटका घालवितां येतील.

इतक्यांत तो शुभ्र जटाधारी खडक पुन्हा निनादला :

व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस् त्वं तदेव मे रूपम् इदं प्रपश्य ॥

धुक्याचें पटल पुन्हां दूर झालें आणि आतां या टोकापासून त्या टोकापर्यंत सगळेंच स्पष्ट दिसूं लागलें. समोरून थेट डाव्या टोकाला राजा धबधबा अर्धचंद्राकार शिळेवरून खालीं उडी घेत होता. त्याचें पाणी पावसाळ्याच्या चिखलामुळें कॉफीच्या रंगाचें बनलें होतें. जास्तींत जास्त पाणी या राजालाच मिळतें. छाती फुलवीत फुलवीत जेव्हां तो तीरासारखा सरळ खालीं पडतो तेव्हां निसर्गाची शक्ति किती अपरिमित आहे याची कल्पना येते. राजा धबधब्याचा विस्तारहि कांहीं लहानसहान नाहीं; आणि त्याच्या दोन्ही अंगांस मोठमोठ्या मोत्यांचे कितीतरी सर लटकत धांवत असतात. खरोखरच हा धबधबा राजा नांवाला पात्र आहे.

सर्वप्रथम ज्याचें दर्शन मला झालें होतें तो त्याच्या बाजूचा धबधबा खरें पहातां तिसरा होता. त्याचें नांव वीरभद्र. मधला एक धबधबा रुद्र या बाजूनें

स्पष्ट दिसतच नाहीं. तो पायरीपायरीवर गर्जना करीत करीत शेवटीं राजांत मिसळून जातो.

थेट उजव्या बाजूस लहानसा धबधबा आहे. त्याची कंबर कांहींशी बारीक आहे. म्हणून त्याचें नांव मीं पार्वती ठेवलें. डोळे भरभरून पाहिल्यानंतर आमच्या गोष्टी पुन्हां सुरू झाल्या. आपण जें पाहिलें तें दुसऱ्याला दाखविण्याची ज्याला हौस नाहीं तो मनुष्य, मनुष्यच नव्हे. मनुष्य संचारशील आहे, संवाद-शील आहे. आपण जें अनुभवलें, तेंच दुसरेदेखील अनुभवतात–अनुभवूं शकतात–याची खात्री करून घेतल्यावांचून त्याला परम संतोष होत नाहीं. राजाजींनीं लक्ष वेधलें, 'इकडे खालीं तर पहा! या थंड वाफेचे लोळच्या लोळ कसे वर उसळून येत आहेत!' देवदास म्हणाला, 'ते पक्षी पहा! कसे निर्भयपणें उडत आहेत!' मणिबेननीं अशीच कांहींतरी पुस्ती जोडली. आणि लक्ष्मीनें आपल्या अण्णाला तामिळ भाषेंत बरेंच कांहींतरी समजावून आपला आनंद व्यक्त केला. आमच्याबरोबर एक गृहस्थ होते ते वाटेंत विनाकारण चिडले होते. आम्हीं जेव्हां या स्वर्गीय दृश्याच्या आनंदानें अगदीं वेडावून गेलों होतों तेव्हां त्या गृहस्थांना आपल्या मानून घेतलेल्या अपमानाचेंच रवंथ करीत बसायचें होतें. चंद्रशंकरनें त्यांच्या या अवस्थेकडे माझें लक्ष वेधलें. मी मनांत म्हणालों—

पत्रं नैव यदा करीर-विटपे दोषो वसंतस्य किम् ?
नोलूकोप्यलोकते यदि दिवा सूर्यस्य किं दूषणम् ?

निराशा, गैरसमज, अप्रतिष्ठा किंवा वियोग हीं या जगांतलीं खरीं दुःखें नाहींत. अहंकार हेंच खरें मोठ्यांतलें मोठें दुःख आहे. अहंकाराच्या विकृती-पुढें मोठ्या धन्वंतऱ्यालाहि हात टेकावे लागतील.

त्या गृहस्थाच्या अनेक प्रकारच्या मानसिक अढी व विकृति मला ठाऊक होत्या. म्हणून गिरसप्पाच्या धबधब्यासमोर सुद्धां त्याच्याशीं चार क्षण बोलल्या-शिवाय माझ्यानें राहवलें नाहीं. मीं त्याला गिरसप्प्याची थोडी माहिती दिली आणि त्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला.

राजा धबधब्याच्या मागल्या पोकळींत असंख्य पक्षी रहातात, आणि दूर-दूरच्या शेतांतून टिपून आणलेल्या 'उच्छिष्ट' आणि उत्कृष्ट दाण्यांचा संग्रह करतात. तो संग्रह इतका मोठा असतो कीं सरकारकडून त्याचा लिलाव करण्यांत

येतो, असें एकदां कुणाकडून तरी ऐकलें होतें. मधमाश्यांचें मध लुटणारा मनुष्य-प्राणी पक्ष्यांचाहि धान्यसंग्रह लुटतो यांत आश्चर्य तें काय? जो संग्रह करतो तो लुटला जावा अशी सृष्टीचीच व्यवस्था दिसते. परिग्रहो भयायैव !

पुन्हां पटल पसरलें आणि मला अंतर्मुख होऊन विचारांत बुडी मारण्याची संधि मिळाली. अशा भव्य देखाव्याचें रहस्य काय असावें? भूगोलवेत्ते आणि भूस्तरशास्त्री चटकन् सांगतील कीं येथील पहाड निस् जातीच्या दगडांच्या थरांचा बनला आहे. दरींतून एक कपार तुटून आसपासची माती धुऊन गेली असावी. एकदां धबधबा सुरू झाला कीं खालच्या जमिनीला तो अधिकाधिक खोल खोदीत जाणार आणि जेथून धबधबा सुरू होतो त्या कोपऱ्याला सारखा घाशीत जाणार. वरचें कपाळ जर कठीण दगडाचें असेल तर उंची हजारों वर्षें टिकेल. धबधब्यापासून समुद्र फार दूर नसल्यामुळें नदीचा पुढला भाग साफ झाला आहे आणि धबधब्याची उंची टिकून राहिली आहे. हें झालें धबधब्याचें जड रहस्य. एखाद्या आधुनिक यांत्रिकाला विचाराल तर तो म्हणेल एकट्या गिरसप्प्याच्या धबधब्यांत इतकें प्रचंड सामर्थ्य आहे कीं म्हैसूर आणि दोन्ही कानडा जिल्ह्यांना हवी तेवढी शक्ति तो पुरी पाडूं शकेल. मग तुम्ही त्यांतून वीज उत्पन्न करा, प्रत्येक शहराला आणि गांवाला प्रकाशित करा, कारखाने चालवा आणि तुमच्या मुलखांतील वाटेल तितक्या माणसांची मजुरी छिनवून घेऊन त्यांना बेकार बनवा.

निसर्गापासून जो कांहीं लाभ होईल तो भूमातेच्या साऱ्याच लेंकरांनीं आप-आपसांत सलोख्यानें वांटून घ्यावा आणि जीवनयात्रेचा भार हलका करावा अशी बुद्धि माणसाला सुचेल तेव्हांची गोष्ट वेगळी. पण आज तर माणसाच्या हातीं कोणत्याहि प्रकारची शक्ति आली रे आली, कीं लगेच तो दुसऱ्या माणसावर कुरघोडी करण्याचाच प्रयत्न करतो. मग ती कुरघोडी दुसऱ्या माणसाला मारून मिळो, गुलाम बनवून मिळो किंवा त्याला राबवून मिळो.

म्हैसूर राज्य सुधारलेलें आहे, मोठमोठ्या इंजिनिअरांनीं दिवाणपद शोभवून येथली समृद्धि वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. साऱ्या जगाला लागणारें चंदनाचें तेल एकटें म्हैसूर राज्यच पुरवीत आहे असें म्हटल्यास विशेष अति-शयोक्ति होणार नाही. हिन्दुस्थानांतील सर्वांत मोठ्या सोन्याच्या खाणी म्हैसूर-मधेंच आहेत. भद्रावती येथील लोखंडाच्या कारखान्याची कीर्ति वाढतच

चालली आहे आणि कृष्णसागर तलाव हा मानवी पराक्रमाचा एक सुंदर नमुना आहे. अशा म्हैसूर राज्याला गिरसप्प्याच्या धबधब्याला वेठीस धरण्याचें सुचलें नसेल हें शक्यच नाहीं. पण अजून तें अमलांत आलें नाहीं इतकेंच. एवढ्या शक्तीचा उपयोग कसा करायचा तें सुचलें नाहीं, कीं सरहद्दीचें भांडण आडवें येतें कीं तिसरेंच कांहीं कारण आहे तें मी आतां विसरून गेलों आहें. एवढें मात्र खरें कीं गिरसप्प्याची शोभा अजून पूर्वीच्या इतकीच प्राकृतिक, उदात्त आणि अक्षुण्ण राहिली आहे.

भगिनी निवेदिता यांनीं केलेल्या प्रख्यात तुलनेचें येथें स्मरण होतें. कोणत्याहि स्थानाच्या रमणीयतेनें हिंदवासियाला आकर्षित केलें कीं त्यानें लागलीच त्याला धार्मिक स्वरूप दिलेंच म्हणून समजावें. कोणतेंहि अद्‌भुत, रमणीय किंवा भव्य दृश्य पाहतांक्षणींच हिंदी हृदयाला वाटतें कीं हा तर गाईनें वासराला बोलवावें त्याप्रमाणें परमात्मा जीवात्म्याला बोलावीत आहे. नायगऱ्याचा धबधबा जर हिन्दुस्थानांत गंगामाईच्या प्रवाहानें झाला असता तर येथल्या जनतेनें त्याच्या भोंवतीं कशा प्रकारचें वातावरण निर्माण केलें असतें ? आमोद-प्रमोद व वनभोजनें करणाऱ्या टोळ्या किंवा आगगाडीचे प्रवासी यांच्याऐवजीं धबधब्याची पूजा करण्यासाठीं वार्षिक अथवा मासिक यात्रेकरूंचे थवेच्या थवे येथें गोळा झाले असते. भोगविलासाचीं सगळीं साधनें पुरविणाऱ्या हॉटेलांच्या ऐवजीं धबधब्याच्या कांठीं, किंवा त्याच्या मधोमधसुद्धां उचंबळून येणाऱ्या हृदयांतील भक्तिभाव ओतण्यासाठीं, मंदिरें उभारलीं गेलीं असतीं. सृष्टीचें वैभव पाहून भपकेदार ऐषआराम किंवा मौजमजा यांच्याऐवजीं लोकांनीं येथें तपश्चर्या केली असती. आणि इतक्या प्रचंड शक्तीला माणसाच्या फायद्यासाठीं किंवा सुखसोईसाठीं बंदिस्त करून ठेवण्याचें डोक्यांत येण्याऐवजीं निसर्गाशीं एकरूप होऊन जाण्याच्या मस्तींत भैरव-झेप घेऊन पाण्याच्या प्रवाहांत आपला जीवनप्रवाह मिसळून देण्याचेंच त्यांना सुचलें असतें. स्वभाव-भिन्नतेंत आतां कांहीं बाकी राहिलें ?

पण निसर्गाची भव्यता पाहून त्यांत आपला देह सोडून देणें यांत काय खरोखर आध्यात्मिकता आहे ? छे. देहाचीं सारीं बंधनें गळून पडावींत, ‘ वाटेल तें होवो येनकेन प्रकारेण जगेनच ’ अशी पामर जीवनाशा मनुष्यानें टाकून द्यावी यांत आध्यात्मिक प्रगति आहे हें निःसंशय. पण ही वृत्ति स्थायी

असली पाहिजे. क्षणिक उन्मादाला कांहींच अर्थ नाहीं. फना होण्याची इच्छा प्रत्येक मनुष्यांत कधीं कधीं उत्पन्न होतेच. इश्काची ती एक विकृति आहे. तिच्यांत अमुक आध्यात्मिक तत्त्वांचे आभास पाहून तिच्यावर फिदा होणें मनुष्यजीवनाच्या महत्तेला शोभत नाहीं. भगवान बुद्धानें आपल्या अचूक नजरेनें तिला विभवतृष्णा हें नांव देऊन तिचा धिक्कार केला आहे. विभव म्हणजे नाश. भगवान मनूनीं सुद्धां हीच गोष्ट स्पष्ट शब्दांत सांगितली आहे :

नाभिनन्देत मरणम्; नाभिनन्देत जीवितम् ॥

गिरसप्प्याच्या धबधब्यासारख्या रोमहर्षण दृश्याच्या सहवासांत यंत्रें, अश्व-शक्ति ( हॉर्स पॉवर ), विद्युत्प्रकाश आणि कारखाने यांचा विचार करणें म्हणजे आत्म्याला विसरून बाह्य वैभवाचें ध्यान करण्यासारखें आहे यांत शंका नाहीं. पण आसपासचा प्रदेश दुष्काळानें पीडित असेल, लोक अनेक रोगांना बळी पडत असतील आणि प्रजेचें हें दुःख दूर करण्यासाठीं या धबधब्याच्या पाण्याचा अन्य रीतीनें उपयोग करणें हाच एक उपाय असेल तर अशा वेळीं आपला काय आग्रह राहील ? सृष्टिसौंदर्यानें वेडावून जाणाऱ्या आपल्या सौंदर्य-रसिक चित्ताच्या आल्हादाचें साधन—हा जो धबधबा—त्याला तसेंच ठेवावें कीं आपद्ग्रस्त अशा आपल्या बांधवांना दुःखमुक्त करण्यासाठीं त्याचा बळी द्यावा ? पुरेसें धान्य मिळत नाहीं अशा वेळीं आणि जागीं धान्याची शेती सोडून गुलाबाची शेती केली तर आपला हृदयविकास होईल का ? गुलाबांत काव्य आहे, धान्यांत कारुण्य आहे. दोहोंतून कोणतें पसंत करावें ? इंग्लंडच्या एका प्राचीन राजानें अनेक खेडीं उजाड उद्ध्वस्त करून मृगयेसाठीं त्यांचें एक महान् उपवन तयार केलें. राजा मर्दानी खेळांचा भोक्ता होता याविषयीं शंका नाहीं. पण प्रश्न आहे तो त्याला प्रजासेवक मानतां येईल कीं नाहीं याचा. कलेविरुद्ध सेवेचा प्रश्न येऊन उभा राहिला, काव्य व कारुण्य यांतील कोणत्या वृत्तीचा परिपोष करावा हें नक्की करायची पाळी आली तर कोणत्या निकषावर घासून निर्णय घ्यावा ? रोम जळत आहे व नीरो फिडल वाजवीत बसला आहे, आणि मिथिला जळत आहे नी जनक राजा आध्यात्मिक चर्चा करीत बसला आहे यांत बरेंच अंतर आहे. प्रजेच्या सेवेसाठीं जितकें म्हणून करणें शक्य आहे तितकें सर्व केल्यावर व्यर्थ चिंता करीत हृदय जळण्यापेक्षां अंतर्यामीचें स्मरण दृढ करण्याचा प्रयत्न करणें आर्यवृत्तीचें द्योतक आहे. मूठभर लोकांच्या

विलासासाठीं किंवा ऐश्वर्यासाठीं निसर्गाच्या शक्तीचा उपयोग करणें आणि प्राकृतिक सौंदर्याचा नाश करणें निवळ अधर्म होय. पण प्राणिमात्राच्या आर्तिनाशनाच्या साधनेमधून होणारा हृदयविकास सोडून प्रकृतीच्या विभूति-दर्शनांतून तो शोधण्याची इच्छा बाळगणें कितपत इष्ट आहे हें विचार करण्याजोगेंच आहे.

ते रुसलेले गृहस्थ आपल्या काल्पनिक अपमानाच्या जळफळाटांत समोरच्या दृश्याला विसरून गेले होते, आणि मी तात्त्विक कल्पनाविहारांत शून्य दृष्टीनें समोर पहात होतों. दोघेहि अभागी होतों, कारण कल्पना किंवा जळफळाट चालवण्यासाठीं मागाहून वाटेल तितका वेळ मिळतो. धुक्याचें पटल पुन्हां दाटून आलें. आतां धबधबा पुन्हां थोडाच दिसणार? राजाजींनीं सांगितलें, 'उन्हा-ळ्यांत जेव्हां धबधबा पडतो तेव्हां पाण्याच्या तुषारांवर नाना तऱ्हेचीं इंद्रधनुष्यें दिसतात. त्यावेळची शोभा सर्वस्वीं वेगळीच असते.' आणि चांदण्या रात्रीं देखील धनुष्यें दिसत नाहींत असें नाहीं. म्हैसूरच्या सर्वसंग्रहांत (गॅझेटियरमधें) लिहिलें आहे कीं गवताचे मोठमोठे भारे पेटवून धबधब्यांत सोडून दिल्यानें अंधाऱ्या रात्रीं साऱ्या दरीनें पेट घेतला आहे असा भास होतो. कित्येक लोकांनीं रात्रीं दारूकामाचे अनेक बाण सोडूनहि येथें अद्भुत आनंद मिळवला आहे. उत्पाती मनुष्यप्राणी जें कांहीं करील तेवढें थोडेंच! मला मात्र असलें कांहींच रुचत नाहीं. अशा ठिकाणीं निसर्ग जो खुराक चारतो त्याची स्वाभाविक रुचि अनुभवण्यांतच खरी रसिकता आहे. मानवी मसाला मिसळल्यानें स्वाद आणि पचनशक्ति दोन्ही बिघडतात.

आतां आम्ही बंगल्यांत येऊन पोहोंचलों. बरोबर आणलेलें खाणें उदरस्थ केलें. येथलें पाणी तर पिण्याची सोय नाहीं, लगेच हिंवताप लागतो. बहुतेकांनीं गरम गरम कॉफी पिऊनच तहान भागवली. मीं मात्र त्या दिवशीं चातकाप्रमाणें पावसाचे थोडे थेंब मिळवूनच संतोष मानला.

धबधब्याचें पुन्हां एकदां दर्शन घेऊन आम्ही परत फिरलों. आतां पुरतें कळून आलें कीं धबधबे तीन नसून चार आहेत. डाव्या बाजूचा पहिला मोठा धबधबा तो राजा. त्याच्या बाजूच्या दरींतून आक्रोश करीत त्याला येऊन मिळणारा 'रोअरर' (Roarer) तो माझा रुद्र. माथ्यावरची कारंज्याची पांढरी जटा फुलवून दाखवणारा तो 'रॉकेट.' त्याला आतां वीरभद्र म्हटल्यावांचून गत्यंतर

नव्हतें. आणि शेवटीं येणाऱ्या बाजूच्या धबधब्याचें तन्वंगी पार्वती हेंच नांव मी कायम केलें. इंग्रजांनीं रुद्राला Roarer नांव दिलें आहे, वीरभद्राला Rocket, आणि पार्वतीचें नांव ठेवलें आहे Lady.

आतां आम्हीं परत निघालों. पायांना जळवा डसण्याची भीति होती. येथल्या लोकांनीं आम्हां सर्वांना सावध तर केलेंच होतें कीं सांभाळून चाला. जळवा डसल्या तर कळणार सुद्धां नाहीं आणि रक्त शोषलें जाईल. मीं म्हटलें, त्याची चिंता नका करूं. इंग्रजांना चांगले ओळखूं लागलों आहोंत ते काय जळवांना थोडेच बधणार आहोंत ? तरीहि जवळ जवळ प्रत्येकाच्या पायाला एक एक जळू डसलीच. माझ्या शरीरांतील रक्ताचें फारसें आकर्षण नसल्यामुळें म्हणा, किंवा माझें रक्त कडू असल्यामुळें म्हणा अथवा काकदृष्टीनें मी बघून बघून चालत होतों म्हणून म्हणा, मी मात्र बचावलों होतों. आम्हीं थोडे पुढें गेलों, पण मणिबेनच्यानें राहवलें नाहीं. 'जरा थांबा, पुनः एकदां जमल्यास या बाजूनें धबधब्याचें दर्शन घेऊन येतें.' 'पण धुकें विरलेंच नाहीं तर ?' 'नाहीं विरलें तर कांहीं नाहीं, परत येऊं. एकदां पाहूं तर द्या.'

परत फिरतांना रस्त्याला एक फाटा फुटला होता, त्या वाटेनें जाऊन कित्येकांनीं पार्वतीचें जवळून दर्शन घेतलें आणि तेथें जमीन निसरडी असल्यामुळें 'वंदे मातरम्' म्हणून त्यांनीं पार्वतीला साष्टांग नमस्कार सुद्धां घातला !

जातेवेळीं ज्या रस्त्यावर अज्ञात आणि अननुभूत अवस्थेचें काव्य अनुभवलें होतें त्याच रस्त्यानें परततांना संस्मरणांचें स्मृतिकाव्य आम्हीं अनुभवूं लागलों. अर्थात् तीं न तींच दृश्यें उलट्या दिशेनें पहाण्यांत कांहीं कमी नाविन्य नव्हतें. ज्या झाडांबद्दल जातांना आम्हीं बोलत होतों तींच झाडें परततांना देखील लक्ष वेधून घेणारच. अर्थात् या परिचित मित्रांना 'कसें काय ?' म्हणून कुशल विचारल्यावांचून पुढें कसें जाववेल ?

आणि झाडाझाडांमध्यें प्रेमाचा पूल बांधणाऱ्या वेली ? त्यांच्या नम्रतेला नमन केल्यावांचून पुढें जाईल तो अरसिकच म्हटला पाहिजे. आम्ही हळू हळू नदीतीरापर्यंत येऊन पोहोंचलों. आतां त्या न त्याच शांत प्रवाहावरून परत जावयाचें होतें. धुक्याचे ढग आतां विखुरले होते. नदीचें शांत पाणी हळू हळू धबधब्याकडे जात असलेलें पाहून माझ्या मनांत बलिदानासाठीं चाललेल्या मेंढरांच्या कळपाचें चित्र उभें राहिलें. मीं त्या पाण्याला म्हणालों, 'केवढा

मोठा अधःपात पुढें वाढून ठेवला आहे ह्याची थोडीदेखील कल्पना तुम्हांला नाहीं. म्हणूनच इतक्या स्वस्थचित्तानें तुम्ही पुढें चालला आहांत.

'अथवा नाहीं, मीच चुकत आहें. तुम्ही जीवनधर्मी आहांत. तुम्हांला विनाशाचें भय कसलें ?

प्रायः कन्दुक-पातेन पतत्यार्यः पतन्नपि ।

जितक्या उंचावरून पडाल तितकेच उंच वर उसळाल. तुमची कींव करणारा मी कोण ?' शरावतीच्या पवित्र पाण्याला स्पर्श करण्यासाठीं मी हात लांबवला, तों पाणी खळखळ हसून म्हणालें, 'न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात ! गच्छति.' होडी या कांठावर येऊन पोहोंचली आणि आमच्या मनांत विचार आला कीं मोटर या अंगानें जरा खालीं घेतली तर त्याच धबधब्याची फिरून उजवी यात्रा देखील होईल. आम्ही जाऊन आलों होतों त्या बाजूला म्हैसूर-बाजू म्हणतात आणि ज्या उजव्या बाजूनें जाण्यास निघालों ती मुंबई-बाजू म्हणून ओळखली जाते. कारण जोग या दोन राज्यांच्या सरहद्दीवर आहे.

येथें तर आम्ही अगदीं जवळ येऊन ठेपलों. मोठमोठ्या खडकांमधून वाट काढीत मी धांवूं लागलों. दोन वर्षांचा दुखणेकरी म्हणून माझी ख्याति चांगलीच पसरलेली होती. त्यामुळें मला धांवतांना बघून राजाजींना आश्चर्य वाटलें. 'हे महाराष्ट्राचे मावळे आहेत. शिवाय हिमालयाचे यात्रेकरू देखील आहेतच. माशांना पाणी तसा मराठ्यांना डोंगर.' पण मला कुठें असलीं बोलणीं ऐकायला थांबावयाचें होतें ? मीं आपला धांवत धांवत राजा धबधब्याच्या शेजारीं जी प्रसिद्ध दरड आहे तेथें जाऊन पोहोंचलों. येथें उभ्याउभ्या खालीं पहाण्याची सोयच नाहीं. घेरी येऊन मनुष्य खालींच पडायचा. चारहि धबधब्यांच्या आवाजानें कान इतके कांहीं भरून गेले होते कीं दुसरें कांहीं ऐकण्याइतकी जागाच त्यांत उरली नव्हती. धबधब्याचें पाणी ज्याप्रमाणें वरून खालीं दरींत पडून पुन्हां वर उसळत होतें त्याचप्रमाणें कानांतून देखील आवाज पुन्हां उसळत असले पाहिजेत. प्रथम माझें लक्ष वेधलें राजाच्या गंडस्थळावरून रुळणाऱ्या मोत्यांच्या सरांनीं आणि जलप्रलयांतून लोकांना वांचवण्यासाठीं जसे पट्टीचे पोहणारे वीर बहादर उड्या घेतात त्याप्रमाणें या बाजूच्या धबधब्यांतून युक्तीने पार होणाऱ्या पक्ष्यांनीं. या पक्ष्यांना या धबधब्याच्या भीषण भव्यतेची कल्पनाच येत नाहीं कीं ईश्वरानें त्यांच्या हृदयांत इतकी हिंमत प्रेरली आहे ?

मला वाटतें कीं आगंतुक पक्षी कांहीं इतकी हिंमत करणार नाहींत. हे जोग-निवासी येथेंच जन्मलेले, धबधब्याच्या पडळाच्या सुरक्षिततेंत वाढलेले. सिंहाचे छावे सिंहिणीला भीत नसतात. समुद्रांतील मासे लाटांत स्वछंद क्रीडा करतात, त्याचप्रमाणें हे जोगपुत्र जोगशीं खेळत असावेत.

राजा धबधबा म्हैसूर बाजूनें दुरून पाहिला होता तेव्हां तो कांहीं वेगळाच दिसत होता. येथें तर जणूं काय हत्तीच्या गंडस्थळावरच पहुडलों आहोंत इतक्या जवळ आम्ही होतों. वरचें पाणी धबधब्याकडे असें कांहीं खेंचलें जात होतें कीं जणूं काय एखादा महान जनसमाज कळत न कळत, इच्छा असो नसो, महान क्रांतीकडे धांवत आहे! मोठा जनसमाज जेव्हां सामाजिक आणि राजकीय सुधारणांच्या वेगांत वाहत जातो, तेव्हां पुढें काय वाढून ठेवलें आहे याची त्याला कल्पना नसते. आणि कल्पना असली तरी ‘ आपल्या बाबतींत तें खरें ठरणार नाहीं; आपण कसे तरी निभावून जाऊं ’ अशी आंधळी आशा तो बाळगतो. मध्यंतरीं सुधारणेचा कैफ वाढतच जातो. शेवटीं जहाल लोक संयम सुचवतात, तर मवाळ लोक आंधळे होऊन बेजबाबदार लोकांशीं हात-मिळवणी करतात आणि मग इच्छा असली तरी मागें फिरूं शकत नाहींत! अथवा ते स्वतः मागें फिरले तरी काय? धनुष्यांतून सुटलेला बाण कधींकाळीं मागें खेचतां आला आहे? जी अटळ नाहीं ती क्रांति कसली?

धबधब्याचें पाणी खालीं किती खोलवर जातें तें पहाणें किंवा जाणून घेणें अशक्य होतें. कारण उसळत्या पाण्याचीं मोठमोठीं अभ्रें धबधब्याच्या पायाला विळखा घालून डोलत होतीं. काय तो पाण्याचा आवेशयुक्त उत्सव! जणुं काय महादेव संहारकारी तांडवनृत्यच करीत आहे आणि समोरचा रुद्र त्याला ताल देत आहे. पण रोमांचकारक शोभेचा परम उत्कर्ष तर समोरचा वीरभद्रच दाखवतो. तुम्हांला वाटणारच नाहीं, कीं येथें पाणी पडतें आहे, येथें पाणी उडतें आहे. मोठमोठ्या तोफांतून गोळ्याच्या वेगानें कोरड्या पिठाचे फवारे उडत असावेत तसाच तो देखावा होता. त्या देखाव्याचें वर्णन शब्दांनीं करतांच येणार नाहीं, कारण शब्द हे ‘ शांति आणि व्यवस्था ’ यांच्यामधें वाढलेले असतात.

आम्ही पडल्या पडल्या येथून तें दृश्य डोळे भरून पाहिलें, अथवा खरें सांगावयाचें म्हणजे वाटेल तितके पडून राहिलों तरी तृप्ति होणें अशक्य आहे

अशी खात्री होईपर्यंत पाहिलें. आम्ही उठून परत फिरलों; पण मागे फिरणें सोपें नव्हतें. कुणी तरी एकजण उठायचाच नाहीं. त्याला खेचून आणण्या-साठीं दुसरा जाई तो स्वतःच त्या नयनोत्सवाला खिळून राही. पहिला पस्तावून उठला तरी बोलवायला परत गेलेला कांहीं उठायचा नाहीं आणि दोघेहि कसा-बसा संयम करून मागें परतताहेत, तों त्या दोघांवर चिडून त्यांची कानउघाडणी करण्यासाठीं आलेला तिसरा क्षणभर डोळे तृप्त करण्यासाठीं तेथें उभा राही आणि त्या दोघांच्या संयमाला थोडें ढिलें करी. त्या दोघांना वाटे, इतका चिडलेला हा समाजनियंता गृहस्थ जितकी सूट घेत आहे तितकी आपणहि घेतली तर त्यांत कांहीं बिघडत नाहीं. आपण कुठें त्याच्याहून अधिक संयमी असल्याचा दावा करीत आहोंत ? मला वाटलें कीं थोडेंसें त्या पुढच्या खडकावर गेलें तर राजाच्या पाण्यांत पाय बुडवतां येईल. पण नदीचें पाणी थोडें थोडें वाढत होतें. त्यांत तो खडक लहानसें बेटच बनला होता. म्हणून राजाजींनीं मला जाऊं दिलें नाहीं. मलाहि वाटलें कीं त्यांचें न ऐकलें तर दुहेरी उद्धट-पणा होईल. राजाजींच्या सूचनेचें उल्लंघन कसें करावें ? आणि ‘ राजा ’च्या डोक्यावर पाय कसा ठेवावा ?

आम्ही परत फिरलों. भक्ति, विस्मय, मानवी जीवनाची क्षणभंगुरता, दृश्याची भव्यता, या क्षणींची धन्यता, अशा कितीतरी वृत्तींचे ढग हृदयांत दाटून आले होते आणि तेथून त्या वीरभद्राप्रमाणें मस्तकांत आपले बाण सोडीत होते. विचारांचें हें दारूकाम अद्‌भुत असतें. हृदयांतून बाण सुटतो तो तडक मस्तकापर्यंत जाऊन तेथें फुटतो. अशा वेळीं स्वस्थ शरीर कसें अस्वस्थ होऊन जातें याचा ज्यानें अनुभव घेतला आहे त्यालाच त्याचा चमत्कार कळून येईल.

अशा या ठिकाणीं मंदिर कसें नाहीं ? आपल्या लोकांचीं मंदिरें म्हणजे जन्मभूमींतील काव्यमय स्थानें. पर्वताचें अमुक शिखर उत्तुंग आहे ? मग तेथें एखादा ऋषि ध्यानधारणेसाठीं जाऊन बसलाच आणि भक्तांनीं तेथें एक मंदिर बांधलेंच म्हणून समजावें. मग तें पुण्याजवळील पर्वती असो, चंपानगरी-जवळील पावागढ असो, जुनागढजवळील गिरनार असो कीं हिमालयाच्या ‘ उसपार ’चें कैलास शिखर असो. दक्षिणेकडे धांवणारी नदी अमुक ठिकाणीं उत्तरवाहिनी झाली आहे ? चला वसवा तेथें एक तीर्थ ! कोट्यवधि लोकांनीं

यावें आणि पावन होऊन जावें. दोन मोठमोठ्या नद्या एकमेकींना मिळताहेत ? मग त्या प्रयागावर आपल्या संतांनीं तिसरी आपली सरस्वती वाहती केलीच आहे. सगळ्या यात्रा पूर्ण होऊन मनुष्य समुद्रापर्यंत येऊन पोहोंचला ? तेथें भक्तांनीं जगन्नाथ किंवा सेतुबंध महादेव आणून बसवलाच आहे. जेथें जमिनीचा शेवट दिसला तेथें एक तर कन्याकुमारी असेल अथवा देवेंद्र असेल. दूरवर पसरलेल्या, लांबलचक वाळवंटांत एखादें सरोवर दिसलें तर तें नारायणाचेंच सरोवर आहे; त्याची पूजा झालीच पाहिजे. आणि काश्मीरची क्षीरभवानी ?

आपल्या संतकवींनीं तीर्थस्थानें कोठें कोठें वसवलीं आहेत याचा शोध करूं लागलों तर हिन्दुस्थानचा सारा भूगोल पालथा घालावा लागेल. मुसलमान संतांनीं आणि रोमन कॅथलिक पाद्र्यांनीं देखील आपल्या देशांत अशाच प्रकारें अद्‌भुत काव्यमय स्थानें निवडलीं आहेत आणि तेथें पूजा प्रार्थनेची सोय करून ठेवली आहे. मग या धबधब्यापाशींच मंदिर कां नाहीं ? काय जीवनराशीचा एवढा मोठा अधःपात पाहून मुनिजन खिन्न झाले असतील ? भैरवघाटीप्रमाणें येथेंहि देह विसर्जन करण्याचा कैफ चढण्याचा संभव आहे असें वाटून लोकसंग्रह-कार मुनींनीं लोकयात्रेसाठीं हें स्थान नापसंत केलें असेल ? अथवा डोकें भणाणून टाकणारी अखंड व भीषण गर्जना ध्यानाला अनुकूल नाहीं असें समजून उपासक येथून विमुख झाले असतील ? किंवा हा धबधबा स्वतःच अभय ब्रह्माची मूर्ति आहे, त्याच्या शेजारीं ध्यान खेचून घेऊं शकेल अशी कोणती मूर्ति उभी करावी, म्हणून गोंधळांत पडून ते येथून निवृत्त झाले असतील ? कोणी सांगावें ? आपल्या पूर्वजांनीं येथें देऊळ बांधलें नाहीं याचें मला यत्किंचितहि दुःख नाहीं. पण हें स्थान पाहून स्फुरलेल्या भावांचें एखादें तांडव-स्तोत्र तर त्यांनीं अवश्य लिहावयास पाहिजे होतें. पार्थिव मूर्ति जेथें कामीं येत नाहीं तेथें वाङ्मयमूर्ति अवश्य स्फूर्तिदायक होऊं शकते.

ही सगळी शोभा आम्ही धबधब्याच्या माथ्यावरून पाहात होतों. होन्नावर कडून येणारे लोक उत्तर कानडा जिल्ह्याच्या घोर अरण्यांतून येत असतील तेव्हां त्यांना या धबधब्याचें आपाद-मस्तक दर्शन होत असेल. कोणतें अधिक सुंदर हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कोण सांगू शकेल ? आणि प्रत्यक्ष पाहूनहि काय ? निसर्गाच्या वेगवेगळ्या विभूतींची कधीं तुलना होऊं शकली आहे ? हिमालयाची भव्यता, सागराची विशाल गंभीरता, वाळवंटाची भीषणता आणि

आकाशाची नम्र अनंतता यांच्यामध्यें तुलना किंवा निवड कोण करूं शकेल ? म्हणून एकदां होन्नावरच्या मार्गानें जोगच्या दर्शनास आलेंच पाहिजे.

आरमाराचा अनुभव घेऊन कुशल बनलेले कित्येक लष्करी अधिकारी धबधब्याचें मोजमाप घेण्यास आले होते आणि पाळण्यांतून लटकत धबधब्याच्या मागील अंगास गेले होते, त्यांना कसा काय अनुभव आला असेल ? जोग-निवासी पक्ष्यांनीं त्यांचें कसें स्वागत केलें असेल ? धबधब्याच्या पडद्यांतून आंत पसरणारा बाहेरचा प्रकाश त्यांना कसा दिसला असेल ? आणि धबधब्या-मागें गवत पेटवून जर मोठा उजेड केला तर साऱ्या दरींत कशी गंधर्वनगरी निर्माण होईल याची कुणाला कल्पना आहे का ? जेव्हां येथें विजेचा कारखाना सुरू होईल तेव्हां कित्येक कल्पनावीर नक्कीच या धबधब्याच्या मागें विजेच्या दिव्यांच्या माळा पेटवून लावतील आणि जगानें कधीं पाहिलें नाहीं असें इंद्रजाल पसरवतील. त्या वेळीं सगळ्या दरीला एका महान् रंग-भूमीचें स्वरूप येईल आणि चारहि खंडांतील भूदेव ती पहाण्यासाठीं येथें अवतरतील. पण त्या वेळीं कुणाला ईश्वराचें स्मरण होईल का ? माणसानें आपली बुद्धिशक्ति ईश्वराला ओळखण्यासाठीं वापरायचें सोडून ईश्वराला विसरून जाण्याच्या युक्त्या आणि पद्धति शोधण्यांतच ती खर्ची घातलेली दिसते.

कदाचित् असेंहि असेल कीं सर्व बाजूंनीं परास्त झाल्यानंतर बुद्धि ईश्वराला चांगल्या रीतीनें समजूं शकत असेल.

प्रत्येक गोष्टीला शेवट असतोच; अर्थात् आमच्या या जोग-यात्रेचाहि शेवट झाला, अत्यंत पवित्र आणि मधुर स्मृति घेऊन आम्ही परत फिरलों. पण पुन्हां एकदां येथें येऊन जाण्याची वासना उरलीच. म्हणून ' पुनरागमनाय च ' अशा शास्त्रोक्त शब्दांनींच आम्हांला भारत-वैभवाच्या या असाधारण विभूतीचा निरोप घ्यावा लागला.

# जोगचें पुनर्दर्शन

हिमालय व सह्याद्रि यांसारखे उत्तुंग पर्वत; गंगा, सिंधु, नर्मदा, ब्रह्मपुत्र यांसारख्या सुदीर्घ नदनद्या; चिल्का, वुलर, मंचरसारखीं प्रसन्न सरोवरें ज्या देशांत विराजत आहेत त्या देशांत एखादा महान्, भीषण व रोमांचकारी जलप्रपात जर नसला तर प्रकृतिमातेला कृतार्थता कशी वाटावी ? दक्षिणेकडे कारवार जिल्हा आणि म्हैसूर राज्य यांच्या सरहद्दीवर असा एक धबधबा आहे कीं जो जगामधें अद्वितीय किंवा सर्वश्रेष्ठ पदाचा एकमेव अधिकारी नसला तरी सर्वश्रेष्ठ धबधब्यांपैकीं एक आहे हें निःसंशय. इंग्रज त्याला ' गेरसप्पा फॉल्स ' या नावानें ओळखतात. त्याचें देशी नांव आहे ' जोग. '

लॉर्ड कर्झन जेव्हां हिंदुस्थानांत आला तेव्हां हा धबधबा पाहण्यासाठीं तो इतका उत्सुक झाला होता कीं या देशांत आल्यानंतर पहिली संधी साधून तो जोगचा धबधबा बघण्यास गेला आणि त्याच्या अद्‌भुत दर्शनानें त्यानें आपल्या डोळ्यांचें पारणें फेडलें. त्यानंतर आपल्या देशांत या धबधब्याची प्रतिष्ठा वाढली. ज्या जागेवरून लॉर्ड कर्झननें धबधबा पाहून स्वतःला कृतार्थ केलें त्या जागेवर म्हैसूर सरकारनें एक बाक तयार करविलें आहे. त्याला ' कर्झन सीट ' असें म्हणतात.

धबधब्याच्या जवळच म्हैसूर सरकारनें एक अतिथिशाळा बांधली आहे. तेथल्या भेट-वहींत निसर्गप्रेमी देशी-परदेशी प्रवाश्यांनीं वेळोवेळीं आपापले आनंदोद्गार लिहून ठेवलेले आहेत. या उद्गारांचाच एक संग्रह छापून प्रसिद्ध केला तर तो निसर्ग-काव्याचा एक असाधारण गुच्छ होईल. तें सारें काव्य उच्च कोटीचें असलें तरीहि जोगच्या प्रत्यक्ष दर्शनानें तर त्याची अपूर्णताच सिद्ध होते आणि तोंडांतून एकदम उद्गार बाहेर पडतात.

एतावान् अस्य महिमा अतो ज्यायांश्च पूरुषः ।

शरावती एक लहानशी नदी. असें असूनहि तिला तीन तीन नांवें कशीं काय पडलीं असावींत ? प्रथम ती भारंगी अथवा बारगंगा नांवानें ओळखली जाते; मधल्या भागांत तिला शरावती म्हणतात; आणि जेथें ती प्रौढ बनून समुद्राला जाऊन मिळते तेथें तिला म्हणतात बालनदी ! शरावतीच्या प्रवाहानें

त्या रोमांचकारी प्रपाताचें रूप धारण केलें नसतें तरीदेखील आपल्या अंगच्या नैसर्गिक सौंदर्यानें तो माणसाचें मन हरण केल्यावांचून राहिला नसता. पण मग हिंदुस्थानांतील अनेक रूपवती नद्यांपैकीं एक नदी म्हणूनच तिची गणना झाली असती, या प्रपातामुळें लहानशी शरावती नदी भारतवर्षातील एक अद्वितीय सरिता होऊन बसली आहे.

जोगच्या या अलौकिक दृश्याचें दर्शन घेण्यासाठीं राजाजी आणि इतर कांहीं मित्रांसह मी प्रथम गेलों होतों, त्यावेळच्या त्या अद्‌भुत दृश्याच्या दर्शनानें एक कुतूहल तृप्त होतें न होतें, तोंच मानवी स्वभावाला अनुसरून दुसरा नवीन संकल्प मनांत उठला कीं इतक्या उंचावरून उडी घेतल्यावर ही नदी पुढें जाते कोठें, तेथें दिसते कशी, आणि सरित्पतीशीं तिचा संगम होतो कसा हें सर्व एकदां प्रत्यक्ष पाहिलें पाहिजे. आणि साधल्यास बालक बनून शरावतीच्या वक्षःस्थलावर नौकाविहार केला पाहिजे. अंतरात्म्याच्या या जिज्ञासेला सत्य-संकल्प परमेश्वरानें आशीर्वाद देऊन उचलून धरलें आणि एक तप लोटण्याच्या आधींच जोगचें दुसऱ्यांदा दर्शन घेण्याचें सुदैव मला प्राप्त झालें. पहिल्या खेपेस आम्ही वरच्या बाजूनें धबधब्याकडे गेलों होतों; यावेळीं मुखाकडून प्रवेश करून होडींत बसून आम्ही प्रतीप-प्रवास केला आणि जेथें होडी पुढें जाईना, तेथून तैलवाहना (मोटरी )च्या साहाय्यानें घाट चढून धबधब्याच्या माथ्यावर जाऊन पोंचलों.

शरावतीच्या अर्धचंद्राकार दरींत चार धबधबे आहेत. उजव्या बाजूस 'राजा' नांवाचा धबधबा आहे. तो वरून एकदम सरळ ९६० फूट खालीं उडी घेतो. त्याचें राजा नांव अगदीं यथार्थ आहे. त्याचा जलनिधि, त्याचा उन्माद आणि त्याची हिंमत एखाद्या जगदेक सम्राटाला शोभतील अशींच आहेत. त्याच्या डाव्या बाजूला महारुद्राप्रमाणें गर्जना करणारा 'रुद्र ( Roarer ) प्रपात' राजाच्या चरणावर येऊन पडतो. रुद्राची घोर गर्जना आसपासच्या टेकड्या आणि दरी यांना कित्येक मैलांपर्यंत निनादित करून टाकते. त्याच्या ध्वनीला नाहीं म्हणतां येत मेघगंभीर कीं नाहीं म्हणतां येत सागरगंभीर. कारण मेघगर्जना आकाश-विद्रावी असली तरी क्षणजीवी असते, आणि सागराच्या सनातन गर्जनेला भरती-ओहोटीचे हेलकावे खावे लागतात. रुद्राचा ध्वनि अविरत, अखंड आणि धारावाहिक आहे. अशा ध्वनीचा उन्माद कांहीं विलक्षणच असतो.

राजाला आणि रुद्राला पृथ्वीवर कोठेंहि सम्राटाची पदवी मिळूं शकेल. पण जोगचें खरें वैभव तर आकाशांत नानाविध रूपांनीं उडणाऱ्या वीरभद्रा-( Rocket )च्या शुभ्र जलजटांमुळें आहे. वीरभद्राचा प्रपात हत्तीच्या गंड-स्थळासारख्या एका विशाल शिलाखंडावर येऊन पडतांक्षणींच त्यांतून दारू-कामाच्या बाणांसारखे फवारे उंचच उंच उडतच रहातात. हें काय शंकराचें तांडव नृत्य ? कीं महाकवि व्यासाच्या प्रतिभेचा नवनवोन्मेषशाली कल्पनाविलास ? कीं सूर्यबिंबाच्या पृष्ठभागांतून उसळणाऱ्या सर्वसंहारकारी पण कल्पनारम्य ज्वाला ? किंवा भूमातेच्या वात्सल्यप्रेरित स्तन्यधारांचे फवारे ? अशा अनेक कल्पना मनांत उठतात. खरोखरच पहाणाऱ्याच्या डोळ्यांना वीरभद्र पागल करून सोडतो.

वीरभद्राच्या बाजूला कर्पूरगौरा, तन्वंगी आणि अनूदरी पर्वतकन्या पार्वती ( Lady ) स्वतःच्या लावण्यानें आपल्याला आनंदित करते.

चार प्रपातांचें रक्षण करण्याकरितांच कीं काय दोन्ही बाजूंस दोन प्रचंड पर्वत उभे आहेत. उभ्या उभ्या हे अंगरक्षक आणखी काय करणार ? प्रपातांची अखंड गर्जना प्रतिक्षणीं प्रतिध्वनित करणे, त्यांचीं इंद्रधनुष्यें धारण करणें आणि विविध प्रकारच्या वनस्पतींनीं देह शृंगारून सदा पुलकित होऊन रहाणें ही यांची अविरत प्रवृत्ति होऊन बसली आहे.

या खेपेस आम्ही गेलों ते उन्हाळ्याचे दिवस होते. भारंगीचें पाणी चांगलेंच ओसरलेलें होतें. वीरभद्राच्या जटा कोठेंहि दिसत नव्हत्या. रुद्राच्या लांबलांब उड्याहि आतां आखूड झाल्या होत्या. पार्वतीनें आतां विरहिणीचा वेष धारण केला होता. कांहीं नाहीं तरी ' राजा 'चें वैभव तरी पाहण्यासारखें असेलच अशी आम्ही अशा बाळगली होती, पण विश्वजित यज्ञाच्या अंतीं जसा एखादा धन्य सम्राट अकिंचन बनतो आणि अशा अवस्थेंतहि आपलें वैभव व्यक्त करतो-अगदीं तशीच स्थिति ' राजा 'ची झाली होती.

यावेळीं आम्हीं शरावतीच्या उजव्या म्हणजे उत्तरेकडील अंगानें येऊन पोंचलों होतों. अतिथिगृहांत न थांबतां आम्ही धावत धावत सरळ ' राजा ' प्रपाताच्या शेजारीं जाऊन उभे ठाकलों.

तेथें एका बाजूनें कडक ऊन आणि दुसऱ्या बाजूनें खालून उडणाऱ्या तुषा-रांचें थंडगार धुकें या दोहोंमध्यें सांपडून आमची जी अवस्था झाली तिचें

वर्णन करणें कठीण आहे. राजाच्या मुकुटाप्रमाणें शोभणाऱ्या ऊन ऊन दगडांवर ओणवे होऊन आम्ही खालीं दरींत डोकावलें. वरून राजाची जी धारा खालीं पडत होती ती खोलवर जमिनीपर्यंत पोंचतच नव्हती. एखाद्या मदोन्मत्त हत्तीच्या सोंडेसारखा एक प्रचंड स्रोत वरून खालीं पडतांना आम्हांला दिसत होता. खालीं पडतां पडतां शतधा विदीर्ण होऊन त्या सहस्रधारा बनत आणि पुढें त्या धारांचे मोठेमोठे जलबिंदू बनन मोत्यांच्या माळांप्रमाणें त्या शोभूं लागत. या मोत्यांचेंहि थोडें पुढें गेल्यावर चूर्ण बनून त्यांचे मोठेमोठे कण दिसूं लागले. आतां खालीं पुढें जाण्याचें सोडून त्यांनीं थोडा स्वच्छंद-विहार सुरू केला. हे मोठे कण देखील छिन्नभिन्न झाले आणि सीकरपुंजाचें रूप धारण करून ढगां-प्रमाणें विहार करूं लागले. पण एवढ्यानें प्रकृतिमातेचें समाधान झालें नाहीं. या ढगांमधून पुढें निहारिकेचें धुकें बनलें आणि वाऱ्याच्या लहरींसह उडत तें साऱ्या वातावरणाला शीतल बनवूं लागलें. आश्चर्याची गोष्ट ही कीं एवढ्या मोठ्या जलधारेचें एक टिपुस देखील थेट जमिनीपर्यंत पोंचत नव्हतें! खालची जमीन पहावी तर गरम आणि वरची हवा मात्र थंड! अशी ही स्थिति पाहून मला राजे लोकांच्या योजनाशून्य दानाचें स्मरण झालें. प्रजाजन दुष्काळानें पीडित होत असलेले पाहून आपले राजे जेव्हां सढळ हातानें पैसे देऊं लागतात तेव्हां त्यांच्या जयजयकारानें सारें वातावरण दुमदुमून निघतें, पण गरीब बिचाऱ्या जनतेच्या मुखापर्यंत अन्नाचा एक कण पोंचत असेल तर शपथ!

इथल्या इंद्रधनुष्यांची शोभा अशी होती कीं अलकेश्वराच्या मनांतहि ईर्ष्या उत्पन्न व्हावी. मात्र हीं इंद्रधनुष्यें स्थायी नव्हतीं. वाऱ्याची लहर जशी दिशा बदले तसे हे सीकर-पुंज देखील आपलें स्थान बदलत. त्यामुळें पार्वतीच्या इशाऱ्याप्रमाणें शंकरानें नाचावें त्याचप्रमाणें हीं इंद्रधनुष्यें इकडून तिकडे नाचतांना दिसत होतीं. क्षणांत तीं क्षीण होत तर दुसऱ्याच क्षणीं मयासुराच्या महालाची शोभा धारण करीत. कर्माबरोबर जसें त्यांचें फळहि येतेंच, त्या-प्रमाणें प्रत्येक धनुष्याबरोबर त्याचें प्रति-धनुष्य देखील आपला वर्णक्रम बरोबर उलटा करून हजर होई. आम्ही जागा बदलली म्हणून त्या सुरधनुष्यांनीं देखील आपलें स्थान बदललें. सुरधनु आणि सुरधुनी यांची ही आल्हादजनक क्रीडा आम्हीं बराच वेळपर्यंत विस्मय-मुग्ध होऊन पहातच राहिलों. जितकें अधिक पहावें तितकी दर्शनाची तहान वाढतच जाई. तास दोन तासच येथें थांबणें

शक्य आहे हें आम्हांला ठाऊक होतें. प्रतिक्षणीं आपलें समयरूपी पुण्य क्षीण होत आहे, आणि थोड्याच वेळांत आपल्याला व्यवहाराच्या मर्त्य लोकांत परत जावयाचें आहे याचें आम्हांला पुरतें भान होतें. स्वर्गलोभी देव ज्या विषादासहित स्वर्ग-सुखाचा उपभोग घेत असतात, पराक्रमी पुरुष आपल्या यौवनाच्या उत्तरार्धांत आपल्या संकल्पांच्या पूर्तीसाठीं जसे अधीर होऊन जातात, त्याच विषादानें आणि तितकेच अधीर होऊन आम्ही सर्व त्या गंधर्वनगरीचें डोळे, कान, नाक आणि संपूर्ण त्वचेनें सेवन करूं लागलों आणि त्याचबरोबर आपल्या कल्पनेच्या द्वारा त्याच आनंदाला शत-गुणित करून त्याचा आस्वाद घेऊं लागलों.

आदल्या दिवशीं आम्ही तीन होड्या करून निघालों होतों. मधल्या होडीत स्त्रिया मुलें होतीं आणि बाजूनें चालणाऱ्या दोन होड्यांत आम्ही पुरुष मंडळीं बसलों होतों. रात्रीची वेळ होती. वर आकाशांत चंद्रमा हसत होता. त्याचें तें काव्य मुलींनीं हृदयांत साठवलें आणि तेथून तें त्यांच्या कंठातून आलापांच्या रूपानें बाहेर पडूं लागलें. प्रत्येक मुलीनें आपलें आवडतें गाणें नदीच्या सपाटी-वर तरंगत सोडलें. तो नाद कानीं पडतांच किनाऱ्यावरच्या नारळी आणि पोफळी शहारल्या आणि आपलीं उन्नत मस्तकें किंचित् लववून त्या आलापाचें पान करूं लागल्या. थकून जाईपर्यंत मुलींनीं गाणीं म्हटलीं. नंतर त्या झोपीं गेल्या. चंद्र अस्ताला गेला. सर्वत्र अंधाराचें साम्राज्य पसरलें आणि अनंत तारका आसपासच्या टेकड्यांकडे टक लावून पाहूं लागल्या. आसपासची नीरव शांति जागी होती कीं निद्रिस्त होती हें सांगणें कठीण आहे.

जेव्हां जेव्हां झोपेंतून जाग येई तेव्हां तेव्हां कधीं वल्ह्यांचा आवाज, कधी कधीं खलाशांच्या बाबूंशीं कुस्ती खेळणाऱ्या पाण्याचा आवाज तर कधीं मधूनच खलाशी एकमेकांना साद घालीत त्याचा तीव्र स्वर कानीं पडे. शेवटीं पहाट झाली. पक्ष्यांनीं आपला किलबिलाट सुरू केला. मला वाटलें, मधल्या होडींत निजलेल्या कोकिळा देखील जाग्या होतील तर किती चांगलें! माझ्या गद्य आमंत्रणाला त्यांनीं आलापांनींच उत्तर दिलें. झाडें सुद्धां रात्रींचे आलाप आठवून 'हेंच तें गेल्या रात्रीचें संगीत'. असें एकमेकांना सांगण्यासाठीं आपलीं मस्तकें हलवूं लागलीं. रात्रीचा जलविहार खरोखरच सात्त्विक, शांतिमय आणि यौवनमय होता.

उपःकालचा जलविहार देखील तितकाच सात्त्विक, शांतिमय आणि

यौवनप्रसन्न होता. उलट धबधब्याचें हें दर्शन तर अद्‌भुत भीषण आणि रोम-हर्षण होतें. आतां मुलींच्या चेहऱ्यावर प्रातःकाळची प्रसन्नता राहिली नव्हती. असें हें अद्‌भुत दृश्य घडवलें तरी कसें गेलें असेल ? खरोखरच आपण पृथ्वीतलावर आहोंत कीं स्वप्नसृष्टींत ? ' अशा प्रकारचा विस्मय त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता; एकमेकींच्या डोळ्यांकडे पाहून त्या आपला विस्मय वाढवीत होत्या आणि त्यांचा तो विस्मय पाहून आपणच जसे काय या काव्यमय सृष्टीचे विधाते आहोंत असा अभिमान आम्हांला वाटत होता.

पायथ्याशीं पोहोंचलों आणि जेवणाची वेळ झाली. आम्ही एका गावाजवळ येऊन पोंहोचलों. तेथें एक भात भरडण्याची गिरणी होती. भक, भक, भक करीत ती मिल लोकांची शांति, त्यांचें स्वास्थ्य आणि त्यांची उपजीविका भरडून टाकीत होती. आम्ही पोटभर जेवून घेतलें आणि आमची वाट पहात उभ्या असलेल्या तैलवहानांत आरूढ झालों.

वाटेंत आमच्या सारथ्यानें पेट्रोलच्या डब्यांत थोडें तेल असतांना त्यांतच पाणी भरून आणलें व मोटारींत ओतलें. पाणी तापलें आणि तेलाचा धूर पाण्यांत मिसळला. मग काय विचारतां ! पावलोंपावलीं मोटर अडूं लागली, ओरडूं लागली. धुसफुसूं लागली, आणि दुर्गंध सोडूं लागली. आम्हींदेखील कंटाळून गेलों. चिडलों, संतापलों आणि कांहीं इलाज नाहीं असें पाहून शेवटीं शांत झालों. मला बंगाली म्हण आठवली, ' जले तेले मिशखायना '. कसेबसे महामुष्किलीनें जेव्हां पाणवठ्याच्या जागीं येऊन पोहोंचलों, तेव्हां तेथें जुनें बंडखोर पाणी आम्हीं काढून टाकलें आणि एकजिनसी सज्जन पाणी भरून घेतलें. त्यानंतरचा आमचा प्रवास अगदीं सुरळीत पार पडला.

गिरसप्पाच्या धबधब्यापासून वीज उत्पन्न करावी किंवा नाहीं याची चर्चा कित्येक वर्षें चालू आहे. शरावतीचें पाणी एका बाजूला वळवून घेऊन मोठ-मोठ्या नळांतून खालीं उतरवून तेथें त्याच्या सहाय्यानें वीज उत्पन्न करण्यांत आली तर साऱ्या म्हैसूर संस्थानाला स्वस्तांत स्वस्त भावांत ती पुरवितां येईल. इतकेंच नव्हे तर उत्तर दक्षिण कानडा जिल्ह्यांना देखील तिचा पुरवठा होऊं शकेल. त्यामुळें लोकांचा फार मोठा लाभ होईल. परंतु असें करण्यानें हें अद्‌भुतरम्य प्राकृतिक दृश्य मात्र कायमचें नष्ट होईल. या दोहोंतून अधिक इष्ट गतें याचा निर्णय अजूनपर्यंत होऊं शकला नाहीं. हजारों नव्हे लाखों लोकांन

पोटभर अन्न मिळेल, शेंकडों विज्ञानवेत्त्या नवयुवकांना आपली योग्यता सिद्ध करण्याची संधि मिळेल, हजारों जनावरांची पीडा दूर होईल. एके ठिकाणीं अशा प्रकारचा कारखाना यशस्वी झाला तर हिंदुस्थानांतल्या सगळ्या प्रपातांचा असाच उपयोग करून घेतां घेईल आणि देशाला एका फार मोठ्या शक्तीचा सदैव लाभ मिळत राहील. तर मग काय केवळ एका भीषण-रम्य दृश्याच्या हव्यासानें आपण या अनेक हितकर गोष्टींवर पाणी सोडावें ? कला-रसिकतेला देखील कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं ? आपल्या राणीच्या मनो-विनोदाखातर आपली राजधानी रोम जाळून टाकणाऱ्या नीरोच्या सुल्तानी वृत्तींत आणि अशा कला-भक्तींत तत्त्वतः काय फरक आहे ?

या प्रश्नाच्या उत्तरादाखल जें सांगण्यांत येतें त्याचा उल्लेख करण्यापूर्वी थोडेंसें विषयान्तर करणें आवश्यक आहे. युरोपांत जेव्हां महायुद्ध भडकलें आणि लाखों युवक तोफाबंदुकांना बळीं पडूं लागले तेव्हां युरोपचे साहित्यशिरोमणि रोमें रोलांच्या भूतदयेला पाझर फुटला आणि दुसऱ्या लोकांप्रमाणें त्यांनीं स्वतः-देखील घायाळ लोकांच्या सेवेसाठीं थोडीबहुत व्यवस्था केली. पण उभय पक्षांच्या शत्रूंनीं जेव्हां परस्परांच्या कलापूर्ण इमारतींवर बॉंबचा वर्षाव सुरू केला, तेव्हां मात्र रोमे रोलांचा कलात्मा पुण्य-प्रकोपानें खवळून उठला आणि बुलंद आवाजानें त्यांनीं साऱ्या युरोपला बजावलें कीं, " अरे कारट्यांनो, तुम्हांला एकमेकाला मारून टाकायचें असेल तर खुशाल मारा, जगांतून कायमचें नष्ट व्हायचें असेल तर नष्ट व्हा; पण या कलाकृति म्हणजे आत्म्याच्या अभि-व्यक्तीच्या अमर कृति आहेत. त्यांच्या द्वाराच समस्त मानवी जातीचा आत्मा स्वतःला प्रकट करीत असतो; निदान यांचा तरी नाश करूं नका ! '

रोमे रोलांची ही आर्षवाणी युरपच्या आत्म्यानें ऐकली आणि युद्धमान पक्षांनीं कलाकृतींचा संहार थांबवला. आतां प्रश्न असा आहे कीं खरोखरच कला-कृति मानवी आत्म्याच्या अभिव्यक्तीच्या द्योतक किंवा प्रेरक आहेत का ? कीं त्या केवळ उच्च अभिरुचीच्या आवरणामागें दडलेल्या विलासितेचीच साधन-सामग्री आहेत ?

कलेचा ज्याला खराखुरा साक्षात्कार झाला आहे तो लागलीच उत्तर देईल कीं कला आणि विलासिता यांच्यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. आणि खऱ्या कलाकृतीच्या द्वारा जो निरतिशय आनंद होतो तो निजलेल्या आत्म्याला

खरोखर जागृत केल्यावांचून रहात नाहीं. करोडों व्हॉल्टची विद्युत्-शक्ति उत्पन्न करून लाखों लोकांच्या आजीविकेची व्यवस्था करणें कांहीं साधीसुधी गोष्ट नव्हे, पण असंख्य माणसांना कलेच्या द्वारा जो आनंद आणि जी संस्कारिता प्राप्त होते ती तर त्यांच्या आत्म्यालाच समृद्ध करीत असते.

आणि जोग कांहीं मानवी कलाकृति नव्हे. उलट कलाकारांना भव्यता आणि रम्यता यांचें एकाच वेळीं शिक्षण आणि दीक्षा देणारी प्रकृति मातेची ती एक अलौकिक विभूति आहे. तिला बिघडवणें म्हणजे पाखंडी विद्रोह करण्यासारखें आहे आणि तसें कांहीं करण्यापूर्वी आपल्याला हजार वेळां विचार करावा लागेल. जोगचा प्रपात कांहीं चालू जमान्याचीच संपत्ति नाहीं. आपल्या अनेक ऋषि-पूर्वजांनीं त्याच्या शेजारीं बसून परमेश्वराचें ध्यान केलें असेल आणि आपल्या वंशजांचे वंशज देखील त्यांचें दर्शन करून आपल्या जीवनांतील अज्ञात वृत्तींचा व शक्तींचा साक्षात्कार करतील.

उपयुक्ततावादाचा आश्रय घेऊन 'अल्पस्य हेतोः बहु हातुम् इच्छन्' असे विचारमूढ आपण बनूं नये. हा धबधबा सुरक्षित ठेवून त्यांतून जो कांहीं लाभ करून घेण्याजोगा असेल तो अवश्य करून घ्यावा. ही गोष्ट मानवी बुद्धीच्या आवाक्याबाहेरची असण्याचें कारण नाहीं. पण या तांडवयोगाच्या दर्शनापासून मानव जातीला वंचित करण्याचा धर्मतः कुणालाहि अधिकार नाहीं. मंदिरांत आपण मूर्तीची स्थापना करतों, त्याचप्रमाणें निसर्गानेंसुद्धां येथें विराट स्वरूपाच्या भव्य प्रतिमा, आपल्यापुढें स्थापन केल्या आहेत. येथें केवळ दर्शन, ध्यान आणि उपासना करण्यासाठींच यावें आणि हृदयांत तसेंच सामर्थ्य असेल तर तदाकार होऊन जावें इतकाच आपला अधिकार आहे.

मे १९३८

# जोगचा कोरडा धबधबा

कोणत्या कवीनें म्हटलें आहे आठवत नाहीं; पण त्याचा विचार माझ्या शब्दांत मांडतों.

पर्वतप्राय लाटा उसळणारा समुद्र भयानक खरा; पण जर त्याचें सारें पाणी सुकून गेलें आणि पात्र रिकामें झालें, तर हजारों मैल पसरलेले त्याचे ते खोल खड्डे किती भयानक बनतील याची कल्पना करणेंदेखील कठीण आहे. एखाद्या दुर्जनापाशीं संपत्तीचें भांडार असलें तर तो त्या संपत्तीचा दुरुपयोग करून प्रजेला छळील हें खरें, पण जर त्याच्या जवळील ती संपत्ति नष्ट झाली आणि तो अगदीं भुकेकंगाल बनला तर कोणती राक्षसी दुष्टता करण्याचें तो बाकी ठेवील ? सुदैव आपलें कीं समुद्र पाण्यानें तुडुंब भरलेला असतो आणि दुर्जनाजवळ आपल्या दुष्टतेची आग शमविण्यापुरती संपत्ति असते.

गिरसप्याच्या जोगच्या धबधब्यांपैकीं राजा आणि रुद्र धबधबे सुकलेले पाहून कवीची वरील उक्ति आठवण्याचें वास्तविक कांहीं कारण नव्हतें. पण तरीहि ती आठवली खरी.

२७ सालीं जेव्हां पहिल्या प्रथम जोगचा धबधबा पाहिला तेव्हां तो आपलें वैभव षोडषकलांनीं वोंधावत होता. पाण्याचा मुख्य प्रपात आपल्या प्रचंड जथ्यासह ८४० फूट खालीं उडी घेत होता आणि खालच्या दरींत धबधब्याच्या प्रवाहानेंच बनवलेल्या १५० फूट खोल तलावाच्या गादीवर अंग झोंकून देत होता. या मुख्य प्रवाहाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं त्याच्या दोन बाजूंस मोत्याच्या सरांप्रमाणें पाण्याच्या अनेक धारा दोन्ही अंगांनीं, नाना तऱ्हांनीं कोसळत होत्या. त्याच्या दक्षिणेस तिरप्या पायऱ्यांवरून उड्या घेत घेत रुद्र आपलें पाणी, अर्ध्या अधिक पातानंतर, राजाच्या पाण्यांत फेंकून देत होता. राजाची गर्जना जवळ जवळ खालीं पोंचल्यानंतरच उत्पन्न होते. रुद्र धबधबा रावणाप्रमाणें जन्म घेतांक्षणींच आरोळ्या ठोकूं लागतो.

हे दोन्ही धबधबे अद्भुत तर खरेच. पण त्या वेळीं अलौकिक वीरभद्राच्या उडणाऱ्या जटांचें तें दृश्य मला पुन्हां कधींच पहायला मिळालें नाहीं आणि कुठल्याहि फोटोंत देखील त्या वीरभद्री जटांचें चित्र आलेलें नाहीं.

शेवटचा प्रपात पार्वतीचा. तिला पाहिल्याबरोबर मनांत स्त्रीदाक्षिण्यच उत्पन्न व्हावें.

त्यानंतर दहा वर्षांनीं जेव्हां जोगचें पुन्हां एकदां दर्शन घेतलें, तेव्हां राजा धबधबा क्षीण बनला होता; वीरभद्राच्या जटांचें मुंडन झालें होतें; रुद्राच्या आरोळ्या कमी झाल्या नव्हत्या, पण त्याच्या त्या मोठ्या तालाचा जोगच्या क्षीण धबधब्याशीं मेळ बसत नव्हता. आणि पार्वती तर अगदींच कृशांगी तपस्विनी बनली होती.

पण या साऱ्या संकोचाचा विसर पडावा अशी खुबी धबधब्याच्या थंड वाफेंतून उत्पन्न होणाऱ्या इंद्रधनुष्यांच्या भ्रूविलासांत भरलेली होती. आम्ही ती शोभा जितक्या बाजूंनीं म्हणून पाहूं जावें, तितक्या बाजूंना आपलें तोंड फिरवून इंद्रधनुष्यें नवें नवें सौंदर्य प्रकट करीत होतीं.

पुन्हा बरोबर दहा वर्षांनंतर जोगचा तोच धबधबा पहाण्यासाठीं जेव्हां यावेळीं आम्ही गेलों तेव्हां चारांपैकीं तीन धबधबे सुकून अगदीं कोरडे ठणठणीत झालेले होते. रुद्राच्या अभावीं सगळीकडे स्मशान-शांति पसरली होती. राजा सुकून गेल्यामुळें त्याच्या मागल्या एकाखालोखाल एक अशा दोन मोठ्या दऱ्या, औरंगजेबानें बाहेर काढलेल्या संभाजीच्या डोळ्यांप्रमाणें भयानक दिसत होत्या. पार्वती जणूं काय दक्षाच्या यज्ञांत जळून भस्म झाली होती आणि वीरभद्र दक्षाचा नाश केल्यानंतर अमळ शांत होऊन आपल्या स्वामीच्या सासऱ्याच्या मृत्यूवर नीरव आसूं ढाळीत असावा तसा दिसत होता. इतकी विषण्णता महाभारताच्या युद्धानंतर कुरुक्षेत्रावर देखील पसरली नसेल.

पहिल्या वेळीं आम्ही गेलों होतों ते शिमोगा-सागराच्या रस्त्यानें, गुजरातवरील महापुराच्या संकटाच्या दिवसांत. दुसऱ्या वेळीं गेलों तेव्हां हेतुपुरस्सर समुद्राकडून उलट्या क्रमानें शरावतीच्या आंत वरच्या दिशेनें प्रवास करून. पूर्वजांनीं सांगितलें आहे : नदीमुखेनैव समुद्रम् आविशेत् । त्यांच्या या शिकवणुकीच्या अगदीं उलट शरावती-सागर-संगमापाशीं नावेंत बसून प्रतीप-क्रमानें आम्ही जोगच्या प्रपाताच्या पायऱ्यांपर्यंत पोंचलों होतों. आणि तेथून डोंगरी पायवाटेनें चढून धबधब्याच्या माथ्यावर पोंचलों होतों. या वेळची तिसरी यात्रा आम्ही तिसऱ्याच रस्त्यानें केली. शिरसीहून सिद्धपुरला जाऊन तेथून आम्ही या धबधब्याच्या मुंबई-बाजूस पोंचलों. तेथें राजाच्या मस्तकावर विराजणाऱ्या

एका मोठया शिळेवर आडवे निजून खालचें रोमहर्षक दृश्य पाहिलें. कोनाड्या-सारख्या विक्राळ दरीच्या माथ्यावर पोंचून आंत डोकावतांना साऱ्या शरीराला कंप सुटतो. ही शिळा आपल्याच भारानें कोसळली तर! अशी शंका मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

या शिळेच्या शेजारीं तितकीच मोठी आणि तितक्याच भयानक जागीं उभी असलेली दुसरी एक शिला आहे. तिच्यावर प्राचीन काळीं कोण्या एका राजानें लग्न-मंडप उभारला असेल. मात्र त्या मंडपाचे चार खांब बसविण्यासाठीं म्हणून केलेल्या चार छिद्रांचे मोठे चौरस त्या शिळेवर आढळतात. भयानक धबधब्याच्या कड्याच्या कांठावर मंडप उभारून लग्न करणाऱ्या राजाच्या काव्य-मय वृत्तीचें कौतुक करावें तितकें थोडेंच! अशा शौकिन राजाशीं लग्न करणाऱ्या राजकन्येच्या मनांत या मंडपांत बसल्या बसल्या कसकसले भाव उमटले असतील! कुणीसें म्हटलें, 'भीषण रसाची गोडी असलेल्या त्या राजाचें नांव या धबधब्याला ठेवण्यांत आलें आहे.' मीं मनाशीं विचार केला कीं, तर मग त्याच्याशीं विवाहबद्ध झालेल्या राजकन्येचें नांव आपल्याला माहीत नाहीं याचा लाभ घेऊन, तिलाच आपण पार्वती कां म्हणूं नये? पार्वतीच्या कड्याच्या किनाऱ्यावर तिचा विवाह झाला इतकें कारण पुरेसें नाहीं?

पर्वतांत कोनाड्यासारख्या दऱ्या मीं बघितल्या नाहींत असें नाहीं. मशिदींत सुद्धां भिंतींत खळगा करून त्याच्या भोंवतीं मेहराब करतात. परंतु राजाच्या खालचा कोनाडा तर काळपुरुषाच्या तोंडापेक्षांहि मोठा आणि शिवाय बोळकें झालेला! त्याच्या आंत जेथें जागा सांपडेल तेथें पक्षी आपलीं घरटीं बांधतात आणि टिपून आणलेले परिपक्व धान्याचे दाणे सांठवतात.

मुंबई-बाजूनें म्हणजेच उत्तरेकडील बाजूनें डोळेभर पाहून घेतल्यानंतर मोटारींत बसून आम्ही पूर्वेकडे गेलों. तेथें दोन होड्या मिळून बनविलेल्या एका तराफ्यावर (अशा तराफ्याला येथें जंगल म्हणतात. अशा जंगलावर) आमची मोटार चढवून आम्ही शरावती नदी पार करून दक्षिण किनाऱ्यावर आलों. तेथून म्हैसूर सरकारच्या अतिथिशाळेजवळून त्या साऱ्या दरीचें दृश्य पुन्हां एकदां पाहिलें. वीस वर्षांपूर्वी याच ठिकाणावरून राजा, वीरभद्र आणि पार्वती यांचें देवदुर्लभ दृश्य पाहिलें होतें. यावेळच्या कोरड्या दृश्यांत काव्य नव्हतें, असें नाहीं. एकाखालोखाल एक असे दोन मोठे कोनाडे ४८० फुटांचें पतन

मोजून काढीत आहेत असें दृश्य विधात्याच्या विविध सृष्टींत सहजासहजीं थोडेंच बघायला मिळणार होतें ?

माझ्या मनांत दाटलेला विषाद दरींतल्या झाडांवर मला आढळला नाहीं. दोन्ही कोनाड्यांत गोलगोल घिरट्या घालणारे पक्षी देखील विषण्ण वाटत नव्हते. आकाशांत तरंगत राहून धबधब्याच्या दरींत डोकावणारे ढग देखील गंभीर दिसत नव्हते. तर मग पोकळपणाचें तें दृश्य पाहून मींच कां इतका अस्वस्थ होत आहें ? वीस वर्षांपूर्वी पाहिलेली पाण्याची समृद्धि आठवून ? कीं दहा वर्षांपूर्वी बघितलेला इंद्रधनुष्यांचा चमत्कार आठवून ? पण ती जलसमृद्धि आणि तो वर्णसंकर कायमचे थोडेच नाहींसे झाले आहेत ? हजारों वर्षें दर उन्हाळ्यांत असें कोरडेंपण पहावयास मिळत असेल आणि दर पावसाळ्यांत भारंगी साऱ्या दरीला जळबंबाळ करून टाकीत असेल. अशी ही घटमाळ चालतच रहाणार. तत्र का परिदेवना ?

जोगच्या धबधब्याच्या या तिसऱ्या दर्शनानंतर इथल्या इतिहासाचा नवा अध्याय आम्ही उघडला.

वीस वर्षांपूर्वी मी ऐकलें होतें कीं या धबधब्याच्या पाण्यापासून वीज उत्पन्न करण्याचा म्हैसूर सरकारचा विचार आहे. मुंबई सरकार आणि म्हैसूर सरकार यांच्यामधें या बाबतींत पत्रव्यवहार चालू आहे. या दोन सरकारांचें एकमत झालें नाहीं, म्हणूनच विजेची ही योजना अजून अमलांत आली नाहीं.

त्यावेळीं मीं मनांत प्रार्थना केली होती कीं देव करो आणि ते दोघे कधींच एकमत न होवोत. वीज उत्पन्न करून कारखाने चालतील आणि देशाची समृद्धि वाढविण्याच्या नांवाखालीं देशांतील गरिबांची पिळवणूक होईल अशी भीति माझ्या मनांत होती. पण त्याहूनहि अधिक भीति होती ती ही कीं यंत्रें आल्यामुळें धबधबा खुंटून जाईल आणि निसर्गाचें हें भव्य दर्शन कायमचें नष्ट होईल, पण सुदैवानें माझी ती भीति खरी ठरली नाहीं.

इंजिनियर लोकांनीं धबधब्याच्या बऱ्याच वर एक बांध बांधून पाण्याचा समुदाय अडविला आहे. अजून हें काम पुरें झालें नाहीं. बांध बांधून अडविलेल्या पाण्याचे चार कालवे एका बाजूला घेऊन जाऊन म्हैसूर-बाजूनें धबधब्यापासून चांगले दूर टेकडीवरून खालीं सोडून दिले आहेत—धबधब्याच्या रूपांत नव्हे, तर तिरकस उतरलेल्या अगडबंब चार नळांच्या द्वारां.

नळाच्या द्वारां पाणी जेथें पोंचतें, तेथें त्या पाण्याच्या वेगानें चालणारीं यंत्रें बसवून त्यांतून वीज उत्पन्न केली जाते. आतां इतकी कांहीं वीज उत्पन्न होईल कीं म्हैसूर राज्याची भूक भागवून, थोडीशी वीज हैद्राबाद राज्याला देखील देतां येईल. आणि मुंबई सरकारच्या होन्नावरच्या सरहद्दीवरून शरावती नदी जाते एवढ्यासाठीं म्हणून अमुक हजार किलोवॅट वीज मुंबई सरकारला देखील देण्यांत येईल. न्यायाच्या दृष्टीनें पाहूं जातां या विजेवरील पहिला हक्क होन्नावर तालुक्याचा आणि कारवार जिल्ह्याचा. पण हे जिल्हे औद्योगिक दृष्टीनें अजून विकास पावलेले नसल्यामुळें ही वीज धारवाड जिल्ह्याला देण्याचें नक्की झालें आहे. त्यामुळें कारवार जिल्ह्याचे लोक नाराज झाले आहेत. कारवार जिल्ह्याची खनिज संपत्ति आणि उद्भिज्ज संपत्ति धारवाड जिल्ह्यापेक्षां कितीतरी पटींनीं अधिक आहे. त्याला समुद्रकिनारा असल्यामुळें व्यापारहि चांगला भरभराटण्याची शक्यता आहे. कारवार जिल्ह्यांत काळी, गंगावळी, अघनाशिनी आणि शरावती या चार नद्या नौकानयनासाठीं अनुकूल असल्यामुळें या जिल्ह्याचें उद्योगी-करण करणें फार सोपें आहे. पण आज त्या जिल्ह्यांत छोटे उद्योग नाहींत. असें सांगून त्याला वीज देण्याचें नाकारण्यांत येत आहे आणि त्याच्यापाशीं वीज नाहीं म्हणून तेथें उद्योगांचा विकास होणें शक्य नाहीं असेंहि त्याला ऐकविण्यांत येत आहे. तामिळ भाषेंतील एका म्हणीप्रमाणें ' लग्न होत नाहीं म्हणून मुलीचें वेड जात नाहीं आणि वेड दूर होत नाहीं म्हणून मुलीचें लग्न होत नाहीं. ' तशांतली ही गत झाली आहे.

मी आशा बाळगतों कीं स्वराज्यसरकारकडून या अन्यायाचें निराकरण होईल आणि कारवार जिल्ह्याला शरावतीची वीज मिळूं लागेल. याशिवाय कारवार-जवळ उंचळ्ळी, मागोडसारखे दुसरे देखील लहान मोठे तीनचार चांगले धबधबे आहेत. शरावतीची वीज मिळाली कीं तिच्या मदतीनें इतर धबधब्यांनाहि वेसण घालतां येईल. आणि मग कारवार जिल्ह्यांत पावसाप्रमाणें वीजहि भरपूर होईल. जेथें चार नद्या पर्वतप्राय उंचीवरून धाडदिशीं खालीं पडतात तेथें आज ना उद्यां मनुष्य व्यापारी वीज उत्पन्न केल्याशिवाय रहाणार नाहीं.

मला संतोष वाटला तो एवढ्यासाठींच कीं शरावतीच्या पाण्यांतून वीज उत्पन्न करूनसुद्धां जोगचें नैसर्गिक स्वरूप रतिमात्र देखील खंडित होणार नाहीं. बांधामुळें वाटेल तितकें पाणी अडवून ठेवण्यांत आलें तरी देखील नेहमींच्या

प्रवाहांतलें पाणी कमी होत नाहीं. पावसाळ्यांतलें पाणी भरून घेतल्यानंतर नेहमींचा प्रवाह नेहमींप्रमाणें वाहणार. त्यांत प्रवाहाची दिशा, गति किंवा पाण्याचा जथा कशांतहि कमतरता येणार नाहीं. उलट लाभ होईल तो असा कीं उन्हाळ्याच्या दिवसांत हजारों वर्षें सुकून जाणाऱ्या धबधब्याला एखाद्या दिवशीं मनांत आणलें तर बांधाच्या खजिन्यांतून पाणी सोडून वाटेल तितक्या प्रचंड आणि तुफानी स्वरूपांत समूर्त करतां येईल, आणि मग त्याला पाहून आकाशांतल्या उन्हाळ्यांतल्या उष्मपा देवांनाहि आश्चर्यानें तोंडांत बोटें घालावीं लागतील !

धन्य आहे मानवी विज्ञानाची !

एप्रिल १९४७

❦ ❦ ❦

## चतुर्थ पाद

---

## उंचळ्ळीचा धबधबा

अगदीं सुकून गेलेल्या जोगच्या धबधब्याच्या या वेळच्या दर्शनाची विषण्णता धुऊन काढण्यासाठीं दुसरें एखादें कांहींसें भव्य आणि प्रसन्न दृश्य पहाणें आवश्यक होतेंच. कारवार जिल्ह्याच्या सर्वसंग्रहाचीं (गॅझेटियरचीं) पानें चाळतां चाळतां शोध लागला कीं जोगपेक्षां किंचित् उतरता उंचळ्ळी नांवाचा एक मजेदार धबधबा शिरसीहून फार दूर नाहीं. लशिंग्टन नांवाच्या एक कलेक्टरनें सन १८४५ त या धबधब्याचा शोध लावला होता ! जणूं काय त्याआधीं एखाद्या माणसानें तो धबधबा पाहिलाच नसेल ! इंग्रज माणसाच्या नजरेस तो पडला म्हणून त्याला दुनियेंत स्थान मिळालें !

ही उंचळ्ळी आहे कोठें ? तेथें कोठून जायचें ? कसें जायचें ? आमच्या कार्यक्रमांत हा धबधबा बसतो किंवा नाहीं ? याची चौकशी मी सुरू केली. श्री. शंकरराव गुलवाडींनीं ताडलें, कीं आतां उंचळ्ळीचा कार्यक्रम ठरविल्याशिवाय

शांति किंवा स्वास्थ्य लाभणार नाहीं. आणि माझ्यापेक्षां त्यांचा उत्साह कमी थोडाच होता! त्यांनीं सांगितलें कीं वीज उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें कारवार जिल्ह्याच्या धबधब्यांची पहाणी–सर्व्हे–झाली तेव्हां इंजिनीयर लोकांनीं उंचळ्ळीच्या धबधब्याला पहिलें स्थान दिलें होतें; गिरसप्पाच्या म्हणजे जोगच्या धबधब्याला दुसरा क्रमांक दिला; मागोडला तिसरा, आणि सूपाजवळ आहे तो चौथा.

समुद्राबरोबर कारवार जिल्ह्याची मैत्री जुळवून देणाऱ्या चार मुख्य नद्या आहेत. काळी नदी, गंगावळी, अघनाशिनी आणि शरावती. यांपैकीं शरावती अथवा बाल्नदी होन्नावरपाशीं समुद्राला मिळते. दहा वर्षांपूर्वी जेव्हां दुसऱ्यांदा जोगचा धबधबा पाहिला होता तेव्हां याच शरावती नदीमधून नावेंत बसून होन्नावर पाहून वरच्या दिशेनें आम्ही आंत गेलों होतों. शरावतीचें तीर म्हणजे वनश्रीची मेजवानी!

या वेळीं जेव्हां हुबळीहून अंकोला आणि कारवारकडे आम्ही गेलों होतों त्यावेळीं आरवेळ घाटांतून नागमोडी वाट काढीत जाणारी गंगावळी आम्ही बघितली होती. आणि अंकोल्याहून गोकर्णला जातांना तिच्या पृष्ठभागावर नौका-विहार देखील केला होता. पन्नास वर्षांपूर्वीच्या त्या आठवणी दहा वर्षांपूर्वी ताज्याहि केल्या होत्या आणि त्यावेळीं कारवारला गेल्याबरोबर काळी नदीचें दोनदां दर्शन घेतलें होतें. पण एवढ्यानें समाधान झालें नाहीं, म्हणून कारवार-पासून हळ्ग्यापर्यंतचा दहा मैलांचा प्रवास जाऊनयेऊन होडींतूनच केला. . . .

चौथी नदी अघनाशिनी. तिचें नांवच किती पावन! ती नदी गोकर्णाच्या दक्षिणेस तदडी बंदरापाशीं आडवी तिडवी अस्ताव्यस्त खूप पसरते, पण समुद्रा-पर्यंत पोहोंचण्यासाठीं मात्र तिला एक लहानच मार्ग सांपडतो. समुद्राला भेटण्या-साठीं त्वरा करून ही अघनाशिनी सह्याद्रि पर्वतावरून जेथें खालीं उडी घेते, तोच उंचळ्ळीचा धबधबा होय.

आम्ही सिद्धापुरहून शिरसीचा रस्ता पकडला. पण शिरसीपर्यंत जाण्याच्या ऐवजीं, पश्चिमेकडे फुटणाऱ्या एका रस्त्यानें आम्ही शिरसीला पोहोंचलों. तेथें गोपाळ माडगांवकरांचे काका रहात होते. तेथले एक चांगले प्रतिष्ठित जमीनदार. त्यांच्या आगत-स्वागताचा स्वीकार करून आम्ही उंचळ्ळीच्या शोधांत निघालों. नीलकुंदहून होसतोट ( नवें उद्यान ) ला जायचें होतें. लष्करी जीपची सोय झालेली असल्यामुळें जंगलांतील रस्ता पार कसा होईल याची चिंता जवळ जवळ-

दूर झाली होती. या होसतोटहून होन्नेकोंब ( सोन्याचें शिंग ) कडे जाणाऱ्या रस्त्यानें आम्हांला जावयाचें होतें. पण या रस्त्यानें मोटार तर दूरच, पण बैलगाडी किंवा पालखी सुद्धां जाऊं शकत नाहीं. त्याला तर वाघाची पांदी म्हटलें पाहिजे. माणसाला सुद्धां वाघासारखें बनूनच अशा वाटेनें जाणें भाग पडतें. आम्ही आमच्या जीपला एका झाडाच्या छायेंत विसावा घेत ठेवलें आणि ' अथा तो प्रपातजिज्ञासा ' असा संकल्प सोडून जंगलांतून वाट काढायला सुरवात केली. होसतोटहून एक स्थानिक तरुण हातांत कोयता घेऊन वाट दाखविण्यासाठीं म्हणून आमच्यापुढें निघाला. त्याला बिचाऱ्याला सावकाश चालण्याची संवय नाहीं आणि सृष्टिसौंदर्य न्याहाळण्याचें वेड नाहीं. तो आपला पुढें पुढें निघून गेला. आम्हांला त्याचा फारच थोडा उपयोग झाला. आम्ही थोडेसें पुढें गेलों, चढलों आणि उतरलों–उतरलों आणि चढलों-तेथून जंगल घनदाट होऊं लागलें. थोड्या वेळानंतर तें घनघोर बनलें.

So steep the path, the foot was fain,
Assistance from the hand to gain.

आमची मुख्य अडचण होती पायतळींची वाट. तिथें इतकीं कांहीं सुकलेलीं पानें गोळा झालेलीं होतीं कीं पाय घसरला नाहीं तरच नवल ! त्या पानांतून सळसळत एखादा सर्प बाहेर निघाला नाहीं ही ईश्वराची कृपाच होय. नाहीं तर आमची उंचळ्ळी तेथेंच आटपली असती. जेथें अवघड उतार असेल तेथें काठीनें पानें बाजूस सारून एखादा मजबूत दगड किंवा झाडाचें चिवट मूळ मिळतें कीं काय तें पहावें लागे.

दुपारची बारा वाजण्याची वेळ होती. पण तरूंच्या ' स्निग्धच्छायां ' मधून उन्हाला आंत शिरकाव मिळेल तर ना ? आम्ही चालून चालून गरम झालेले नसतों तर थंडीच लागली असती. थोडें पुढें जायचें आणि एकमेकांना विचारायचें, ' आपण किती चालून आलों ? अजून किती बाकी आहे ? ' सगळेंच अज्ञान. पण सिद्धापुरहून एक आयुर्वेदिक डॉक्टर कॅमेरा घेऊन आमच्या-बरोबर आले होते. ते गृहस्थ एका वर्षापूर्वीं दुसऱ्या कोणत्या तरी रस्त्यानें उंचळ्ळीला गेले होते. तेवढ्या जुन्या अनुभवाच्या भांडवलावर ते आम्हांला बाकी किती रस्ता उरला याचा अंदाज सांगत होते ! मधून मधून आमची नांवापुरती

वाट देखील बंद होई. पुढें कसें जायचें याचा अंदाजच करावा लागे. पण खरें संकट वाट बंद झाल्यामुळें उभें रहात नसे; पण जर एका वाटेला दोन वाटा फुटत असल्या, आणि खरी वाट कोणती हें सांगणारें कुणी सोबत नसलें, अन् आंधळा अंदाज बांधणाऱ्या आपल्या सोबत्याच्या अभिप्रायाशीं आपला तितकाच आंधळा अंदाज जुळत नसला, तर मग मन दुग्ध्यांत पडतें. आणि शेवटीं 'यद् भावि तद् भवतु'–जें व्हायचें असेल तें होवो–असें म्हणून नशिबावर हवाला टाकून एखादी वाट धरावी लागते.

कुणीसें म्हणालें कीं दुरून धबधब्याचा आवाज ऐकूं येत आहे. माझे कान फार तिखट नाहींत. एकानें केव्हांच राजीनामा दिला आहे आणि दुसरा कान कामापुरतेंच ऐकूं शकतो. पण कल्पनाशक्तीविषयीं असें कांहीं म्हणतां येणार नाहीं. कल्पना आणि कान या दोवांच्या जोरावर मीं ऐकण्याचा प्रयत्न केला, पण ज्याला धबधब्याचा आवाज म्हणतां येईल असें कांहींहि कानीं पडलें नाहीं. कुठें मधमाश्या भणभणत असत्या तरीदेखील मीं म्हटलें असतें कीं, 'होय, होय, धबधबा ऐकूं येत आहे खरा.' अडचणीच्या प्रवासांत सोबत करणाऱ्या लोकांशी चट्कन् सहमत होणाऱ्या यात्राधर्मावर माझा संपूर्ण विश्वास आहे! पण येथें माझा नाइलाज झाला.

एकीकडे मी जंगलाच्या भीषण सुंदरतेचा आस्वाद घेत होतों आणि दुसरीकडे चि. सरोजचे किती हाल होत असतील या चिंतेनें तिच्याकडे पहात होतों. जेव्हां सरोज म्हणाली कीं, 'अशा जंगलांतील प्रवासाच्या शेवटीं एखादा धबधबा जरी पहायला सांपडला नाहीं तरीदेखील येथें येणें सार्थकीं लागलें असें मानावें लागेल. किती मजेदार आहे हें जंगल! हे मोठे मोठे वृक्ष आणि त्यांना बांधणाऱ्या वेली–सारेंच मजेदार आहे.' तेव्हां माझा जीव भांड्यांत पडला.

पुढें गेल्यावर जेव्हां वाट फारच बिकट झाली आणि एका हातात काठी आणि दुसऱ्या हातानें कुणाच्या तरी खांद्याचा आधार घेऊन उतरणें देखील अशक्यप्राय झालें, तेव्हां सुद्धां सरोज म्हणे, 'माझा उत्साह कमी झालेला नाहीं, पण दुसऱ्यांना मी अडचणींत टाकीत आहे हा विचारच मला फार अस्वस्थ करीत आहे. इतका उतार पुन्हा चढायचा आहे हेंहि विसरतां कामा नये.'

मीं म्हटलें, 'एकदां उंचळ्ळीचें दर्शन घेतल्यानंतर परत फिरण्याची व्यवस्था कशीतरी होईलच. आपण पुरेसा विसावा घेत घेत जाऊं. येथवर इतक्या दूर

आलोंच आहोंत आणि धबधब्याचा आवाजसुद्धां ऐकूं येऊं लागला आहे. तेव्हां पुढें जाण्यावांचून गत्यंतर नाहीं.'

आमच्या वाटाड्यानें खालीं जाऊन 'कूक्' केलें. डॉक्टर म्हणाले, 'त्यानें पाणी पाहिलें असावें.' आमच्या उत्साहांत भर पडली. आम्ही पुन्हा उतरलों, आणखींच उतरलों. पुढें गेलों, नंतर उजव्या बाजूस वळलों आणि शेवटीं—ज्याच्यासाठीं डोळे व्याकुळ झाले होते त्या धबधब्याचें डोकें दृष्टीस पडलें!

एका अरुंद दरीच्या या बाजूस आम्हीं होतों आणि समोरच्या बाजूनें, आम्ही सकाळपासूनच्या जीपच्या प्रवासांत तीनदां ओलांडलेलें, अघनाशिनीचें पाणी मोठ्या दगडांच्या एका तिरप्या थरावरून खालीं पोहोंचण्याच्या तयारींत होतें. गाणें जसें तंबोऱ्याच्या साथीवरच ऐकायचें असतें, त्याचप्रमाणें धबधब्याचें दर्शन करायचें असतें तें धब्धब्च्या नगाऱ्याच्या साथीवरच.

उंचळ्ळीचा धबधबा जोगच्या राजा धबधब्याप्रमाणें एका झेंपींत खालीं पोंचत नाहीं. पहांटेच्या साखरझोपेच्या प्रत्येक तुकड्याची जशी अर्ध जागृता-वस्थेंत आपण चव घेत असतों, त्याचप्रमाणें अघनाशिनीचें पाणी प्रत्येक पायरीवर उड्या घेत घेत पांढऱ्या रंगाचा विविध छटांनीं भरलेला पडदा, तयार करतें. इतक्या पांढऱ्या शुभ्र पाण्यांत जगांतले काळ्यांतलें काळें 'अघ'—पाप सुद्धां सहज धुऊन निघेल.

सूप तिरपें तिरपें हलवीत धान्य पाखडतात तेव्हां धान्याचे दाणे जसे नाचत नाचत उजव्या बाजूच्या कोपऱ्यांत धांवत सुटतात आणि त्याबरोबरच पुढें देखील जातात त्याचप्रमाणें येथलें पाणी पर्वताच्या खडकांमधून उतरतांना तिरपेंहि धांवतें आणि फेसांचीं वलयें मिरवीत खालीं उडीहि घेतें. एका ठिकाणीं पाणी येऊन अवतरलें कीं लगेच तें तेथें अंगरख्याच्या घेराव्याप्रमाणें किंवा धोतराच्या कासोट्याप्रमाणें फुगूं लागतें आणि अनुकूल दिशा मिळवून पुन्हां झेंप घेतें.

आतां तर तें पाणी असे किती नखरे करणार आहे आणि शेवटीं कोठवर पोहोंचणार आहे तें जाणून घेतल्यावांचून गत्यंतरच नव्हतें. आमच्यापैकीं कांहीं पुढें निघाले. पुन्हां उतरा, आणखी उतरा; झाडांच्या लवचिक फांद्या पकडून उतरा. असें करतां करतां संपूर्ण धबधब्याचा अखंड साक्षात्कार घडविणाऱ्या एका मोठ्या शिळेच्या माथ्यावर आम्ही जाऊन पोहोंचलों. या कड्याच्या

माथ्यावर उभे राहून समोरील कड्यावरून अवतरणाऱ्या पाण्याचा पदक्रम न्याहाळणें हें जीवनांतील एक अहोभाग्य होतें. आम्ही टक लावून पाण्याकडे पहात होतों, पण पाणी कांहीं आम्हांला पहात बसायला रिकामें नव्हतें. तें होतें आपल्या मस्तींत चूर. कापराच्या रंगांत जो पांढऱ्या रंगाचा उत्कर्ष असतो तोच या जीवनावतारांत होता.

भगवान सूर्यनारायण वरून आम्हांला आपले आशीर्वाद देत होते. कानशिलांवरून घामाच्या धारा कितीहि निथळूं लागल्या तरी समोरच्या धबधब्यापुढें त्या कुणाचें लक्ष थोडेंच वेधून घेऊं शकणार ? सूर्यनारायणाचे आशीर्वाद झेलण्याची शक्ति जशी उंचळ्ळीच्या धबधब्यांत होती तशी माझ्यांत नव्हती. पाणी चकाकून शुभ्र रेशमाची किंवा सॅटीनची शोभा दाखवूं लागलें. A moving tapestry of white satin and silver filigree.

कटकमध्यें चांदींतून बारीक बारीक तारा खेचून त्यांचे अतिशय नाजूक व अत्यंत मोहक दागिने तयार करतात. तारांचीं पिंपळपानें, कमळें, करंडे—असे नाना प्रकार मी ओरिसामधें डोळे भरून पाहिले आहेत, आणि म्हटलें आहे, "या दागिन्यांनीं कटकचें नांव सार्थ ठरलें आहे खरें.'

निसर्गाच्या हातून घडणारें आणि क्षणोक्षणीं नवे नवे आकार करणारे रुप्याचे सुंदर व जिवंत दागिने पुन्हां एकदां पाहून कटकचें स्मरण झालें. सोन्याच्या झांकणानें सत्याचें रूप झांकलें जात असेल, पण रुप्याच्या या जिवंत तार-कामांतून निसर्गाचें सत्य अद्भुत प्रकारें प्रकट होत होतें. 'आतां या सत्याचें काय करूं ? त्याचें कसें प्राशन करूं ? त्याला कोठें सांठवून ठेवूं ? कसें उचलून घेऊन जाऊं ? अशा गोड संभ्रमांत मीं सांपडलों होतों. इतक्यांत जुन्या संवयीमुळें, अहेतुकपणें, कंठांतून ईशावास्याचा मंत्र जोरानें घुमूं लागला. होय, खरोखर हें सारें जगत् त्याच्या 'ईशा' नें झांकलेंच पाहिजे—समोरचा तिरकस थर असलेला खडक जसा पाण्याच्या पडद्यानें झांकला जात आहे, आणि तो पडदा जसा चैतन्याच्या चकाकीनें झांकला जात आहे, जें जें नजरेस पडतें—मग ती चर्मचक्षूची नजर असो किंवा कल्पनेची दृष्टि असो—तें सारेंच आत्मतत्त्वानें झांकून टाकलें पाहिजे. तरच अलिप्त भावानें अखंड जीवनाचा शेवटपर्यंत आस्वाद घेतां येईल. 'तुला देहवंताला याहून दुसरा मार्ग नाहीं.'

नजर खालीं वळली तों तेथें एक शीतल कुंड हिरव्या निळसरपणांत

धवधब्याचें पाणी झेलीत होतें, आणि परिग्रह बरा नव्हे अशी जाणीव झाल्यामुळें थोडयाच वेळांत एका सुंदर प्रवाहांत तो सारा जथा प्रवाहित करीत होतें. अघनाशिनी आपल्या वांकडयातिकडया प्रवाहाच्या द्वारा आसपासची सारी भूमि पावन करण्याचें आणि मनुष्यजातीचें वांकडेंतिकडें ( जुहुराण ) पाप ( एनस ) धुऊन काढण्याचें आपलें व्रत अविरत चालवीत होती. मीं तिलाच शेवटीं प्रार्थना केली,

युयोधि अस्मत् जुहुराणम् एन:
भूयिष्ठां ते नम उक्ति विधेम।

हे अघनाशिनी ! आमचें वांकडेंतिकडें कुटिल पाप झुंजून काढून टाक. आम्ही तुझ्यासाठीं अनेकानेक नमस्कारांचीं वचनें रचूं !

जून १९४७

## पंचम पाद

# धुवांधार

इजा, विजा, तिजा ! धुवांधर अलीकडे तिसऱ्यांदा पाहून घेतला. धुवांधार नांव चांगलें आहे. नांवांतच सगळें दृश्य येऊन जातें. पण यावेळीं तो प्रपात पाहतां पाहतां वाटलें कीं धारधुवां कां म्हणूं नये ? आधीं धार पडते, मग त्यांतून कारंजीं उडतात आणि लगेच तुषार बनून धुक्यासारखे लोळ हवेंत तरंगूं लागतात, म्हणून धारधुवां हेंच नांव अगदीं नेमकें आहे. पण नेमकें असलें तरी तें नांव चालणार नाहीं !

जबलपूरहून तेथले गोल गरगरीत दगड आणि चमचमणारे तलाव पहात पहात आपण नर्मदेच्या कांठीं येऊन पोहोंचतों. रस्त्यामधलें दृश्य सांगतें कीं ही काव्यभूमि आहे. जिथें पहावें तेथें लहानमोठीं झाडें खेळ खेळत उभीं आहेत. जवळच एक मोठी दरड कोसळून पडलेली आहे. पण तिच्या माथ्यावर उगवलेलीं

झाडें आपलीं मुळें अर्धवट तुटून गेलीं असतांनाहि जरासुद्धां दुःखीकष्टी किंवा चिंतातुर दिसत नाहींत. अशा झाडांपासून जीवनदीक्षा घेऊन पुढें गेलें पाहिजे.

दरड जरी कोसळली तरी तुटलेला भाग कांहीं सहजासहजीं जमीनदोस्त होत नसतो. त्यानें एक दोन मनोरे आणि एक मोठें शिखर बनवून ठेवलें आहे, जें म्हणत असतें कीं विनाशामधून देखील जर नवी सृष्टी आम्ही पैदा केली नाहीं तर आम्ही कल्प-कवि कसले? दरडीवरून खालचें दगडा-पाण्याचें दृश्य स्वाभाविकपणें दृढतेचे आणि तरलतेचे विचार एकाच वेळीं मनांत उत्पन्न करीत होतें. पूल ओलांडून पुढें आलों आणि योगिनींच्या टेकडीच्या पायथ्याचें अनेकदां पाहिलेलें बाजारी दृश्य पाहिलें. हें दृश्य इतकें केविलवाणें आहे कीं त्याच्याबद्दल चीड देखील उत्पन्न होत नाहीं. येथले गरीब कारागीर दगडांच्या लहान मोठ्या वस्तु बनवून विकण्यासाठीं बसतात. पांढऱ्या, काळ्या, लाल, आकाशी आणि रंगीबेरंगी संगमरवरी अंडाकृति वाणांच्या शेजारीं शंखजिऱ्याच्या डब्या, शिवालयें, हत्ती आणि अशींच लहानमोठीं खेळणीं स्वयंवर मांडून उभीं असतात. ज्याच्या नजरेस तीं पडतात तो त्यांना उचलून घेऊन जातो. हीं सगळीं खेळणीं आज एकाच आसनावर बसलेलीं आहेत. उद्यां उठून कोठलें खेळणें कुठें जाईल कोण जाणें! कित्येक तर हिंदुस्थानबाहेर देखील जातील आणि तेथें कित्येक वर्षें धुवांधारचें धारावाहिक संगीत पुनःपुनः आठवून मुक्तपणानें तें ऐकवतील.

दोनदां येथून धुवांधारपर्यंत चालत जाण्याची तपश्चर्या केली होती. पहिल्या वेळचा प्रवास रात्रीचा केला होता. दुसऱ्या वेळचा सकाळीं आंघोळीच्या वेळीं. प्रत्येकाचें काव्य वेगळें. यावेळीं तिसरा प्रहर पसंत केला होता. या खेपेस अधिक तपस्या करावी लागली नाहीं. ब्योहार राजेंद्रसिंहजींनीं आपलें तैलवाहन (मोटर) आमच्या स्वाधीन केल्यामुळें जवळजवळ धुवांधारपर्यंत आम्ही विनासायास पोहोंचलों. शंखजिऱ्याच्या शेताजवळ उतरून, तेथल्या माळरानांतील तीन दुकानें मागें टाकून, दगडांमधून वाट काढीत आम्ही धुवांधारला पोंचलों. दगड जसजसे अडथळे उत्पन्न करीत तसतशी आमच्या चालण्याच्या उत्साहांत भर पडे. असें करतां करतां आम्ही धुवांधारला जाऊन पोंचलों.

प्रपात म्हणजे जीवनाचा अधःपात, पण येथें तसें कांहीं वाटत नाहीं. पहिल्या

वेळीं गेलों होतों तो डिसेंबर महिन्यांत आणि अंधारांत. आकाशांतील ढग चंद्राविरुद्ध कट करून बसले होते, त्यामुळें चांदणी रात्र असूनहि तेथें अमावास्येची भीषणता पसरलेली होती. अमावास्येच्या रात्रीं आकाशांतले तारे त्या भीषणतेला हंसण्यावारी नेत असतात. पण ढगांमुळें ती देखील आशा उरली नाहीं. परिणामीं त्या रात्रीं धुवांधारलाच आपल्या भव्यतेनें आम्हांला प्रसन्न करावें लागलें होतें. रात्रीची प्रार्थना करून आम्ही तो आनंद आत्मसात केला आणि परत आलों.

दुसऱ्या वेळीं गेलों होतों तें त्रिपुरी कॉंग्रेसनंतर, नऊ दहा वाजण्याच्या सुमारास वाढत्या उन्हाच्या स्वागताचा स्वीकार करीत. धुवांधारचें संपूर्ण दर्शन असें त्याच वेळीं करूं शकलों होतों. मार्च महिना होता त्यामुळें पाण्याला उन्हाळी दुष्काळाची बाधा झालेली नव्हती. कड्याच्या कांहीं खडबडीत पायऱ्या उतरून खालून आम्ही धुवांधार कसा पडतो तें पाहून घेतलें. पाण्याचा तो वेग आणि कारंज्यांची ती चंचलता आश्चर्यकारक रीतीनें मनाला स्थिर करते. पाण्याकडे सारखे पहातच राहिलें कीं मग अनुभवास येतें कीं नवनवोन्मेषशालिनी धारा वेगाची समाधि लावून उभ्या आहेत. त्याच वेळीं मला दिसून आलें कीं तेथले शेवाळलेले दगड वरून कसेहि दिसत असोत आंतून मात्र प्रेमाचा रंग खुलवीत असावेत तसे लाल आहेत. पाण्याच्या आवेगानें दगडाची एक खपली उडाली आणि जणूं काय जखम झाली असावी त्याप्रमाणें आंतला गुलाबी रंग स्पष्ट दिसूं लागला.

धुवांधार पहाण्याचा उत्तमांत उत्तम ऋतु म्हणजे दिवाळीचा. पाऊस नसल्यामुळें रस्त्यांत कुठेंहि चिखल नसतो. पावसाळ्यांत सारा प्रदेश जलमय होत असल्यामुळें धबधब्याला वेगळें स्थानच उरत नाहीं. जेथें आज अंतःकरण हलवून सोडणारा धबधबा आहे, त्याच ठिकाणीं पावसाळ्यांत डोकें चक्कर येऊन भ्रमूं लागावें असे भोंवरे दिसत असले पाहिजेत. त्या भोंवऱ्यांचें रुद्र स्वरूप पहाण्यासाठीं येथवर येणें जर शक्य होत असेल तर मी आल्यावांचून रहाणार नाहीं. भोंवरा म्हणजे क्रांतीचें प्रतीक त्याचें आकर्षण कांहीं आगळेंच असतें, आणि कधीं कधीं प्राणघातक देखील !

दिवाळीच्या वेळीं जलराशि सर्वांत अधिक पुष्ट, धबधब्याची शोभा सर्वांत समृद्ध आणि गोड उन्हाचें सेवन केल्यानंतर तुषारांच्या ढगांचे गुलगुलीत चिमटे

सर्वांत अधिक आल्हादक असतात. माझ्या अपेक्षेप्रमाणेंच आजचें दृश्य होतें. तुषारांचे लोटच्या लोट दुरूनच दिसत होते, स्वयंपाकघरांतील धूर पाहून अतिथीला ज्याप्रमाणें आनंद होतो, त्याप्रमाणें 'धुवां 'चे लोट पाहूनच आतां येथें आपल्याला कसली मेजवानी मिळणार आहे त्याची मला कल्पना येऊन चुकली. धारधुव्यासारखा धबधबा पाहायला जायचें असतें तेव्हां फळ्यांचा एक कामचलाऊ पूल देखील कलापूर्ण व आतिथ्यशील वाटूं लागतो. आम्ही परिचित कांठावर जाऊन बसलों आणि गेल्याबरोबर प्रेमळ वाऱ्यानें तुषारांची एक झडप आमच्याकडे धाडून म्हटलें, ' स्वागतम् ', ' सुस्वागतम् '–एका क्षणांत आमचा अध्वखेद उतरला. आम्ही ताजेतवाने झालों आणि टवटवीत डोळ्यांनीं धुवांधार पाहूं लागलों.

धुवांधार म्हणजे दगडांच्या विस्तारांत तयार झालेली अर्धचंद्राकार दरी. त्यावरून जेव्हां पाण्याचा जथ्था खालीं उडी घेतो त्यावेळीं मध्यभागीं दिसणारा काचेसारखा हिरवा रंग विषाप्रमाणें भय उत्पन्न करतो. त्याच्या डाव्या म्हणजे आपल्या उजव्या बाजूचा खडक हत्तीच्या मस्तकाप्रमाणें पुढें आलेला आहे. त्याच्यावरून जेव्हां पाणी खालीं पडतें तेव्हां असंख्य हिऱ्यांचे हार पायऱ्या-पायऱ्या करून उड्या घेत घेत शर्यत लावीत असावेत असा भास होतो. उड्या घेत आहेत नी हसत आहेत आणि पिंजून पिंजून त्यांतून पांढरा रंग खुलवीत आहेत. मधला मुख्य धबधबा दरींत पडला रे पडला कीं लगेच इतक्या जोरानें वर उसळतो कीं दारूकामांतील बाणांना सुद्धां त्याचा हेवा वाटावा. एक फवारा वर उडून जरा शिथिल होतो न होतो तोंच दुसरा फवारा नव्या जोमानें त्याच्या मागोमाग येऊन धक्का देऊन त्याला फोडून टाकतो आणि मग त्यांचा चक्काचूर. पृथ्वीचें आकर्षण विसरून जाऊन, धुराच्या रूपांत व्योम-विहार करूं लागतो. हे तुषार कांहींसे वर आले कीं वाऱ्याच्या झोतांची परंपरा त्यांना उडवीत उडवीत चहूंकडे पसरवते. या धुरांच्या जाड-पातळ लाटा जेव्हां हवेंत धावूं लागतात तेव्हां वायलच्या साडीवरील मजेदार नक्षी त्यांच्यावर दिसूं लागते.

आणि खालीं ? खालच्या पाण्याच्या मस्तीचें वर्णन होऊंच शकणार नाहीं. जणूं काय पाणी अद्वैतानंदांत बसरून पडलें. जितकें पडलें तितकेंच वर उडलें. हिरव्या रंगांतून पांढरा फेस उत्पन्न केला आणि मनांत येईल तसा विहार केला. तो अपूर्व लाहो आठवून आठवून खालचें पाणी पुनःपुन्हां उचंबळून

येत होतें. धोबी घाटावरील पाण्याची उपमा जर रसिक नसती तर खालच्या पाण्याच्या उचंबळण्याला मी तीच उपमा दिली असती. पण धोब्याच्या साबणाचें पाणी गलिच्छ असतें. त्यांत वेग आणि मस्ती सुद्धां असतें, बेपर्वाई आणि तांडव तर मुळींच नसतें. आणि हास्य मावळतांच चेहऱ्यावर पुन्हा निर्मळ भाव धारण करण्याची कला देखील त्याला साध्य झालेली नसते. मग तेथलें पाणी पाहून धोबीघाटाचें मुळीं स्मरणच कसें झालें ? त्यांत कसल्याच प्रकारचें औचित्य नव्हतें.

माणसाला समाधीची मस्ती अनुभवायची असेल तर त्यानें या स्थानीं यावें. कोणत्याहि कारणामुळें त्याच्या पदरीं निराशा येणार नाहीं.

या बाजूच्या ( उजव्या ) कड्याच्या दोन पायऱ्या या वेळीं पुन्हां उतरलों. तेथें यावेळीं उपनिषद् गावेंसें वाटलें. माथ्यावर सूर्य तळपत होता आणि मीं तोंडानें गात होतों—' पूषन्नेकर्षे ! यम ! सूर्य ! प्राजापत्य ! व्यूह रश्मीन्; समूह तेजो ! ' जेव्हां पहिला पाठ संपत आला आणि मी ' ॐ क्रतो स्मर; कृतं स्मर ! ' म्हणालों तेव्हां एकाएकीं तीनचार वर्षांचें माझें संपूर्ण जीवन साकल्यानें या जीवनधारेसमोर खडें झालें आणि मी आपलें स्वतःचें जीवन या मस्त जीवनाच्या कसोटीवर कसून पहात आहें आणि मनाजोगता कस उतरत नाहीं म्हणून अस्वस्थ होत आहें असें त्या क्षणीं वाटलें. दुसऱ्याच क्षणीं त्या तीन वर्षांतील स्मृतींचे देखील तुषार होऊन आकाशांत उडून गेले आणि मी देखील पूर्णाचाच एक अंश असल्यामुळें तत्त्वतः पूर्णच आहें. आम्ही दोघेहि वि-सदृश नाहीं; एकाच परम तत्त्वाच्या लहानमोठ्या विभूति आहोंत याचें भान उत्पन्न होऊन चित्त शांत झालें आणि मी वर आलों.

चि. सरोजिनी देखील त्या साऱ्या दृश्याचें उत्कट नजरेनें आकंठ पान करीत होती. हा सगळा आनंद कसा समजावा, कसा पचवावा, आणि कसा व्यक्त करावा असा गोड गोंधळ तिच्या डोळ्यांत स्पष्ट दिसत होता.

येथून लगेच परतून चौसष्ट योगिनींचें दर्शन घ्यायचें होतें, नर्मदेचे रक्षक पांढरे, पिवळे, निळे पहाड पहावयाचे होते. त्यामुळें माहेर सोडून सासरीं जात असलेली मुलगी ज्याप्रमाणें दोन्हीकडील सुखदुःखांचे संमिश्र भाव अनुभवीत जाते त्याप्रमाणें धुवांधारला हार्दिक प्रणाम करून आम्हीं परत फिरलों.

हिंदुस्थानांत असे अनेक प्रपात अखंड वहात असतात आणि भव्यतेचे

आणि उन्मत्त अवस्थेचे पाठ शिकवीत असतात. हजारों वर्षें झालीं–आणि लाखों झालीं नसतीलच असें खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं–धुवांधार जशाचा तसाच कोसळून पडत आहे. प्रभु रामचंद्र येथें आले दिसतील. विश्वामित्र आणि वशिष्ठ येथें स्नान करून गेले असतील. चंद्रगुप्त आणि समुद्रगुप्ताच्या सैनिकांनी येथें जलविहार केला असेल. श्रीशंकराचार्यांनीं येथें बसून आपलीं स्तोत्रें रचलीं असतील. कलचुरी आणि वाकाटक वंशाच्या वीरांनीं याच पाण्यांत आपल्या जखमा धुतल्या असतील, आणि अल्हणादेवीनें येथेंच बसून चौसष्ट योगिनींचें स्मारक करण्याचा संकल्प केला असेल. आणि भविष्यकाळांत धुवां-धारच्या काठावर काय काय घडणार आहे तें कोण सांगूं शकेल ? धुवांधारला स्वतःलाच यांतलें कांहीं ठाऊक नाहीं. तो आपला पडतच आहे. आणि तुषारांच्या रूपांत पुनःपुन्हां उडतच आहे.

ॐ ॐ ॐ

## षष्ठम पाद

---

# सहस्रधारा

जुनें देणें एखादे वेळीं टाळतां येईल पण जुने संकल्प कांहीं केल्या टळत नाहींत. पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हां मी डेहराडूनला जाऊन राहिलों होतों तेव्हां सहस्रधारा पहाण्याचा संकल्प केला होता. तीव्र उत्कंठा असूनहि त्या वेळीं जाणें झालें नाहीं. थोडे दिवस त्याची रुखरुख मनांत राहिली आणि नंतर पुसून गेली. कालांतरानें सहस्रधारा म्हणून एक स्थान या पृथ्वीतलावर कुठेंतरी आहे ही स्मृतिसुद्धां पुसली गेली. पण संकल्प थोडाच टळणार ?

'आमचें कन्यागुरुकुल एकदां पाहून जा.' म्हणून आचार्य रामदेवांनीं मला फार आग्रह केला. विकासाच्या मार्गावर असलेली ती संस्था मलासुद्धां पहावयाची होती. गेल्या वर्षी जाऊं शकलों नाहीं म्हणून या वर्षी वचनबद्ध होऊन मी तेथें गेलों. आतां निसर्गाच्या मागें वेडें होऊन भटकायचें नाहीं, आतां माणसांना भेटायचें आहे, संस्था पहायच्या आहेत, राष्ट्रीय प्रश्नांची

चर्चा करायची आहे, चांगलीं चांगलीं माणसें शोधून काढून कामांत गुंतवायचीं आहेत, सेवकांबरोबर विचारांची आणि अनुभवांची देवाणघेवाण करायची आहे—अशा विविध विचार-धारा मनांत घोळत असतांना, सहस्रधाराचें स्मरण होणार तरी कोठून ? मी आपला हिंदी-हिंदुस्तानीच्या चर्चेत गढून गेलों होतों. इतक्यांत तरुण रणबीर मला भेटायला आला. कुणीतरी त्याचा परिचय करून दिला होता. तो आपण होऊनच म्हणाला कीं, 'डेहराडूनमध्यें पहाण्यासारखीं स्थानें म्हणजे फॉरेस्ट कॉलेज व लष्करी शाळा आहेत, आणि नैसर्गिक दृश्यांत गुच्छु-पाणी आणि सहस्रधारा.' शेवटलें नांव ऐकलें मात्र आणि पंचवीस वर्षांच्या विस्मृतीची दगडी कबर फोडून जुनी स्मृति व जुना संकल्प भुताप्रमाणें नजरेसमोर उभे राहिले. आतां त्या संकल्पाला गति दिल्यावांचून गत्यंतर नाहीं.

तैल्वाहन मोटारची व्यवस्था झाली आणि पांच-सात मैलांचा उत्तरेकडील रस्ता पार करून आम्ही राजपूरला पोंचलों. येथूनच वर मसूरीला जातां येतें. आम्ही राजपूरहून अडीच एक मैल पूर्वेकडे जंगलांतून पायीं चालत गेलों. बरोबर ६५ मिनिटें चालून आम्ही सहस्रधारेला पोंचलों. संध्याकाळची वेळ होती. मागें सूर्य मावळण्याचा विचार करीत होता आणि त्याचीं लांबत जाणारीं किरणें आमच्या समोरील रस्ता अधिकाधिक लांब करीत होतीं. पांच-दहा मिनिटांच्या आंत आम्ही मानवसंस्कृति सोडून जंगलांत प्रवेश केला. पाण्याचे पावसाळी ओहळ वाहून वाहून खोल खळगे बनलेले होते. त्यांतून वाट काढायची होती. आम्हीं चौघेजण होतों. गोष्टी करीत, आसपासचें सौंदर्य न्याहाळीत आणि वेळेचा हिशोब काढीत आम्हीं चाललों होतों. अमरनाथ, तुंगनाथ बद्रि-विशाल यांसारखीं स्थानें ज्यानें पाहिलीं आहेत त्याला मसूरीचा पहाड म्हणजे 'किस पेडकी पत्ती'. पण बऱ्याच वर्षांनीं पुन्हा हिमालयाच्या पायथ्याशीं जाणें झालें. त्यामुळें हें दृश्यदेखील डोळ्यांना भव्य वाटलें.

मसूरीकडच्या पर्वतांत अनेक वेळां टेकड्या कोसळून पडतात, ज्याला इंग्रजींत लॅन्ड-स्लिप किंवा लॅन्ड-स्लाईड म्हणतात. एकाद्या झुंजार योद्धयाला जबरदस्त जखम झालेली असावी तसें हें दृश्य दिसतें. मोठमोठे पर्वत लहानमोठ्या वृक्षांनीं झांकलेले आहेत आणि मध्येंच मोठ्या पहाडाचा भाग तुटून गेल्यामुळें एक सबंध बाजू उघडी पडलेली आहे असें दृश्य पाहून हृदयांत कसेंसेंच होऊं लागतें. अशीं प्रमाणाबाहेरचीं प्राकृतिक दृश्यें फार विशाल असतात. आणि या अपघातांवर

कसलाच इलाज नसतो. त्यामुळें असले घाव डोळ्यांना खटकत नाहींत. उलट आदरास पात्र असें तें पहाडाचें वैभवच वाटतें.

आम्हीं खालीं उतरलों, पुन्हा चढलों, पुन्हा उतरलों, पुन्हां खूप चढलों आणि तेथून घेरी यावी असा उतार लागला.

आम्ही राजीखुशीनें चतुष्पाद बनून हळूहळू खालीं उतरलों. रस्त्यांत जेथें म्हणून उतरलों तेथें प्रत्येक ठिकाणीं एक दगडांची कोरी नदी ही ठेवलेलीच. पावसाळ्यांत ती इतका कांहीं कोलाहल करते कीं सगळी दरी सहस्र निनादांनीं दुमदुमून जाते; परंतु आतां जेथें पहावें तेथें भीषण शांति. लहान लहान पक्षी एकमेकांना आवाज देऊन इशारे करीत नसते, तर येथें उभें राहिल्यानें सुद्धां छातींत धडकी भरली असती. शेवटचा उतार आला आणि जेथें पहावें तेथें स्लेटवाले दगड. जीव वाचवण्यासाठीं एखादी तख्ती पकडायला गेलें तर तिचा चुरा होऊन हातीं येतो.

कसेबसे आम्ही खालीं उतरलों. जवळ जवळ एक तास होत आला होता. ज्या गृहस्थांच्या मोटारमध्यें बसून आम्ही आलों होतों ते म्हणूं लागले, ‘ मी आपला येथेंच बसतों तुम्हीं पुढें जा. ’ मी म्हणालों, ‘ तुमच्याशीं आम्हीं तासाभरांत परत फिरूं असा करार केला होता. पण सहस्रधारेला पोंचतां पोंचतांच तासापेक्षां अधिक वेळ जाईल, म्हणून तुम्ही आतां परतच जा आणि मोटार घेऊन वेळेवर डेहराडूनला पोहोंचा. आम्ही भाड्याच्या बसमधें बसून येऊं. ’ रणबीर म्हणाला, ‘ आतां तर दहा मिनिटांत आपण जाऊन पोहोंचूं. समोरच्या टेकडीच्या कडेवर ती पांढरी झोंपडी दिसते आहे तिच्या बाजूलाच सहस्रधारा आहे. ’

इतक्या दूर आलोंच आहोंत, त्यांत पांच मिनिटें अधिक असा विचार करून आम्ही निघालों. मागें वळून पहाण्याचें मनांत आलें. पहातों तों सूर्य आकाशांत लटकत होता आणि पायथ्याच्या दरींतले पहाड दोन हात उंचावून चेंडू झेलण्याच्या तयारींत असावेत तसें त्यांचें स्वागत करीत होते. गमतीनें वर उडवलेलें बालक मातेच्या हातांत पडतांना हसावें आणि मातेनेंहि आनंदित व्हावें तसें तें दृश्य होतें. अशावेळीं मातेच्या उमाळ्याचें मनानें सेवन करावें कीं बालकाचें विश्वासपूर्ण हास्य खुलवावें, कोणत्या आनंदाशीं एकरूप होऊन जावें, त्याचा निश्चय न झाल्यामुळें मनाचा गोंधळ उडतो. इतकें एकच दृश्य

पहाण्यासाठीं देखील येथवर यावें ! पण संकल्प तर सहस्रधाराचा होता. त्यामुळें लांबवर चाललेल्या सूर्यकिरणांकडे पाठ फिरवून आम्ही लगबगीनें पुढें निघालों.

तोंच एकाएकीं एक मोठा स्रोत धबधबत असलेला दिसला. उंचावरून स्वच्छ पाणी मजबूत बनलेल्या मातीच्या नैसर्गिक भिंतीवरून निसटून पडत आहे, आवाज करीत आहे, आणि अलमस्त एकतानतेनें अवतरत आहे. जवळ कुणी आहे किंवा नाहीं, पहातो कोण ? काय होत आहे याची त्याला मुळींच पर्वा नाहीं. धब धब धब धब चालूच आहे. दगडावरून पाणी पडतें तेव्हां इतकें आश्चर्य वाटत नाहीं. पण येथें तर आपला हट्ट न सोडणाऱ्या मातीवरून पाणी पडतें आहे. मी पहातच उभा राहिलों. पाण्याच्या अशा दृश्यांत इतका कैफ असतो असें जर दारुड्या लोकांना कळलें, तर नशापाणी करण्याचें सोडून ते अहर्निश येथेंच येऊन वसतील. क्षणभर परत जावयाचें आहे हें मी विसरूनच गेलों. जेव्हां आपण, क्षणभर का होईना, निसर्गाशीं एकरूप होऊन जातों त्या वेळीं तो खरोखर अद्वैतानंद असतो. स्वतःचें भान हरपल्यानंतर आनंदी आनंदच उरणार.

तर मग काय जिला आपण जडसृष्टि म्हणतों ती जड नसून अद्वैतानंदाच्या समाधींत एकतान होऊन पडली आहे ? या प्रश्नाचें उत्तर कोण देऊं शकेल ?

रणवीर म्हणाला, ‘ आतां आपण थोडेसे पुढें जाऊं या. ’ आतां उशीर करण्याची माझी दानत नव्हती. पण थोडेंसें राहून गेलें अशी रुखरुख मनाला लागून राहूं नये म्हणून मी पुढें निघालों. खालीं पाणी वहात होतें. हळूच आम्हीं खालीं उतरलों. तों तेथें सुराखारचा, बंदुकीच्या दारूचा गंध नाकाला झोंबूं लागला. खालीं उतरून तें पाणी थोडेंसें प्यालों. असें म्हणतात कीं सगळ्या प्रकारच्या चर्मरोगांसाठीं हें पाणी ‘ बहोत मुफीद है. ’ हें पाणी आणि त्याचे गुण यांच्याविषयीं मी विचार करीत होतों, पण हृदय मात्र त्या आतांच पाहिलेल्या धबधब्याच्या धब्कराशीं ताल धरीत होतें. इतक्यांत वरच्या बाजूला उंचावर एकापुढें एक कललेल्या गुहेच्या छतामधून पाण्याचे थेंब पडतांना दृष्टीस पडले. जणूं काय अत्यंत सौम्य आणि मूक जलतरंग अथवा वृंदगायन.

हीच खरी सहस्रधारा. हजारों थेंब या गुहेवरून आणि आंतून टपटपत असतात. परंतु त्यांचा आवाज एकवटत नाहीं. शांतपणें थेंब पडतच असतात. एका बाजूनें आम्हीं वर चढलों. तेथें एक साधारण खोल अशी गुंफा होती.

मधें खांबासारखा दगडाचा भाग होता. त्याच्या आसपास आम्ही फिरलों. सगळीकडेच सहस्रधारांचा वर्षाव होत होता. तो सारा पहाड विरघळून चालला आहे असा भास होत होता. आम्ही चांगलेच भिजलों. चांगले तासभर भरभर चालत असल्यामुळें शरीरांत उष्णता वाढली होती. त्यामुळें अशा रीतीनें भिजून जाण्यांत कांहीं औरच आनंद वाटला. किती सुभग शीतल येथलें हें दृश्य! येथें रहाण्यासाठीं माणसाचा जन्म उपयोगी नाहीं. येथें तर वेदमंत्रांचें चातुर्मासांत पठण करणाऱ्या बेडकांचा अवतार घेऊनच राहिलें पाहिजे. जें हृदय थोड्या वेळापूर्वी शक्तिशाली धबधब्याशीं एकरूप झालें होतें तेंच येथें एका क्षणांत या झिमझिम झिमझिम सहस्रधारांच्या बालनृत्याशीं तन्मय होऊन गेलें. मीं रणबीरचे अंतःकरणपूर्वक आभार मानले आणि म्हटलें, 'जर इतका सुंदर भाग पहायचा राहून गेला असता तर खरोखरच पश्चात्ताप करण्याची पाळी आली असती.' पावसापासून निवारा देणाऱ्या गुंफा तर मीं असंख्य पाहिल्या आहेत. पण उन्हाळ्यांतसुद्धां आपल्या पोटांत पावसाला सांठवून ठेवणारी गुंफा मी हीच पहिलीवहिली पाहिली. सिलोनच्या मध्यभागीं एके ठिकाणीं चित्रें रंगविलेली एक मोठी गुंफा आहे. त्यांतून एका ठिकाणीं एक लहानसा झरा टपटपत असतो. परंतु असा अखंड पाऊस तर मीं सर्वप्रथम येथेंच पाहिला. आम्हांला जशी परतायची घाई होती, तशी या पावसाला नव्हती. त्याला त्याचें जीवनकार्य मिळून चुकलें होतें. दगडांवरच्या शेवाळामुळें पाय घसरत होते. आणि येथलें सौंदर्य, पावित्र्य आणि शांति यांच्यामुळें पाय येथेंच खिळून रहात होते. अशा अवस्थेंत जितका वेळ गेला तितका लाभ पदरांत पडला असें मनाला वाटत होतें.

शेवटीं तेथून मागें परतावेंच लागलें. आतां तर दुप्पट वेगानें मागें जायचें होतें. रस्त्यांत कितीतरी मजूर आणि गुराखी घाईघाईनें चालतांना दिसले. बिचारे गरीब लोक, मोठ्या मुश्किलीनें अशा ठिकाणीं जगत असतात. परंतु आम्हांला आपला सहस्रधारेच्या अमृत-दृष्टीखालीं या लोकांना रहायला मिळतें याचाच हेवा वाटला.

उतरतांना उतरलों, पण आतां अंधार होईल तेव्हां चढतां कसें येईल हा एक प्रश्न होता. मनांत आलें कीं हातांत एखादी काठी असली तर बरें. तेथें एक खेडवळ दुकान होतें. दुकानदाराला आम्हीं विचारलें, 'भैया, एक

[illegible stamp]

अच्छीसी लकडी दोगे ? ' मला एका कानानें ऐकूं येत नाहीं, तर दुकानदार दोन्ही कानांनीं बहिरा; माझें म्हणणें त्याला समजेना आणि मी अगदीं अधीर बनलों होतों. शेवटीं एका सोबत्यानें इशाऱ्यानें त्याला सांगितलें. त्यानें लगेच आंतून आपली बांबूची काठी आणून दिली. पैसे देऊं केले तर घेईना. त्याची काठी घेऊन मीच त्याच्यावर उपकार केले असावेत अशी धन्यता डोळ्यांवाटे दर्शवीत तो म्हणाला, ' ले जाइये, आप ले जाइये. ' त्यानंतर रणबीरनें त्याच्या कानांत जोरानें ओरडून सांगितलें, ' ये मेहमान तो महात्मा गांधीके आश्रमसे आते हैं ! ' मग तर त्याच्या धन्यतेला आणि माझ्या संकोचाला पार उरला नाहीं. काठी घेऊन मी पळ काढला.

आतां आमचें बोलणें बंद पडलें. पाय धावत होते आणि मी मनांतल्या मनांत प्रार्थना बोलत होतों. आकाशांत गुरु आणि शुक्र जवळच्या चंद्रावर कांहींतरी टीका करीत होते.

ते मोटारवाले गृहस्थ डोंगराच्या माथ्यावर बसून आमच्या परत येण्याची वाट पहात होते. जेव्हां आम्ही एकत्र झालों तेव्हां ते म्हणतात, ' तुम्हीं धावत गेलांत आणि पळत परत आलांत आणि मी इतका वेळ निवांतपणें या दरीच्या भव्य विस्ताराचा व मावळणाऱ्या प्रकाशाचा, त्याच्या बदलणाऱ्या रंगाचा आनंद-चाखीत राहिलों. तर सांगा आपल्यापैकीं अधिक आनंद कुणी लुटला ? '

प्रतिध्वनि उमटावा त्याप्रमाणें मीं मनांत विचारलें, ' खरंच, कुणी लुटला ? '

डिसेंबर १९३६.

## गुच्छुपाणी

गुच्छुपाणी निसर्गाचा एक सुंदर खेळ आहे. दोन वर्षांपूर्वी डेहराडूनला गेलों होतों तेव्हां एका दिवसाची फुरसत मिळाली होती. कांहीं जण म्हणाले कीं आपण 'गुच्छुपाणी' पहायला जाऊं. दुसऱ्या कांहींचें म्हणणें पडलें कीं, 'सहस्रधारा' बघायला चला. गुच्छुपाणी नांव तर फार मजेदार वाटलें; परंतु विस्मृतीच्या भाराखालीं दबलेल्या जुन्या संकल्पानें डोकें वर काढून सहस्रधाराच्या बाजूनें आपलें मत दिलें होतें. त्यामुळें गुच्छुपाणी राहूनच गेलें.

या वर्षी कन्या-गुरुकुलाच्या उत्सवासाठीं पुन्हां डेहराडूनला जावें लागलें. मग आतां गुच्छुपाणी बोलावल्याशिवाय थोडेंच रहाणार? दोन तीन तासांची फुरसत असेल तर डेहराडूनहून गुच्छुपाणीचा प्रवास सहज करतां येण्यासारखा आहे. मोटरीऐवजीं नुसतें पायींच गेलें तरी देखील तीन साडेतीन तासांपेक्षां अधिक वेळ लागणार नाहीं. सुरुवातीला मोटरींसाठीं बनलेला दीड एक मैलाचा अस्फाल्टचा वज्रलेप रस्ता आपल्याला हळू हळू उंच झाडांमधून वर वर घेऊन जातो; आणि समोरच्या डोंगरावर झळकणाऱ्या मसूरीच्या गंधर्वनगरीचें दर्शन करवितो. तेथल्या बंगल्यांच्या वांकड्यातिकड्या रांगा जेव्हां संध्या-किरणांत चमकूं लागतात तेव्हां चकमकीच्या दगडांचे चौरस तुकडे अस्ताव्यस्त पडलेले असावेत असा भास होतो.

आम्ही रस्ता सोडून डावीकडच्या शेतांत उतरलों, तों समोर 'शाल'च्या बाल वृक्षांची झाडी दिसूं लागली. या झाडीमधून एक पहाडाची मुलगी दगडाशीं खेळत खेळत दक्षिणेकडे धांवत असलेली दृष्टीस पडली. यावेळीं तिच्या पात्रांत नांवाला देखील पाणी नव्हतें. केवळ ओबडधोबड पण गुळगुळीत दगडच तेथें विखुरलेले होते. पाणी नसलेली नदी सामान्यपणें कुणाला आवडत नाहीं. परंतु जेव्हां दोन्ही बाजूंस उंच उंच टेकड्या असतात आणि सारा प्रदेश निर्जनरम्य असतो तेव्हां कोरडी नदी देखील भीषण रमणीय रूप धारण करते. पाण्याचा प्रवाह नसेना का, पण हिरव्यागार जंगलांतून पांढऱ्या शुभ्र दगडांचा पट्टा डोंगरांतून मार्ग काढीत जातांना पाहून सहजच मनांत येतें

कीं हे दगड शाळेंतील मुलांप्रमाणें पळण्याची शर्यत खेळतां खेळतां मधेंच कां थबकले असावेत ?

आम्हीं पुढें निघालों. पुन्हां चढलों व पुन्हा उतरलों. मार्ग दरडीमधून जात होता. त्यामुळें दूरवरचा प्रदेश दिसण्याऐवजीं आकाशाकडे पाहूनच संतोष मानावा लागत होता, मधून मधून पिवळ्या, पांढऱ्या फुलांची उधळपट्टी पाहून वाटूं लागे, कीं येथें कुणाचा तरी बंगला असावा. पण दुसऱ्याच क्षणीं खात्री होई कीं अशा प्रकारचीं दृश्यें पाहूनच शहरी बंगलेवाल्यांना आसपास फुलें लावण्याची कल्पना सुचली असावी. बंगल्याच्या चार भिंती निसर्गापासून दुरावलेल्या मानवासाठीं आहेत. येथें तर निसर्गाचा विशाल प्रासाद आहे. चार दिशा याच या प्रासादाच्या चार भिंती आणि आकाशाचा कटाह हा त्याचा घुमट. रात्र होण्यापूर्वींच त्या घुमटांत चंद्रतारकांचा चांदवा नियमित ताणण्यांत येतो. हवा बिघडते तेव्हां हा चांदवा मळूं नये म्हणून कधीं कधीं त्यावर ढगांचा पडदा ओढला जातो.

फुलें प्रसन्नतेनें हसत होतीं. कुणाकडे पाहून हसत होतीं कोण जाणे ! आम्ही येणार असल्याची पूर्वसूचना कांहीं आम्ही त्यांना दिली नव्हती आणि तशी सूचना मिळाली असती तरी आपल्या शिकाऱ्यांचें आगमन त्यांना कितपत रुचलें असतें हाहि एक प्रश्नच आहे.

मधून मधून लहान लहान झोपड्या व त्या झोपड्यांचा अपमान होऊं न देणारीं चुन्यामातीचीं घरें लागत होतीं. रस्ते व नगरपालिका यांची सोय नसलेलीं हीं घरें वनश्रींत खुलून दिसत होतीं व तेथल्या ग्रामीण जीवनाला शोभवीत होतीं. इंग्रजांच्या लष्करी नोकरींतून निवृत्त झालेले गुरखे येथें निसर्गाच्या कुशींत निवृत्तीचा आनंद उपभोगितात आणि आपल्या जर्जर हाडांना आराम देतात.

आम्ही पुढें निघालों. पुढें म्हणजे अगदीं सरळ नाकासमोर नव्हे. पहाडी पायवाटांच्या चक्रव्यूहांत जसें घुसतां येईल, तसें घुसावयाचें असतें. डावीकडे जायचें असलें तरी उजवीकडची वाट पत्करून तिची खुशामत करीत मार्ग कापावा लागतो. चि. चंदन म्हणाली, ' आसपासचें रमणीय दृश्य व आकाशांत क्षणोक्षणीं रूप पालटणारे देखावे आपलें लक्ष वेधून घेतात. पण जर का एक क्षणभर देखील पायाकडे आपलें दुर्लक्ष झालें तर त्या पहाडी नदींतील

दगडांप्रमाणें वसरगुंडी नशिबीं यावयाची.' तिचें म्हणणें खरें होतें. पायाखालीं जितके म्हणून मोठमोठे दगड येतात त्या सर्वांच्या डोक्यावर पाय ठेवून चालण्यांत एक विशेष सुख असतें. पण हे मोठमोठे दगड सारख्या अंतरावर असले तर ना? त्यामुळें कोण कुठें आहे? आपला भार डोक्यावर येऊन पडल्यावरहि डगमगणार नाहीत असे धीरोदात्त कोण आहेत याचा 'सर्वे' करीत करीत जेव्हां पुढें जायचें असतें तेव्हां प्रत्येक पाऊल दृष्टिपूत टाकावें लागतें; एकाग्र चित्तानें टाकावें लागतें. हातांत पुणी घेऊन सूत काततांना जसें तसूंतसूंत आपलें चित्त कांतलें जातें, त्याचप्रामाणें अशा पहाडी यात्रेंत पावलापावलांत आपलें चित्त यात्रेंत विणलें जातें आणि त्यामुळेंच यात्रेचा आनंद सघन बनत जातो.

आतां एक मोठी नदी खालीं दिसूं लागली. उजवीकडल्या दरींतून येऊन डावीकडे दोन शाखांत ती विभक्त झाली होती. समोरच्या टेकडीवरून तारेच्या खांबांनीं पांच सात तारांची एक हार आणून या कंठावर बऱ्याच खालीं तिला झेलून घेतलें होतें. जणूं काय एखादें मूल आपले हात आणि आपले डोळे ताणतां येतील तितके ताणून नदी इतकी रुंद आहे असें दाखविण्याचा प्रयत्न करीत असावे.

त्या नदीच्या पात्रांतून दोन क्षीण प्रवाह एखाद्या राजाच्या लोप पावलेल्या वैभवाप्रमाणें हळूहळू वहात होते. त्यांतलें पाणी तर लहान मुलांच्या हसण्या किंवा रुसण्याइतकेंच निर्मळ होतें. वाटलें कीं थोडें पाणी पिऊन घ्यावें. पण तेथें धर्मदेवजींची रसिकता आडवी आली. ते म्हणाले, 'तो समोर जो झरा दिसतो आहे त्याचें पाणी एकेकाळीं रोज सकाळीं येथें येऊन मी पीत असें, तेथेंच जाऊं या.' आम्हीं गेलों. तेथें एका लहानश्या टेकडीच्या कडेला एक लहानसा कोनाडा होता, त्यांतून या अमृततुल्य निर्झराला बाहेर येण्याचें सुचलें होतें. कुणा परोपकारी माणसाला त्या कोनाड्यासमोर एक नरसाळें बसविण्याची सद्‌बुद्धि झाली होती. त्यामुळें आम्हांला त्या जलदानाचा स्वीकार करणें सोपें झालें. पाणी पिण्यापूर्वीं पश्चिमेकडे कलणाऱ्या सूर्याला एक मनोमय अर्घ्य द्यायला मी विसरलों नाहीं.

आतां ज्या दिशेला सूर्यकिरण पसरत होते तिकडे हळूहळू नदीच्या पात्रांतून आम्ही चढूं लागलों. पुढें काय दृष्टीस पडणार आहे याची कल्पना होत नव्हती. नदीचा उगम असेल, कीं वरून पाणी ठिबकत असेल कीं सहस्त्र

धारेप्रमाणें पाण्यांत गंधक असेल–अशा अनेक कल्पना मनांत येत होत्या. त्या झऱ्याच्या नांवाप्रमाणें त्याचें रहस्य देखील आम्हांला गुह्यच होतें. ( गुच्छु शब्द गुह्यवरून आला आहे असें म्हणतात. )

दूर एक गुहा दिसत होती. तेथें जाऊन पोचलों तों सगळेंच कांहीं वेगळें आढळून आलें. तेथें आल्यावर गुच्छुपाणी म्हणजे काय तें ध्यानांत आलें.

ज्याप्रमाणें रेल्वे नेण्यासाठीं पहाड खोदून त्यांत बोगदा तयार करण्यांत येतो तसाच एका आग्रही झऱ्यानें ही सबंध टेकडी आरपार विंधून आपला मार्ग काढला आहे. छे, ही चुकीची उपमा झाली. ज्याप्रमाणें एखादी करवत लाकडाला किंवा पोरबंदरी दगडाला कापत कापत खालीं उतरते त्याप्रमाणें या झऱ्यानें एक टेकडी, वरून खालीं सरळ कापून काढली आहे. यांत कसलीहि युक्ति वापरलेली नाहीं. वज्रकाय पाषाणांना भेदून पाणी जेव्हां निघून जातें तेव्हां आश्चर्यचकित झालेलें मन विचारूं लागतें–समर्थ कोण ? स्थिर पर्वत व त्याची प्राचीन पाषाणांची अभेद्य भिंत कीं एका क्षणाचाहि विचार न करतां आपलें बलिदान देण्याला तयार असलेलें अस्थिर व तरल पाणी ?

त्या विवरांत घुसतांना छातींत थोडी धडधड झाली नाहीं तरच नवल, इतकें विस्मयकारक तें दृश्य होतें. मृत्यूच्या दाढेंत प्रवेश करण्यासारखें तें साहस होतें. मला तर आंत शिरतांना गीतेच्या अकराव्या अध्यायाचे श्लोक आठवूं लागले. तरीसुद्धां पहाड व पाणी यांच्या द्वारा आपलें सामर्थ्य व्यक्त करणाऱ्या प्रकृति-मातेच्या स्वभावावर विश्वसून आम्ही आंत प्रवेश केला. दगड सीमेंटमध्यें बसवावेत त्याप्रमाणें काळे, पांढरे आणि लाल वाटोळे गुळगुळींत दगड नैसर्गिक वज्रलेपांत बसविले गेले होते आणि पाण्याचा नम्र प्रवाह पायाखालच्या लहान लहान दगडांवरून आपलें विजयगान गात धावत होता. मान वर करून पाहिलें तों पाण्यानें टेकडी कापून बनवलेल्या चांगल्या वीस तीस फुटांच्या दोन भिंती आपल्या लाखों वर्षांच्या इतिहासाची साक्ष देत होत्या. माझ्याऐवजीं एखादा भूस्तरशास्त्री येथें आला असता तर त्यानें हे दगड ग्रॅनाइटचे आहेत कीं सॅण्डास्टोनचे हें पहिल्यांदा पाहिलें असतें. नंतर भिंतीची उंची किती आहे, पाण्याचा उतार किती आहे, दर दहा वर्षांत हें पाणी किती खोल उतरतें या सर्वांचा हिशोब करून ह्या निसर्गनिर्मित विवराचें आयुर्मान निश्चित केलें असतें आणि सांगितलें असतें कीं या पर्वतीय प्रवाहाची ही क्रीडा पन्नास हजार किंवा

दोन लाख वर्षांपासून चालत आली आहे. बाजूच्या भिंतींतले रंगीबेरंगी दगड पाहून त्यानें त्यांना त्यांचें वय विचारलें असतें आणि त्यांना पकडून ठेवणाऱ्या मातीचें वज्रलेप सिमेंट बनण्यास किती वर्षांचा अवधि लागला असेल त्याचें गणित करून टेकडीचें वयहि त्यानें आपल्याला काढून दिलें असतें. आणि जर कुणी त्याला येथें होऊन गेलेल्या धरणीकंपांचा इतिहास सांगितला असता तर त्याप्रमाणें आपल्या गणितांत फेरफार करून नवीन निर्णय त्यानें आपल्यापुढें मांडले असते. या वज्रलेप सिमेंटांत चामड्यासारखी किंवा बारीक जाळ्यासारखी नक्षी मधूनमधून पडण्याचें कारण काय आणि त्यांतून पाण्याच्या सूक्ष्म धारा कशा काय निघतात तेंहि त्यानें आपल्याला सांगितलें असतें. खरोखर नक्षत्रविद्येइतकीच ही भूस्तरविद्याहि अद्भुतरम्य आहे. मनोविज्ञानापेक्षां याचे शोध कांहीं कमी खटपटीचे नसतात. या तिन्ही विद्या म्हणजे मानवाच्या बुद्धिबलाचा सतत वाढता विलास आहे.

आम्ही त्या विवरांत दूरवर गेलों. एके ठिकाणीं थोडेंसें वर देखील चढावें लागलें. जवळच पाण्याचा एक लहानसा धबधबा पडत होता, थोडें पुढें गेलों. तेथें माणसानें बांधलेल्या दगडचुन्याच्या दोन भिंती पाहून मला कांहीं केल्या हसूं आवरेना ! मानवाला वाटतें कीं पहाडाचें हृदय भेदून टाकणाऱ्या या पाण्याला आपण दोन भिंताडांनीं अडवूं शकूं ! माझा भाव समजतांक्षणींच तो ग्जयी धबधबाहि मला म्हणूं लागला कीं, ‘ मी सुद्धां यामुळेंच हंसत आहें. ’ पर्वताचें दुभंगलेलें हृदय भग्न असूनहि भव्य होतें. परंतु माणसाची ही खचलेली भिंत त्याच्या मनोरथासारखीच हास्यास्पद व तिरस्करणीय भासत होती. एखाद्या उद्दाम माणसाच्या तोंडांत बसली कीं त्याचें बाजूला झालेलें तोंड जसें केविलवाणें दिसतें तशाच दिसणाऱ्या या भिंती फार वेळ पहाण्याची इच्छाहि होत नव्हती. एखाद्याची फजिती बराच वेळ पहात रहाणें बरेंहि नव्हे.

जितकें आंत गेलों तितकी त्या विवराची शोभा वाढतच गेली. तितक्यांत एक मोठा दगड दोन भिंतींतून पडतां पडतां मधेंच अडकलेला आढळला. त्यानें वरून उडी घेतली असावी व जवळच्या मायाळू भिंतींनीं त्याला म्हटलें असावें, ‘ अरे थांब, पाण्याच्या खेळांत व्यत्यय आणूं नकोस. ’ काय करणार बिचारा ! राहिला आहे उभा जेथल्या तेथेंच त्रिशंकूप्रमाणें लटकत. पाण्याचा खेळ खालीं डोकें करून नाइलाजानें पहात बसणेंच त्याच्या नशिबीं लिहिलेलें होतें. त्याची

कींव करीत पुढें जावें तों दुसरा एक दगड त्याच्याच सारखा लटकत आणि आपल्या पाठीवर आपल्याहून तीनपट मोठ्या दगडाचा भार सहन करीत अडकलेला दिसला. त्याच्या खालूनहि आम्ही पार झालों. बाजूच्या भिंती जराशा ( कोसळून ) रुंद झाल्या असत्या तर आमच्या हाडांचे तुकडे कसले, अगदीं चूर चूर झाला असता आणि दोन चार क्षणांपुरतें खालचें पाणी लाल लाल झालें असतें. मग निसर्ग म्हणाला असता कीं आपल्याला कांहीं ठाऊक नाहीं बुवा. चार माणसें येथें आलीं असतील, आणि आपल्या रिकामटेकड्या जिज्ञासेची किंमत त्यांनीं चुकवली असेल. असल्या गोष्टी थोड्याच लक्षांत ठेवायच्या असतात ? त्यांच्यासारखींच दुसरीं माणसें पुन्हां येथें येतील आणि दगडांत दबलेले कांहीं अवशेष त्यांना मिळाल्यास त्यांतून खऱ्याखोट्या कल्पना चालवून एखादें प्रकरण निर्माण करतील; दुसरें काय ?

चालून कांहीं आम्ही थकलों नाहीं. परंतु गार पाण्यांत दगडांवरून अनवाणी चालून पाय दुखूं लागले ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. परंतु या विवरप्रवेशाची अद्‌भुतता अनुभवतां अनुभवतां आम्ही अगदीं तृप्त झालों. जाऊन जाऊन आंत किती जाणार ? अखेर पुढें जाण्याचा उत्साह मंदावला. पण मन म्हणूं लागलें, हार खाऊन परत कसें परतावें ? इतके आलोंच आहोंत तर आरपार गेलेंच पाहिजे. दुसरें टोंक गांठलें नाहीं तर तें मानवी मन कसलें ?

पुढें गेल्यावर थोडी रुंद जागा आली आणि प्रवाहाची भीषणताही कमी होत गेली. तेव्हां शहाणे होऊन आम्ही मानून घेतलें कीं पुढचें दृश्य मिळ-मिळीतच असणार. गेलों नाहीं तरी चालेल. आम्हीं परत फिरलों. पुन्हां तें न तेंच दृश्य; त्या न त्याच भिंती व ती न तीच भीति ! ती न तीच उत्कंठा व त्या न त्याच भावना ! ! !

त्या विवरांतून बाहेर पडायला आम्हांला चांगलीं सोळा मिनिटें लागलीं ! ! ! माझ्या संवयीप्रमाणें या यात्रेचें स्मरण म्हणून मी दोन सुंदर गुळगुळीत दगड बरोबर घेतले आणि अंधारांत झपाट्यानें रस्ता कापीत आम्हीं घराकडे परतलों. मनांत एकच विचार घोळत होता—समर्थ कोण ? हा वज्रकाय प्राचीन पहाड कीं हें नम्र परंतु आग्रही जीवनधर्मी सत्याग्रही नीर ?

डिसेंबर, १९३९

# वेळगंगा आणि सीतानहाणी

वेरूळचें हिरवें कुंड पाहून परत फिरतांना रस्त्यांत वेळगंगेचा झरा दृष्टीस पडला होता. नालादेखील म्हणतां येणार नाहीं इतका लहानसा झरा. पण त्याला वेळगंगा हें प्रतिष्ठित नांव प्राप्त झालें आहे. नदीचें नांव कळल्यानंतर तिचा उगम कोठें आहे हें शोधल्यावांचून कसें रहावेल ? पण आम्ही आपले लेण्यांच्या कोरीव कामांतच मस्त होऊन भटकत होतों, त्यामुळें वेळगंगेची आठवणसुद्धां झाली नाहीं. ‘ अपौरुषेय ’ कलाकृतीचा नमुना अशी कैलासाची गुंफा सोडून जैन तीर्थंकारांच्या इंद्रसभेकडे जात असतां श्री. अच्युत देशपांडे म्हणाले कीं वेळगंगेचा उगम येथेंच आहे. नांव ऐकलें मात्र आणि वेळगंगा येऊन बिलगली.

इंद्रसभा पाहून परत फिरतांना आम्ही २९ व्या गुंफेंत येऊन पोंचलों. अनेक गुंफा फिरून फिरून थकवा चांगलाच वाटूं लागला होता. साऱ्या शरीरांतील हाडन् हाड दुखूं लागलें होतें आणि याच वेळीं मुंबईजवळील घारापुरीच्या एलिफंटाची आठवण करून देणाऱ्या २९ व्या गुंफेनें भव्यतेचा कळस केला. फिरून फिरून पाय अधिक थकले होते कीं पाहून पाहून डोळे अधिक थकले होते तें सांगणें कठीण होतें. आतां न्याहरीबरोबर विश्रांति घेऊनच पुढें जायचें असें आम्ही ठरवीत होतों; इतक्यांत सीतानहाणीचें स्मरण झालें.

अयोध्येपासून जनस्थानापर्यंतचा प्रवास सीतादेवीनें पायीं केला होता. तेथून रावणानें तिला उचलून लंकेला नेलें. दुःखावेगांत सीतेनें दक्षिणेकडील तो प्रदेश पाहिलादेखील नसेल. पण रामानें रावणाचा निःपात करून, त्याच्याच पुष्पक विमानांत बसून जेव्हां लंकेपासून अयोध्येपर्यंतचा प्रवास आकाशांतून केला तेव्हां सीतामाईनें खालीं पाहून किती आनंद अनुभवला असेल ? रामायणांत वाल्मीकीनें जिकडे तिकडे सीतेच्या प्रकृतिसौंदर्याविषयींच्या पक्षपाताचें वर्णन केलें आहे. भवभूतीनें देखील सृष्टिसौंदर्य पाहून सीतेला किती आनंद होत असे, त्याचें वर्णन दिलें आहे. हिंदुस्थानांतील ललित आणि भव्य, सुंदर आणि पवित्र स्थानांचें वर्णन करण्याचें काम जर सीतेनें आपल्या शिरावर घेतलें असतें, तर मला वाटतें कीं त्यानंतर संस्कृतमध्यें कोणत्याहि कवीनें सृष्टिवर्णनांत एकाहि ओळीची भर टाकण्याचा धीर केला नसता.

सीतामाता पर्वत पाहून आनंदून जाई, नद्यांना आनंदाश्रूंचा अभिषेक घाली, हत्तींच्या छाव्यांना आंजारी-गोंजारी, सारस-युगुलांना आशीर्वाद देई, सुगंधी फुलांच्या सौरभाचा नशा करी आणि प्रत्येक स्थळीं त्या साऱ्या आनंदाला राममय बनवून आपण सीता आहोंत हें देखील विसरून जाई. लंकेंत राम-विरहानें झुरणाऱ्या सीतेला तशा त्या मनःस्थितींत देखील तेथल्या एका नदीशीं एकरूप झाल्याशिवाय राहवलें नाहीं. आजसुद्धां सिलोनची सीतावाका पाव-साळ्यांत दोन्हीं कांठांनीं ओसंडूं लागते आणि जितकीं शेतें बुडवते तितक्या सर्वांना सुवर्णमय करून सोडते. सीतेचा जन्मच भूमींतून झाला होता. भारत-भूमीच्या भक्तीच्या रूपांत आजसुद्धां ती आपल्याला दर्शन देत असते.

सीतेला वाटलें असेल कीं गोदावरीच्या प्रदेशांत चालून चालून आपण थकलों. लक्ष्मणाला वनफळें आणायला पाठवून द्यावें. राम तर धनुष्य घेऊन पहारा करणारच. तर मग या चंद्राकार कड्याच्या पायथ्याशीं वेळगंगेचें आतिथ्य स्वीकारून थोडा जलविहार कां करूं नये ?

अनुकूल स्थानावरून वेळगंगेच्या सुंदर प्रपाताचें फक्त दर्शन घेण्याचाच प्रथम आमचा विचार होता. म्हणून क्रमांक २९ च्या गुंफेंत, गुंफेच्या डाव्या आणि आमच्या उजव्या बाजूस एक झरोका दिसत होता तिकडे आम्ही वळलों. जर खालीं उतरण्यासारखें असलें तर तो आनंद लुटायला चुकायचें नाहीं अशी चोरटी इच्छा मनांत होती खरी !

झरोक्यांतून पाहिलें तों एक झिरझिरीत प्रपात वाऱ्याशीं खेळ करीत खालीं उतरत आहे. आणि आपलीं बोटें हलवून आम्हांला गुपचुप बोलावीत आहे. खालीं उतरावें कीं काय, इतका वेळ खर्च करावा कीं नाहीं, बरोबरच्या लोकांना हा स्वच्छंद कितपत आवडेल ? अशा विचारांत मी पडलों. मला विचारांत पडलेलें पाहून दरींत इकडे तिकडे धावपळ करणारे पक्षी तिरस्कारानें हसून म्हणाले, "पहा तरी, कसा अरसिक माणूस आहे ! धबधबा इतक्या प्रेमानें बोलावीत आहे आणि हा आपला इकडे विचारांत पडला आहे ! या माणसांत काव्य लिहिणारे वाटेल तितके आहेत, पण काव्य जगणारे क्वचितच सांपडायचे. आणि हा समोरचा माणूस तर स्वतःला प्रकृतीचें बालक म्हणवून घेतो. हावऱ्या डोळ्यांनीं धबधब्याकडे पहात आहे, खालचें स्फटिकासारखें पाणी पाहून त्याचें हृदयहि पाझरत आहे. आणि तरीहि त्याचा निश्चय वळावत नाहीं, त्याचे पाय

आपोआप चालूं लागत नाहींत. ‘ तूं शिला होऊन पडून राहशील, ’ असा त्याला कुणी शाप दिला नाहीं. तरीहि हा आपला दगडालाच चिकटून बसला आहे. ”

पक्ष्यांची ही निर्भर्त्सना ऐकून मीं चांगलाच शरमलों, आणि मला कळून आलें त्यापूर्वीच माझे पाय पायऱ्या उतरूं लागले. आतां उजव्या बाजूनें खालचा डोह ओलांडून समोरच्या कांठानें धबधब्यापाशीं यावें, कीं डाव्या बाजूनें कड्याच्या कडेनें चालून २८ नंबरच्या गुंफेपर्यंत पोंचून तेथें धबधब्याचे तुषार अंगावर घ्यावे असा विचार मनांत सुरू झाला. उजवा रस्ता लांबचा आणि सुरक्षित होता, तर डावा रस्ता काव्यमय होता. आंघोळीच्या तयारीनेंच उतरलों होतों तेव्हां एखादे वेळीं भिजायलाविजायला होईल असा कांहीं प्रश्नच नव्हता.

२८ नंबरच्या लहानश्या गुंफेमध्यें एक दोन मूर्ति आहेत खऱ्या, पण त्या गुंफेमधें विशेष काव्य भरलेलें नाहीं. काव्य तर सगळें बाहेरच पसरलेलें आहे. या गुंफेंत बसून जर कुणी बाहेर पाहील तर पाण्याच्या रुंद पडद्यांतून त्याला समोरील सृष्टीचा विस्तार जीवनमय दिसेल. धबधबा पडतोय खरा, पण तो इतका दाट नाहीं कीं आरपारचें कांहीं दिसू नये. ही गुंफा पाण्याच्या पडद्यांत पडदानशीन असली तरी बिलकुल भिजत नाहीं, कारण खेळकर वारासुद्धां पाण्याचे तुषार गुंफेच्या आंत घेऊन जाऊं शकत नाहीं. गुंफेच्या जर बाहेर आलांत, तर मात्र तक्रार चालायची नाहीं कीं वाऱ्यानें आम्हांला कां भिजवलें ?

आम्ही त्या गुंफेंतून खालीं उतरलों. पहाडी चतुष्पाद बनूनच उतरावें लागलें हें सांगायला नकोच. जेथें तो धबधबा दगडावर आपटत होता तेथें मीं बैठक मारली. शंभर फूट उंचीवरून पडणारें पाणी केवळ गुदगुदल्या करून संतोष थोडेंच मानणार ! त्यानें प्रथम डोक्यावर टपल्या मारायला सुरवात केली, नंतर खांद्यावर चापट बसली, आणि मग पाठीवर रप् रप् रप् रप् रपाटे बसूं लागले आणि प्रवासाचा सारा शीण उतरूं लागला. सामान्यपणें आपण मालीश करून मग स्नान करतों. पण येथें तर मालीश हेंच स्नान आणि स्नान हेंच मालीश अशी स्थिति होती. सीतेनें आपले केंस येथें मोकळे सोडून अगदीं निर्मळ स्वच्छ चरचरीत केले असतील.

पण असो, हें काय ! मी एक भटक्या प्रवासी आहे कीं या दुनियेचा बादशहा आहें ? माझ्या मांडीखालीं हें रत्नखचित आसन कोठून आलें ?

पाण्याचे तुशार चारहि बाजूंस पसरले आहेत, जसे मोत्यांचे सर! आणि आसनाखालीं दोन शोभिवंत इंद्रधनुष्यें मला सम्राटाची प्रतिष्ठा प्राप्त करून देत आहेत. अलकापुरीच्या कुबेरापेक्षां आतां कोणत्या बाबतींत माझें वैभव कमी आहे? इंद्रधनुष्याच्या दुहेरी किनारीच्या, चांदीच्या सुताच्या आसनावर मी विराजमान झालेलों आहें, आणि मोत्यांच्या सरांचें उत्तरीय लेवून येथें आनंद लुटीत आहें. शिरावर सूर्यनारायणाचें चकचकीत छत्र आहे आणि आसपास उडणारे हे द्विजगण जगन्नाथाचीं स्तोत्रें गात आहेत!

शरीर स्वच्छ करण्यासाठीं म्हणून नव्हे तर व्यायामाचा आनंद मिळविण्यासाठीं दगडावर चढून, धबधब्याच्या खालीं मी सारें शरीर चोळलें, स्नानपानाचा आनंद मिळवला आणि रामरक्षास्तोत्राचेंच स्मरण केलें. सीतामाईनें जें स्थान पसंत केलें, त्या स्थानीं रामरक्षा स्तोत्राचेंच गायन स्फुरणें स्वाभाविक होतें. आणि माथ्यापासून पायापर्यंत सगळे अवयव चोळून साफ करीत असतांना 'शिरो मे राघवः पातु, भालं दशरथात्मजः' इत्यादि श्लोकांचें पठण करणें हा न्यास किती औचित्यपूर्ण होता!

स्वर्गांत पोहोंचलेले लोक सुद्धां शेवटीं मृत्युलोकीं परत येतात; तर मग त्या प्रपातस्नानाची मस्ती चढली असतांनासुद्धां त्यांतून व्युत्थान करून परत गद्यमय जीवनांत प्रवेश करण्याची आवश्यकता आम्हांला जाणवावी यांत नवल तें कसलें? म्हणून शेवटीं इतक्या सगळ्या आनंदावर स्वेच्छेनें पाणी सोडण्याच्या आपल्या संयमशक्तीची कदर करीत करीत मी परत आलों आणि नवे कपडे चढवून न्याहारीसाठीं तयार झालों. न्याहारी कसली; कलानिरीक्षणासाठीं केलेली दुपारपर्यंतची तपस्या आणि प्रपातस्नानाची शांति यांच्या नंतरचें तें अमृतभोजनच होतं, आणि वेळगंगेचा कृपाप्रसाद.

गुंफेंत स्थिर होऊन उभे राहिलेले द्वारपाळ जर आपल्या डोळ्यांनीं पाहूं शकते, तर खचितच त्यांना आमचा हेवा वाटला असता.

❖ ❖ ❖

## केचूरचा धबधबा

आज आम्ही ब्रिटिश गियानांतलें एक अत्यंत अद्भुत नैसर्गिक दृश्य पाहिलें. आपल्या देशांतला गेरसप्पाकडील जोगचा धबधबा जसा सर्वांत उंच व अद्भुत रमणीय आहे. तसाच ब्रिटिश गियानांतील पोटारो नदीचा हा केचूरचा—Kaic-Taur चा—धबधबा आहे. या धबधब्याची उंची एकंदरींत ८२२ फूट आहे आपल्याकडील जोगचा राजा धबधबा जसा वरून सरळ खालीं उडी ठोकतो तसाच हा धबधबा ७४९ फूट सरळ खालीं झेप घेत असतो. याची रुंदी चांगली ४०० फूट आहे. जोगचे चारहि धबधबे ज्यानें वेगवेगळ्या प्रसंगीं चार-पांचदां पाहिले आहेत असा मी म्हणतों कीं केचूरचा धबधबा जर मला पहावयास मिळाला नसता तर जीवनांतील एका मोठ्या आनंदापासून मी वंचित राहिलों असतों.

जोगच्या धबधब्याचें पाणी वर एकीकडे थोपवून, दुसरीकडून तें नेऊन त्यांतून वीज निर्माण करण्याची योजना अंमलांत आणली गेली आहे. तरीहि धबधब्याच्या शोभेंत किंवा भव्यतेंत यत्किंचित्‌हि कमतरता आलेली नाहीं. येवढेंच नव्हे तर या योजनेमुळें उलट वरचें पाणी सोडून प्रतिकूल ऋतूंत देखील वाटल्यास आपण कांहीं तास उन्मत्त बनूं शकतों आणि त्याची मेघगंभीर गर्जनाहि ऐकूं शकतों.

येथील केचूरच्या धबधब्यांतून देखील वीज निर्माण करण्याची योजना चालली आहे. परंतु येथें वरून पाणी थोपवून त्याला वळविण्याची योजना नाहीं. धबधबा जेथें झेप घेऊन खालीं थडकतो तेथेंच एक मोठें धरण बांधून पाणी अडविलें जाईल व तेथून तें तीन मैल पर्यंत नेऊन जेथें ८१ फुटांची खोली आढळते तेथें सोडलें जाईल आणि त्याच्यांतून वीज निर्माण केली जाईल. या विजेचा उपयोग करण्याची सोय बारटिका शहरांत होईल अशी माझी कल्पना आहे, जेथें एसेक्विबो नदीला माझारुनी व कुयूनी या दोन नद्या येऊन मिळतात तेथें हें बारटिका शहर वसलेलें आहे. या शहराचें महत्त्व दिवसेंदिवस पुष्कळ म्हणजे पुष्कळच वाढत जाणार आहे अशी माझी समजूत आहे. या शहराच्या दक्षिण-पूर्व दिशेला मॅकेन्झी नांवाचें बॉक्साईट शहर

आहे. त्याचें देखील महत्त्व पुष्कळ वाढणार आहे. कारण येथील बॉक्साइट परदेशांत पाठवून देण्याऐवजीं येथेंच स्थानिक कारखाने उघडून त्यांतून ॲल्यूमिनियम् तयार करण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

पण तें असो, मला तर येथें धबधबा पहावयास आम्ही कसे गेलों व तेथें काय काय पाहिलें हेंच मुख्यतः सांगावयाचें आहे.

ब्रिटिश गियानामध्यें सव्वा आठशें फूट उंचीचा एक अद्‌भुत प्रपात आहे एवढें मला ठाऊक होतें. परंतु आमचा प्रवास समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशांतच व्हावयाचा होता. त्यामुळें केचूरला जाण्याची इच्छा मी मनांत उठूंच दिली नव्हती. परंतु इथले गव्हर्नर श्री. जॅकवे यांच्याकडे रात्रीचें जेवण घेतांना गोष्टीवरून गोष्टी निघाल्या आणि जेव्हां केचूरचा उल्लेख झाला तेव्हां, मी म्हटलें— 'या देशांत येऊन हा धबधबा मी पाहूं शकत नाहीं ही खरोखरच दुर्दैवाची गोष्ट आहे.'

जॅकवे म्हणाले—'असें कांहीं नाहीं. इच्छा असल्यास सकाळीं विमानांतून निघून सावकाशपणें धबधबा पाहून दुपारच्या जेवणाला परततां येईल. ज्या सामुद्री आकाशयानांतून आपण एसेक्विवो नदी पार केली तेंच आकाशयान आपल्याला परत घेऊन जाईल आणि धबधब्याच्या डोक्यावरील पोटारो नदींत तें आपल्याला उतरवूं शकेल.

माझ्यासारख्या निसर्गप्रेमी भटक्याला याच्याहून अधिक प्रोत्साहनाची कोणती आवश्यकता होती ? घरीं परतल्यावर मित्रांशी यासंबंधीं चर्चा केली. ते म्हणाले, एक मार्ग आहे; त्याप्रमाणें व्यवस्था करण्याचे पुरे प्रयत्न केले जातील.

आम्ही जॉर्जटाऊनहून फिरत फिरत तब्बल सवाशें मैल दूर न्यू-ॲम्स्टर्डमला पोहोंचलों. तेथून पंचेचाळीस मैल दूर असलेल्या कोरंटाइन ( Courentyne ) नदीच्या किनाऱ्यावरील स्केल्डन (Skeldan) ला जाऊन परतलों. डॉ. विशेशर व श्री. ठाकुरप्रसाद रिसाल यांच्या व्यवस्थेनुसार सामुद्री आकाशयान जॉर्जटाऊनहून उडून ॲम्सटर्डमला आम्हांला नेण्यासाठीं आलें. त्यांत आमचे इथले यजमान श्री हरिप्रसाद सपत्नीक आले होते. त्यांच्याबरोबर दुसरे एक गृहस्थ होते. विमानावर आरूढ होण्यासाठीं आम्ही एका नावेंत बसलों आणि मोठ्या उत्साहानें निघालों.

परंतु आमच्या नावेला छप्पर होतें. त्यामुळें विमानाच्या पंखाखालीं ती पोहोंचूं शकत नव्हती. बळजोरीनें पोहोंचण्याचा प्रयत्न केला असता तर विमानाच्या पंखांचें नुकसान तरी झालें असतें किंवा आमच्या नावेचें छप्पर तरी तुटलें असतें. विशेष म्हणजे नदीच्या अशान्त पाण्यामुळें आम्ही सगळेच धोक्यांत सांपडलों असतों. आकाशयानाच्या सारथ्यानें स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं कोणत्याहि परिस्थितींत मी नावेला जवळ येऊं देणार नाहीं. तुम्ही दुसरी नाव शोधून आणा, नाहीं तर मी दिलगीर आहें. दुसरा इलाज नाहीं.

आम्ही एवढेंसें तोंड करून परतलों. आजूबाजूला पाहूं लागलों–मिळते का एखादी नाव कीं जी 'अस्मान् तारयिष्यति.' नदीच्या किनाऱ्यावर नावेंत चढण्याची जी जागा होती तेथेंच सुदैवानें एक नाव पोहत असलेली आम्हांला दिसली. ती आजारी नाहीं याची खात्री करून घेतली, तिच्यांतलें पाणी बाहेर फेंकून देऊन आम्ही तिच्यांत जाऊन बसलों आणि विमानाजवळ गेलों. वेळ चांगलाच खर्च झाला, पण एकदांचे पोहोंचलों खरे. पाणी कापीत कापीत विमान पुढें सरकलें आणि हां हां म्हणतां आकाशांत उडालें. न्यू-ॲम्स्टर्डम्‌ची गगनशोभा न्याहाळीत आम्ही पुढें गेलों.

प्रथम आली आबारी नदी. कालच आम्ही ती मोटरद्वारा पार केली होती. पुढें महकौनी व महैका या दोन नद्यांच्या उगमाचे घाट दिसले. इतक्यांत आमच्या पायलटनें एका कागदावर लिहून आम्हांला कळविलें कीं आम्ही आतां डेमरारा नदी पार करणार आहोंत. शिवाय उजव्या बाजूला बॉक्साइटचें शहर मॅकेन्झी दिसणार आहे. पुढें या देशांतली सर्वांत लांब–सहाशें नव्वद मैल लांब–एसेक्विब्रो नदी आम्ही पार करणार आहोंत. मी उत्तरादाखल त्याच चिठ्ठीवर लिहून पाठविलें कीं हातांत नकाशा घेऊनच बसलों आहें. डाव्या बाजूला ग्रेट फॉल्स व कार्बे फॉलस दिसणार आहेत काय? उत्तर आलें– 'नाहीं; ते पुष्कळ दूर आहेत. ग्रेट फॉल्स तर शंभर फूट उंचीवरून खालीं पडणारा एक लहानसाच प्रपात आहे. त्याला उगीचच ग्रेट फॉल्स हें नांव देण्यांत आलें आहे.'

मी हें उत्तर वाचत होतों. इतक्यांत खालीं एसेक्विब्रो नदींत असलेला क्वा पन्ना (Kwa Panna) टापू दिसूं लागला. नंतर आम्ही पार केली ओमाई

( Omai ) नदी. खालच्या गहन कान्तारांत बिचारीचें तोंड देखील दिसणें कठिण होतें. त्यानंतर आली पोटारो नदी आणि टुमाटुमारी छावणी.

परंतु इतका तपशील देण्यांत कांहीं फायदा नाहीं. हा संपूर्ण प्रदेश सव्वाशें ते दोनशें फूट उंच वाढलेल्या महावृक्षांचा जणू एक समुद्रच आहे. अरण्याची आपली कल्पना याच्यापुढें हिशेबांतच घेण्याजोगी नाहीं. याला महाकान्तार म्हणण्याऐवजीं चि. सरोज म्हणते कीं याला अरण्यार्णवच म्हटलें पाहिजे. मोठमोठ्या नद्या देखील येथें गवतांत लपणाऱ्या किंवा जरा-जरा दिसणाऱ्या सापांसारख्या किंवा अजगरांसारख्या वाटतात.

आतां दुरून केचूरचा धबधबा दिसायचा होता. तो जवळ येतांच आमच्या सारथ्यानें आपल्या सहकाऱ्याला पाठवून आम्हांला आपल्याजवळ येऊन बसायचें आमंत्रण दिलें. त्याचा फायदा घेण्यासाठीं लगेच आमच्यापैकीं एक गृहस्थ पुढें गेले. नंतर त्यांना वाटलें कीं पुढची जागा त्यांनीं मला द्यायला पाहिजे. मी त्यांना म्हटलें कीं तुमच्याजवळ कॅमेरा आहे. तुम्ही पुढें बसा आणि फोटो काढा. पण आमच्या सारथ्याला रहावलें नाहीं. त्यानें मला दोहोंमधें उभा राहून समोर पाहण्याची सूचना केली, मी तें स्थान घेतलें. इतक्यांत समोर केचूरच्या धबधब्याचें दर्शन घडलें. इतक्या दुरून देखील त्याची भव्यता स्पष्ट होत होती. एकशें वीस मैलांच्या वेगानें आम्ही त्या धबधब्याकडे धांवत होतों. आजूबाजूला हिरव्यागार निसर्गाचा विस्तार, वर स्वच्छ निळ्या आकाशांत कापसासारख्या, शुभ्र ढगांचा पातळ ढीग आणि अशा या स्वर्गीय दृश्यामधें गोल्ड क्लोराईडची आठवण करून देणारा सोनेरी पाण्याचा धबधबा ! दोन डोळ्यांतून माणूस पिऊन पिऊन किती पिणार ? आमचें विमान जसजसें पुढें जाऊं लागलें तसतसा धबधब्याचा आकार देखील वाढूं लागला. खालून उडणारे तुषार व सीकर-बिंदूंचे ढग आणि त्यांच्या डोक्यावर नाना तऱ्हेनें उड्या मारणाऱ्या पाण्याचा उन्माद ! ! हें गंधर्व दृश्य हां हां म्हणतां लुप्त तर होणार नाहीं ना, अशी भीतीहि वाटत होती. परंतु चांगले तृप्त होईपर्यंत आम्ही तो धबधबा पाहिला. संतुष्ट डोळ्यांनीं आजूबाजूला पाहिलें तेव्हां तेथें प्रमाणांत लहान असे दुसरे तीन धबधबे दिसले. अगदीं झिरझिरीत असल्यामुळें हे उप-प्रपात कधीं मोत्यांच्या झालरीसारखे वाटायचे तर कधीं चांदीचे तारे लोंबकळत आहेत असें वाटायचें.

एक गोष्ट सांगायची राहूनच गेली. या प्रदेशांतील उंच पर्वतांमध्यें भैरव घाटांसारखे कांहीं घाट इतस्ततः विखुरलेले आहेत. परंतु ते अगदींच उघडे-नागडे नाहींत. लहान-मोठया वृक्षांनीं या पर्वताच्या कडयांवर जागा शोधून पर्वतांच्या या जखमा पुष्कळशा भरून काढल्या आहेत. अशा कड्यांमधें या धबधब्याला चांगलीच प्रतिष्ठा प्राप्त झाली होती.

आमचा सारथी या प्रदेशाचा केवळ माहितगारच नव्हता. तर चांगला रसिकही होता. त्यानें विमान अनेक प्रकारें वळवून आम्हांला या धबधब्याचें अनेक बाजूंचें दर्शन घडविलें. जणू तो आम्हांला सांगत होता–पश्याश्चर्याणि भारत! छोटेंसें विमान. केवळ आमच्यासाठीं आलेलें. लोकहि सगळे ओळखीचे. त्यामुळें वाटेल तेथें आम्ही बसत असूं. वाटेल त्या खिडकींतून पहात असूं. आणि लुटारू जसे हातांत येईल ती वस्तु लुटत असतात तसे आम्ही जेथें दृष्टि पडे किंवा जेथें डोळे जात तें सर्व डोळ्यांत भरून ठेवण्याचा पुरा प्रयत्न करीत असूं. अजीर्ण होईल अशी भीति वाटली तर मनाची समजूत घालीत असूं कीं या क्षणीं निःसंकोचपणें खात रहा. पुढें सावकाश चर्वण करतां येईल.

पुष्कळ फिरून बघितल्यानंतर आमचा सारथी म्हणाला–‘ खालीं नदीच्या शान्त पाण्यांत एक नाव दिसते. तेथें आपण उतरूंया ’ परंतु सरळ खालीं उतरायला आमचे विमान हॅलीकॉप्टर थोडेंच होतें! त्यानें घारीप्रमाणें गोलगोल फिरून संधि मिळतांच सप करून नदीच्या पृष्ठभागावर झेप घेतली. शान्त पाण्यानें संभ्रम झाल्यागत पाणी उडवून आमचें स्वागत केलें. पाण्यांत देखील गोलगोल फिरून आमच्या विमानानें किनारा गांठला, सारथ्याचा जो मदतनीस होता त्यानें गुरांना जसे आपण खुंटीला बांधतों तसें विमानाला किनाऱ्याजवळील एका खांबाला बांधलें. आम्ही खालीं उतरून आसपासची शोभा न्याहाळूं लागलों; इतक्यांत पोटानें म्हटलें, डोळ्यांनीं तर भरपूर पाहिलें. पण मी अजून रिकामीच आहें. भुईमूग थोडे खाल्ले म्हणून पोट थोडेंच भरतें!

अशा काव्यमय स्थळीं एवढी मोठी तपश्चर्या करून आल्यानंतर पाय हल-हलवितांना व तोंड चालवितांना एक आगळाच आनंद होत असतो.

आमच्याबरोबर आलेले दोघे गृहस्थ कॅमेरे घेऊन जंगलांत घुसले. त्यांना धबधब्याच्या माथ्यापर्यंत जायचें होतें. सारथी म्हणाला–‘ बरोबर एक वाजतां आपल्याला येथून निघायचें आहे. ’ आम्ही अकरा वाजतां न्यू-ॲम्स्टर्डमहून

निघालों होतों. सव्वाबारापर्यंत व्योमविहार करून प्रपाताच्या माथ्यावर नदींत उतरलों होतों. खाण्यापिण्यांत पंधरा मिनिटें गेलीं. आतां जंगलांतून एक मैल चालत जाणें आणि पुन्हा तेवढेंच अंतर चालत येणें आम्हांला अशक्य होतें. म्हणून चि. सरोज, श्रीमती हरिप्रसाद आणि मी-तिघांनीं येथेंच बसून आसपासचें सौंदर्य न्याहाळावें असें ठरविलें. तेवढ्यांत समोरच्या किनाऱ्यावरून एक चांगली पांढरी नाव येत असलेली दिसली. आम्हांला वाटलें, व्योमविहाराच्या अंतीं आपण थोडा जलविहार कां करूं नये ? अल्याडच्या एका इसमानें आपली नाव पाणी काढून तयार केली आणि छोटें इंजिन सुरू केलें. मोठ्या उत्साहानें आम्ही नावेंत जाऊन बसलों आणि दूरपर्यंत आम्ही प्रतीप-यात्रा केली. पाहिलें कीं पाणी उथळ आहे. पाण्याच्या खालीं लपलेल्या दगडांतून खळखळ करीत प्रवाह वहात आहे. दगडांमधून जेथपर्यंत जातां येण्याजोगें होतें तेथपर्यंत आम्ही जाऊन आलों. यमदूतांची देखील छाती धडधडूं लागावी इतकें इकडचें पाणी काळें-ठिक्कर होतें. ह्या काळ्या रंगांत किंचित् कात्याचा रंग मिसळला असावा असा कांहीं ठिकाणीं आभास व्हायचा. परततांना पाहिलें कीं नदीचा प्रवाह ज्या दिशेनें वाहतो तेथें एका दरींतून ढगांचा निद्राळू समूह एकसारखा वर उठून लुप्त होत आहे. आम्ही नाववाल्याला म्हटलें, ‘ चल तेथें जाऊं. ’ तो आनंद आगळाच होता. पुढें गेल्यावर पांच मिनिटांनंतर आम्ही पाहिलें कीं केचूरच्या प्रपाताच्या माथ्याजवळ आम्ही पोहोंचलों आहोंत. ढगांचा समूह तर सात सव्वासातशें फूट उंच चढून आम्हांला दर्शन देत होता. याच्यापुढें जाण्यांत सुरक्षितता नव्हती. पाण्याच्या प्रवाहांत सांपडलों तर तेथेंच मोक्ष व्हायचा. आम्ही परतलों. बरोबर एक वाजतां विमानाच्या अड्डयावर पोहोंचलों. आमचे कॅमेराधारी साथीदेखील परतले. त्यांनीं थोडें खाऊन पिऊन घेतलें आणि सव्वा वाजतां आम्ही तेथून निघालों.

लगेच एक कल्पनातीत दृश्य पहावयास मिळेल याची मला कल्पनाच नव्हती. नावेंतून जसा आम्ही नौकाविहार केला होता तसा आमच्या विमानानें देखील थोडा जलविहार केला. मात्र प्रपाताचा ताण पाहून आम्ही जेथून परतलों होतों तेथून परतण्याऐवजीं विमानानें फर्रर करून प्रपाताच्या डोक्यावर झेप घेतली. आणि समोरच्या विशाल दरींत धांव ठोकली.

एका विशाल चंद्राकार पहाडावरून पाणी खालीं झेप घेत होतें आणि

आम्ही गंधर्वांप्रमाणें आकाशांत उडत उडत प्रथम वरून खालपर्यंत आणि नंतर समोरून माना वळवून सारा धबधबा नखशिखांत पहात होतों. नाहीं नाहीं—हें रूढ वर्णन बरोबर नाहीं—धबधब्याला "शिखानखान्त" पहात होतों. नख कुठून दिसायचें ? आतां धबधब्याचा सारा देखावा हळूहळू लहान होऊं लागला. जवळच्या पर्वतांचे कडे इतके भयानक वाटत होते कीं खालच्या खोल दरीची भीति आम्ही विसरूनच गेलों. ही दरी चांगली ऐसपैस असल्या-कारणानें विमानाला विशेष सावधानीनें उडावें लागत नसे. आम्ही एका बाजूच्या पहाडी भिंतीच्या जवळून जितकें जातां येण्याजोगें होतें तितके आरा-मानें जात होतों. पुन्हा ते उपनायकांसारखे तिन्ही धबधबे दिसले. विमानाच्या घर्घर आवाजापुढें धबधब्याची गर्जना आकाशांतून आमच्या कानांपर्यंत पोहोंचण्याची शक्यता नव्हती. म्हणून धबधब्याच्या रोमहर्षक विविध दर्शनां-बरोबर त्याची मेघगंभीर गर्जना आम्हांला ऐकूं आली नाहीं. इतकी एक उणीव होती. परंतु आम्ही दर्शनानंदांत इतके मग्न होतों कीं या उणिवेकडे आमचें लक्षदेखील गेलें नाहीं. त्या मस्तीच्या व्युत्थानानंतर शांतपणें हें लिहि-तांना तिची आठवण होत आहे.

परततांना आमचे सारथी कॅप्टन विलियम स्मिथ यांनीं माझ्या नकाशांत मला दाखवलें कीं आम्ही आतां केचूरहून वारटिकापर्यंत सरळ जाणार आहोंत आणि तेथून जरा उजव्या बाजला वळून जॉर्ज टाऊनला अडीच वाजतां पोहोंचणार आहोंत.

परततांना पहिल्यासारखाच जंगलाचा विस्तीर्ण प्रदेश दिसला. आतां पोटारो नदी उजव्या बाजूला राहिली. जंगली लोकांना ज्याचें महत्त्व सर्वांत अधिक आणि ज्याला ते सुधारणेची पराकाष्ठा मानत होते तो पोटारू नदीवरील पूल पुन्हा दिसण्याची शक्यता नव्हती. त्या पुलाचा एक सुंदर नमुना जॉर्ज टाऊनच्या संग्रहालयांत पाहिला होता. त्यामुळें धबधब्याकडे जातांना त्या पुलानें माझें ध्यान खेंचलें होतें. परंतु दुर्बिणीनें त्याला पाहण्याचा मी प्रयत्न केला नव्हता. अशा गोष्टी दुर्बिणींतून पाहण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीच विमान पुढें निघून जातें आणि मग मन निराश होतें. पुढें कुरीब्राग नदी आम्ही पार केली. या नद्या जंगलांतून जात असतांना खोल दऱ्या निर्माण करीत असतात. म्हणून

सामान्य नद्यांप्रमाणें त्यांना किनारे नसतात. शिवाय अधून मधून त्या जंगलांत लपत असल्याकारणानें त्या भयानक वाटतात.

जरा पुढें गेलों आणि माझारूनी–Mazaruni–नदीच्या प्रवाहावरून उडूं लागलों. उजव्या बाजूला ती जरा जराशी दिसत होती. तिला येऊन मिळणारी –Takutu–टाकुटु नदी चांगल्या प्रकारें दिसली. सारथ्यानें लिहून कळविलें कीं आतां आम्ही एसेक्विबो व माझारूनी या दोन नद्यांच्या मधून जात आहोंत व थोड्या वेळानें वारटिका पार करणार आहोंत. आकाशांतून वारटिका शहर फारच सुंदर दिसत होतें. वेनेझुयेला देशांतल्या एका डोंगरावरून येणारी सुदीर्घ कुयुनी–Kuyuni–नदी वारटिकाजवळच एसेक्विबोला मिळते.

आम्ही हां हां म्हणतां एसेक्विबो नदी पार केली आणि महाकांतारांचा प्रदेश सोडून आम्ही शेतीच्या प्रदेशांत आलों- म्हणजे, अशा प्रदेशावरून उडूं लागलों. लांबच लांब अखंड शेतांमध्यें सुंदर रीत्या वसविलेले गांव, नारळाचीं झाडें, रस्त्याच्या किनाऱ्यावरून वाहणारे कालवे–ही सर्व शोभा न्याहाळीत आणि मनुष्याच्या प्रयत्नांची कदर करीत करीत आम्ही डेमरारा नदीच्या जवळ आलों. आतां दूरवर पसरलेली मनुष्यवस्ती दिसायला लागली. पक्ष्यांच्या घरट्यांप्रमाणें एका ओळीमधें बांधलेलीं माणसांचीं एकमजली घरें पाहून नव्या वस्तीची कल्पना झाली. बरोबर अडीच वाजतां आम्ही जॉर्जटाऊनला पोहोंचलों.

आज आम्ही निसर्गाचें जें विविध अथवा पंचविध दर्शन घेतलें तें खरोखर अद्भुत होतें. न संपणारीं अरण्यें, त्यांच्यामधून नागमोडी वाटा काढून वाहणाऱ्या नद्या, उंच पर्वत व त्यांचे कडे, त्यांच्यावरून कायोत्सर्ग करणारे धबधबे, हीं दृश्यें नेहमीं पाहून ज्यांच्या मनांत त्यांच्याविषयीं कुतूहल राहिलेलें नाहीं असे आत्मानंदी ढग आणि या अद्भुत निसर्गावर विजय मिळविणाऱ्या माणसाच्या प्रवृत्ति–हे सर्व एकाच वेळीं ज्या दिवशीं पहावयाला मिळालें तो दिवस केचूरच्या पाण्याच्या रंगाप्रमाणेंच सोनेरी दिवस म्हटला पाहिजे. एका दिवसांत सामावलेला हा आनंद लिहून ठेवूं शकलों या संतोषाऐवजीं त्याला मी पुरा न्याय देऊं शकलों नाहीं या असंतोषानेंच मला येथें थांबावें लागतें.

१९५८

# नायगराचा धबधबा

[ १ ]

अमेरिकेला जाणें आणि तिथला विश्वविख्यात नायगराचा धबधबा न पाहणें म्हणजे दुर्दैवाची परिसीमाच म्हटली पाहिजे. परंतु एकच प्रश्न घेऊन युनायटेड स्टेट्सला दोन आठवड्यांचा दौरा करायला गेलों होतों. त्या कार्यक्रमांत नायगरा बसूं शकत नव्हता. मला याचें दुःख होतें. तें मुकाट्यानें मी मान्य केलें होतें. फ्लॉरिडाचें मुख्य शहर मायामीहून न्यूयॉर्कपर्यंतचा—अमेरिकेच्या पूर्वेकडला—म्हणजे युरोपच्या बाजूचा—दक्षिणोत्तर भाग पाहून घेतला आणि मायदेशीं परतावयाची मी तयारी केली. सर्वच्या सर्व गोष्टी माणसाच्या नशिबांत थोड्याच लिहिलेल्या असतात !

परंतु जेथें मनुष्य हार कबूल करतो तेथें त्याचें भाग्य तें कबूल करण्याचा इन्कार करतें. पंधरा दिवसांची मुदत संपल्यानंतर आम्हांला अधिक तीन दिवसांचा अवधि देण्यांत आला. आणि आम्ही आमचे जुने मित्र, तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व बौद्ध धर्माचे एक तद्विद प्रो. बर्ट यांना भेटण्यासाठीं इथकाला जाण्याचा निश्चय केला. आम्ही त्यांना वॉशिंग्टनहून ट्रंककॉल केला कीं बाल्टीमोरहून हें आतां मला आठवत नाहीं. पण त्यांना कळविलें कीं आपल्याला भेटण्यासाठीं आम्ही येत आहोंत. आम्हांला सवड नाहीं हें पाहून ते स्वतः न्यूयॉर्कला मुद्दाम येणार होते. पण जेव्हां आम्हीच त्यांना भेटण्यासाठीं त्यांच्या घरीं येत आहोंत हें समजलें तेव्हां, त्यांना फार आनंद झाला. बर्ट दांपत्यानें आम्हांला सांगितलें कीं तुम्ही आलांत तर एक दिवस तुम्हांला आम्ही आमच्या घरीं पूर्ण आराम देऊं, आजूबाजूचा प्रदेश दाखवूं आणि दुसऱ्या दिवशीं घरच्या मोटारीनें दोनशें मैलांचा प्रवास करून नायगराचा धबधबाहि दाखवूं. आंधळ्यानें देवापाशीं एक डोळा मागितला. देव म्हणाला दोन घे. अशी आमची स्थिति झाली.

आम्ही न्यूयॉर्कहून विमानानें निघालों आणि बिंगहम्प्टनवरून इथकाला पोहोंचलों. त्या दिवशींची संध्याकाळ आणि रात्र आम्ही बौद्ध-धर्म, जैनधर्म

व शांकर वेदान्त यांच्या समन्वयाच्या गोष्टी करण्यांत आणि विश्वशांतीच्या शोधांत जग काय काय करूं शकतें याची चर्चा करण्यांत घालविली. ज्या एका छोट्या धबधब्याच्या मंजु-मधुर कलरवानें आमचें चित्त अस्वस्थ केलें तो इथका फॉल्स नांवाचा धबधबा नेडच्या घराजवळूनच गात जात होता. ( प्रो. बर्टशीं हां हां म्हणतां आमची घनिष्ठता इतकी वाढली कीं मी त्यांना नेड म्हणूं लागलों आणि माझ्या नांवापुढचें साहेबी शेपूटहि आपोआप गळून पडलें ! )

दुसऱ्या दिवशीं आम्ही इथका फॉल्सचें दर्शन घेतलें. त्यानंतर कॉर्नेल-युनिव्हर्सिटीचा विशाल भूखंड बघायला गेलो. याच विश्वविद्यालयांत प्रो. बर्ट तत्त्वज्ञानाच्या विभागाचे अध्यक्ष आहेत. आमचा चि. बाळ यानेदेखील याच विश्वविद्यालयांतून दहा वर्षांपूर्वी इंजिनिअरींग हा विषय घेऊन डॉक्टरेट घेतली होती.

जेवण करून आम्ही इथलें विशाल अच्छाद सरोवर बघायला गेलों. त्याचें नांव आहे कायुगा– Cayuga. त्याच्याच जवळ दुसरा एक सुंदर धबधबा आहे. त्याचें नांव आहे ' हाय फॉल्स '. त्याचें भौगोलिक नांव आहे टॉगेनॉक Tauqhannock. या सरोवराचा व धबधब्याचा आनंद इतका आगळा आहे की त्याचें वर्णन एका वेगळ्या लेखांत करणें योग्य होईल.

इथका व टॉगेनॉक या दोन्ही धबधब्यांचें दर्शन म्हणजे जणू नायगराच्या दर्शनाची पूर्वतयारीच होती. दोन रात्री पूर्ण आराम घेतल्यानंतर ' अथातो ब्रह्मजिज्ञासा ' म्हणत आम्ही विश्वरूपदर्शनासाठीं निघालों.

अमेरिकेंतील रस्ते उत्तम तर असतातच; परंतु विशेष म्हणजे या रस्त्यांची पूर्ण माहिती देणारे सविस्तर नकाशेहि सर्वत्र स्वस्तांत मिळत असतात. रस्त्यांवर नंबर, खुणा वगैरे इतक्या कांहीं सोयी असतात कीं हजारों मैलांचा प्रवास आपण कुणाला न विचारतां व कुठेंच न थांबतां सहीसलामत करूं शकतो. भूगोल व खगोल समजण्यासाठीं नकाशाचा उपयोग करण्याची सवय मला मूळपासून इतकी जडली आहे कीं, खरोखर नकाशे म्हणजे जणू माझे डोळेच बनले आहेत. मित्र म्हणत असतात कीं ' तुमचें डोकें देखील नकाशाचेंच बनलेलें आहे. '

पावणेदोनशें मैलांच्या या प्रवासांत आम्ही अमेरिकेंतले गांव, खेडीं, तिथलीं

लहान लहान सुंदर घरें, त्यांत रहाणारी सुदृढ जनता वगैरेंचें चांगलें दर्शन करून घेतलें. कांहीं कांहीं ठिकाणीं मुद्दाम मुख्य रस्ते सोडून आडवाटेने कच्च्या रस्त्यांवर जाऊन भारतांतल्यासारखा देखील थोडाबहुत अनुभव घेतला आणि दोन प्रहरीचे चार वाजण्यापूर्वींच नायगराला पोहोंचलों.

नायगराच्या धबधब्याचें दर्शन होण्यापूर्वी त्या धबधब्याच्या वेगानें वीज तयार करून तिच्या मदतीनें चालविले जाणारे अनेक कारखाने आम्ही पाहिले होते. या कारखान्यांमुळें त्या देशाची संपत्ति वाटेल तेवढी वाढत असो, त्यांचें दर्शन माझ्यासारख्या निसर्ग-प्रेमी माणसाला कांहीं करूं शकलें नाहीं.

वॉशिंग्टनलाच आमच्या अनुभवी मित्रांनीं आम्हांला सांगून ठेवलें होतें कीं नायगराच्या दर्शनाला जातांना मधें एक राजकीय कटकट उपस्थित होत असते. त्याची व्यवस्था करूनच पुढें गेलें पाहिजे. युनायटेड स्टेट्स व कॅनडा या दोन देशांमध्यें नायगरा नदी वहात असते. ही नदीच बरेंचसें या दोन देशांमध्ये सरहद्दीचें काम करीत असते. पासपोर्ट, व्हिसा वगैरे सर्व व्यवस्था केली तर एक पूल ओलांडून अमेरिकेहून कॅनाडाला जातां येतें. भारतीय नागरिकांना कॅनाडासारख्या कॉमनवेल्थ देशांत जाण्यासाठीं व्हिसा लागत नसतो. नायगरा–धबधब्याचें सौंदर्य अनुभवायचें असेल तर कॅनाडाच्या बाजूनेंच तो पाहिला पाहिजे. यांत कोणतीच अडचण येत नाहीं. परंतु ज्या पुलावरून आपण जातों त्याच पुला-वरून परत येऊन अमेरिकेंत प्रवेश करण्यासाठीं अमेरिकन व्हिसा घेतल्याशिवाय चालायचें नाहीं. कायदेशीरपणें व्हिसा मिळवायला किती दिवस लागतील, सांगतां यायचें नाहीं. म्हणून पूल ओलांडण्याअगोदरच जाण्या-येण्याची खास परवानगी घेऊन ठेवली पाहिजे. अन्यथा तेथेंच अडकून राहण्याची शक्यता आहे.

एवढी पूर्वसूचना आम्हांला मिळाली होती खरी, परंतु नायगराचा धबधबा जवळ येतांच त्याची मेघगर्जना व त्याचें जादूगार दर्शन डोळ्यांत असें कांहीं भरलें कीं बिचारी ती सूचना विस्मृतीच्या कोपऱ्यांत दबून पडली. चि. सरोजनें दबलेल्या आवाजांत विचारलें–' व्हिसाची कांहीं अडचण तर येणार नाहीं ना ? ' परंतु या गोष्टीकडे लक्ष कोण देतो ?

आम्ही पूल ओलांडून कॅनाडाच्या सरहद्दींत प्रवेश केला तेव्हां आम्हांला साक्षात्कार झाला कीं आम्ही तर भलत्याच अडचणींत अडकलों आहोंत ! श्रीमती बर्ट यांनीं याच्या अगोदर नायगराचें दर्शन घेतलें नव्हतें. आम्ही त्यांना

म्हणालें-तुम्ही जाऊन दर्शनांचा आनंद घेऊन या. पुलावरून जेवढें दिसेल तेवढें पाहून आम्ही येथें संतोष मानतों. त्या दोघांनींहि म्हटलें–'हें शक्यच नाहीं. तुम्हांला सोडून आम्ही कोठें जाणार नाहीं, म्हणजे नाहीं.'

प्रश्न सहीसलामत परतण्याचा होता. कॅनाडाच्या लोकांनी लगेच एक छापलेलें सर्टिफिकेट आम्हांला दिलें कीं हीं माणसें कॅनडांत प्रवेश करूं पहात होतीं, परंतु परततांना व्हिसाची अडचण येईल हें पाहून तशींच परत जात आहेत. हें सर्टिफिकेट घेऊन आम्ही पुलावरून परतलों आणि अमेरिकन कचेरींत जाऊन तिथल्या कर्मचाऱ्यांना आम्ही आमची अडचण सांगितली. ते म्हणाले–' तुम्हीं अगोदर आमच्याकडे यायला हवें होतें. आम्ही सर्व सोपें करून दिलें असतें. आतां जरा थांबा. कांहीं मार्ग काढतां येईल कीं नाहीं तें पाहतों.' भल्या इसमानें फोनवरून कॅनडावाल्यांशीं कांहीं बोलणीं केलीं आणि आमचा मार्ग मोकळा झाला. नायगरा धबधब्याचें दर्शन घेण्यासाठीं आम्हीं पूर्ण विश्वासानें कॅनाडाच्या सरहद्दींत प्रवेश करूं शकलों.

एका सरोवरांतून उगम पावून दुसऱ्या सरोवरांत पडणारी एक नदी आम्ही बॅल्जियम कांगोच्या रुआंडाउरूंडी प्रदेशांत पाहिली होती. ती नदी आहे लहानशीच. परंतु दोन मोठ्या पर्वतांमधून वाट काढून ती जेव्हां नाचत, बागडत, उड्या मारीत जाते तेव्हां फारच सुंदर दिसते. त्या नदीचें नांव आहे रूझीई. ती किवू सरोवरांतून उगम पावून विशाल टांगानिका सरोवराला जाऊन मिळते.

नायगरा नदी देखील बफेलो शहराजवळच्या एरी Erie सरोवरांतून उगम पावून बत्तीस मैलांचा प्रवास करून कॅनडाच्या प्रख्यात ऑंटारिओ–Ontario सरोवरांत जाऊन पडते.

हीच नदी पुढें सेंन्ट लॉरेन्ट हें नांव धारण करून किंग्स्टन, मॉंट्रीयल व क्यूबेक सारख्या शहरांची सेवा करीत विशाल व विशालतर होत समुद्राला जाऊन मिळते. न्यू ब्रुन्सविक, नोवास्कोशिया व न्यू फाऊंडलॅंड यांच्यामध्यें या नदीचें जें विशाल आखात बनतें तशा प्रकारची भव्यता क्वचितच दुसऱ्या एखाद्या नदीला मिळत असेल.

बफेलोहून पंचवीस मैलांचा प्रवास करून गेल्यानंतर या नदीच्या भाग्यांत एकशेंसाठ फुटांचा अधःपात आहे. एका चिमुकल्या टापूनें नदीला सांगितलें–

पडायचेंच असेल तर दोन भागांत विभाजित होऊन पड. तिनें मान्य केलें आणि नायगराचे दोन धबधबे झाले. यांत जो मोठा आहे त्याचा कडा अर्ध-चंद्राकार आहे. त्याच्यावरून पडतांना नायगरा नदी नानाप्रकारची शोभा व्यक्त करूं शकते. तिचा दुसरा प्रवाह टापूच्या उजव्या बाजूला वळून पडत असतो. त्याला अमेरिकन फॉल्स हें नांव पडलें आहे. त्याच्या अगोदरच्या चंद्रभागा विभागाला तिथल्या अरसिक लोकांनी Horse shoe falls हें नांव ठेवलें आहे. घोड्याच्या नालाला सौभाग्याचें लक्षण मानणाऱ्या लोकांना आपल्या विश्वविख्यात धबधब्याला Horse-shoe falls म्हणतांना संकोच काय म्हणून वाटावा? अर्धचंद्राकार किंवा नालाकार धबधब्याचा माथा दोन हजार सहाशें फूट विस्तृत आहे. उजव्या बाजूच्या अमेरिकन धबधब्याची रुंदी एक हजार चारशें फूट आहे.

या धबधब्याची एक खुबी अशी आहे कीं नदीचें पाणी एका मोठ्या सरोवरांतून येत असल्यामुळें पाण्यांत माती नाहीं. माती, चिखल सर्व कांहीं वरच्या सरोवरांत राहतें आणि शुद्ध हिरवें पाणी धबधब्याच्या रूपांत कर्पूर-धवल बनतें. नायगराचा धबधबा जगांतला सर्वांत उंच धबधबा तर नाहीच. गिरसप्पाचा जोगचा धबधबा जास्तींत जास्त नऊशें साठ फूट उंच आहे. नुकताच पाहिलेला केचूरचा धबधबा सातशें एकेचाळीस फूट उंच आहे. यांच्यापुढें नायगराच्या एकशेंसाठ फूट उंचीच्या धबधब्याला अर्थ नाहीं. परंतु पाण्याचा एवढा मोठा जथ्था घेऊन पडणारा नायगरासारखा दुसरा धबधबाच नाहीं. निमिषमात्रांत एका सेकंदांत हा धबधबा दोन लक्ष बावीस हजार घनफूट पाणी घेऊन पडत असतो.

या साऱ्या पाण्याच्या अधःपातांतून विजेची संपूर्ण शक्ति तयार करायला गेलों तर ती चाळीस लाख अश्वत्थामा एवढी शक्ति होईल. एवढ्या मोठ्या अधःपाताच्या अंतीं सात मैलांचा प्रवास केल्यानंतर या पाण्याला पुन्हां खालीं पडावें लागतें.

ज्या चंद्राकार कड्यावरून हा धबधबा पडत असतो त्या कड्याचा हिशेब आज त्रेसष्ट वर्षें झालीं व्यवस्थित ठेवला गेला आहे. असें म्हणतात कीं या त्रेसष्ट वर्षांत हा चंद्राकार कडा पाण्याच्या प्रवाहामुळें घासला जाऊन ३३५ फूट मागें सरकला आहे.

हा झाला त्रेसष्ट वर्षांचा हिशेब. परंतु ही नदी या प्रदेशांत किती वर्षां-पासून वाहत असते ? भूस्तरशास्त्राचे विज्ञ म्हणतात कीं एकंदर हिशेब केल्या-नंतर या नदीचें वय कमींत कमी पंचवीस हजार वर्षांचें तरी असलेंच पाहिजे. या नदीविषयींची व तिच्या धबधब्याविषयींची ही सर्व आवश्यक माहिती दिल्यानंतर आतां आपण नदीच्या उन्मादाचें व आपल्या दर्शनानंदाचें वर्णन करायला मोकळे आहोंत.

[ २ ]

ज्या नायगरासंबंधीं अगदीं लहानपणापासून ऐकत आलों होतों, ज्याचें कांहीं वर्णन पुस्तकांत वाचलें होतें व प्रवाश्यांच्या तोंडून ऐकलें होतें, ज्याचे कांहीं फोटोग्राफ ध्यानपूर्वक पाहिले होते आणि ज्याच्या प्रत्यक्ष दर्शनाची आशा या खेपेला व कायमची सोडूनहि दिली होती त्या नायगराला आकंठ–आ-उभयनयन पाहण्याचा क्षण येतांच सर्वप्रथम जी भावना अनुभवली ती धन्यतेचीच होती. दर वर्षी पंधरा वीस लाख लोक ज्याला पाहून कृतार्थ होत असतात, त्यांच्यांत आपण देखील आतां सामील झालों याची धन्यता तर वाटलीच. पण सर्वांत अधिक जो आनंद झाला तो अधःपातांत देखील उल्हास व आनंद प्रगट करणाऱ्या विश्वरूप दर्शनाचाच होय.

पुलावरून अर्धचंद्राकार धबधब्याचें उत्तम दर्शन झालें आणि अमेरिकन प्रपाताचेंहि एका बाजूनें दर्शन घडलें, तेवढ्यांत प्राथमिक संतोष झाला. परंतु आतां अशा आश्वासनमात्र संतोषानें संतोष मानण्याची आवश्यकता राहिली नव्हती. आमचे स्नेही नेडबर्ट पुलाच्या पलीकडे जाऊन आम्हांला डाव्या बाजूनें घेऊन गेले. सुदैवानें तैलवाहनाला ( मोटारीला ) उभें रहावयाला ही एक चांगली जागा सहज मिळाली. अमेरिकेंत मोटारींची संख्या एवढी आहे कीं एका शहरांतून दुसऱ्या शहरांत जाण्याला जरी वेळ थोडा लागला तरी मोटारीला विराम-स्थान शोधण्यासाठीं कित्येकदां कितीतरी पटीनें अधिक वेळ द्यावा लागतो. इथकाहून नायगरापर्यंत १७५ मैलांची धांव काढणाऱ्या मोटारीला आम्ही ‘ भद्रमस्तु ते ’ म्हणून आशीर्वाद दिला आणि पाण्याची विविध लीला पाहण्यासाठीं आलेल्या असंख्य स्त्री-पुरुषांच्या घोळक्यांत सामील झालों. चि.

सरोज व मी एकत्र सर्व शोभा पहात असूं आणि आपल्या आनंदाचा विनिमय करून तो वृद्धिंगत करीत असूं. नेड व मार्जरी ही मंडळी देखील याप्रमाणें आपला सहलीलानंद द्विगुणित करण्यासाठीं स्वतंत्र झाली होती. आनंदाची संपूर्ण अभिव्यक्ति परभाषेंत होऊं शकत नाहीं. त्यामुळें आम्ही एकमेकांपासून वेगळे पडलों हें आम्हांला सोयीचें वाटलें. एवढेंच कीं खास कांहीं बोलायचें झालें तर बोलतां यायचें नाहीं इतकें एकमेकांपासून दूर आम्हीं पडलों नव्हतों.

माझी एक सवय आहे. मी ईश्वराचें दर्शन केवळ मूर्तीत कधीं करत नसतों. मूर्ति पाहिल्यावर जसा मला दर्शनानंद व ध्यानानंद मिळत असतो तसाच आनंद दुसऱ्यांना देखील मिळत असलेला त्यांच्या डोळ्यांत किंवा त्यांच्या चेहऱ्यावर पाहिल्यावांचून माझा दर्शनानंद पूर्ण होत नसतो आणि येथें तर गोरे, काळे, गव्हाळ, पिवळे सर्व प्रकारचे लोक भाषाभेद व जन्मभूमि-भेद विसरून जीवनानंदांत अभेद भावानें तल्लीन होत होते. त्यामुळें होणारी गुदगुली देखील हृदयाला दाबण्याऐवजी धबधब्याच्या तालाशीं समताल होऊन नाचत होती.

आम्ही जरा पुढें गेलों आणि अमेरिकन प्रपातासमोर उभे राहिलों. या प्रपाताचें पाणी चंद्रप्रपाताच्या पाण्याच्या दहाव्या हिस्साएवढें का असेना, त्याची भव्यता यत्किंचित देखील कमी नव्हती. धबधब्याच्या एका बाजूकडल्या अज द्वीपावर—Great Island वर अमेरिकेचा झेंडा हवेंत फडकत होता.

कोणत्याहि धबधब्यांत जेव्हां पाणी पडतें तेव्हां पाहतां पाहतां तें पारदर्शक पाणी पांढरें शुभ्र बनतें. मग जणू पीठ पडत आहे असा देखावा पाहावयास मिळतो. जेथें सूर्यप्रकाश अनुकूल असेल तेथें जणू चांदीचा रस खालीं पडत आहे असा भास होतो. पण पाणी खालीं पडतांना त्याला जें नवें नवें आधण येतें त्यामुळेंच साऱ्या हृदयाचा कैफ किंवा उन्माद चढतो. खरें सांगायचें म्हणजे या नव्या नव्या उकळ्या खालीं उतरत असतात. त्यांच्याकडे लक्षपूर्वक पाहिलें म्हणजे जणूं कवियत्री सृष्टीला नव्या नव्या कल्पना सुचत आहेत असेंच वाटतें. तिच्या हृदयांत नव्या नव्या कल्पनांचे उमाळे फुटत आहेत असें वाटतें. पाण्याच्या धारा जेव्हां एकमेकांवर आदळतात तेव्हां त्यांचा संभ्रम आगळाच असतो. एवढ्या मोठ्या उंचीवरून पाणी खालीं कोसळणें ही कांहीं लहान सहान गोष्ट नव्हे. तें तर त्याचें हवेशीं किंवा हवेच्या विरुद्ध चाललेलें सनातन युद्धच असतें. पाण्यापेक्षां हवा अधिक अहिंसक खरी, पण पडणाऱ्या पाण्याचा

विरोध करतांना ती त्याला पिंजारते, त्यामुळें पाण्याच्या धारेचे प्रथम थेंब बनतात. थेंबांचे जलकण बनतात. जलकणांतून तुषारबिंदु बनतात आणि नंतर हवेंतला गारठा वाढल्यावर त्या बिंदूंचें व्यक्तित्व नष्ट होऊन धुकें बनतें आणि जणू वाफेनें आपला स्वभावच बदलून टाकला असावा अशाप्रकारें त्याचें ढग बनून वर उडूं लागतात. हे ढग देखील वरून पडणाऱ्या नव्या नव्या धारांशीं लढण्याचा आनंद सोडीत नाहींत. परिणामतः धबधब्याचें मस्तक व त्याची शेंडी स्पष्ट दिसते. परंतु त्याच्या पायाचें नख कधीच कुणाला दिसलें नाहीं. कोणी एखाद्यानें जर म्हटलें कीं 'मी धबधब्याचें नखशिखान्त दर्शन घेतलें' तर तें चुकीचें होईल. धबधब्याच्या पायांजवळ तर नेहमी गार ढगच खेळत असतात.

जेथें धबधबा असतो तेथें कोठून कोणास ठाऊक, जगांतले सगळे पक्षी येऊन राहतात. हे द्विजगण निसर्गाकडूनच धबधब्याचें व्याकरण शिकून घेतात. म्हणून त्यांना धबधब्याची भीति वाटत नाहीं. धबधब्याच्या आजूबाजूला ते उडत राहतात. त्याच्या जलबिंदूत आंघोळ करून ताजेतवाने होतात. नाना प्रकाराची वक्रगति व चक्रगति घेऊन नाचत राहतात आणि कवींना समजावून सांगत असतात की, अन्न शोधणें एवढाच कांहीं आमचा व्यवसाय नव्हे. आम्ही ज्या-प्रमाणें फुलांचा अनुनय करतों त्याचप्रमाणें हवेंत व तुषारांत स्नानानंद व पोहण्यानंद यांचाही आस्वाद घेत असतो. आणि जेव्हां हा आनंद पोटांत मावत नाहीं तेव्हां आम्हीं गीतांच्या मार्फत तो हवेंत सोडून देतों. त्यानें देखील समाधान झालें नाहीं तर आम्हीं आमची किलबिल सुरू करतों. आणि अशा प्रकारें आम्ही आमची व्याकुळता सुसह्य करून घेतों.

ही झाली द्विजगणांची गोष्ट. परंतु सूर्याचीं किरणें देखील या बिंदूंशीं आद-ळून छिन्नभिन्न होतात. पण त्यामुळें उद्विग्न होण्याऐवजी तीं एक विशाल सप्तवर्णी इंद्रधनुष्य पसरवून म्हणायला लागतात, 'हा आनंद तर आगळाच आहे' आकाशांतील इंद्रधनुष्यें निसर्गाचे अतिथी असल्यामुळें त्यांचें आगमन निश्चित नसतें. त्यांचें जेव्हां दर्शन होईल तेव्हा होईल. आमंत्रण दिल्यानें इंद्र-धनुष्य आकाशांत उभें रहात नाहीं. परंतु जेथें धबधबा असतो तेथें इंद्रधनुष्याचें दर्शन अखंड होत असतें. नाहीं, नाहीं, चुकलों इंद्रधनुष्य नेहमीं दिसतें खरें, परंतु अखंड नव्हे. तुषाराचे ढग जेथें वाढतात तेथें इंद्रधनुष्य दिसतें. ढग बाजूला सरकले म्हणजे इंद्रधनुष्य खंडित होतें. पण त्याला पुन्हा प्रगट व्हायला वेळ

लागत नाहीं. धुकें जर वाढलें आणि चहूंबाजूंस पसरलें तर इंद्रधनुष्याबरोबर प्रतिधनुष्य देखील स्पष्ट दिसतें.

अमेरिकन प्रपातासमोर जेव्हां आम्हीं उभे होतों तेव्हां इंद्रधनुष्याची शोभा पूर्णपणें विकसित होऊं शकली नव्हती. जेव्हां आम्हीं चंद्रप्रपाताच्या बाजूनें अमेरिकन प्रपात पाहूं लागलों तेव्हां इंद्रधनुष्याचें संपूर्ण वैभव प्रगट झालें. अमेरिकन प्रपाताच्या खालीं एका बाजूला अनेक प्रकारचे दगड आहेत, हे दगड प्राचीन ऋषीप्रमाणें अखंड स्नान करीत राहतात. परंतु त्यांच्या डोक्यावर शेवाळ जमत नाहीं.

अरे, पण हें काय? त्या अमेरिकन प्रपाताकडे हे बौद्ध-भिक्षु आपले पिवळे चीवर पांघरून कुठें चालले? इतके भिक्षु आले तरी कोठून? मी नेडना विचारलें. ते म्हणाले त्या बाजूला पोहणाऱ्या लोकांना वाचविण्यासाठीं जे सेवक नियुक्त करण्यांत आले आहेत त्यांचा गणवेश पिवळा असतो. हे बौद्ध भिक्षु नव्हेत. ते कसलेले अमेरिकन पोहणारे आहेत. भ्रमनिरास झाला आणि आम्ही सर्व हंसलों व नंतर त्या धबधब्याकडे अगदीं जवळ नेणाऱ्या लोखंडाच्या जिन्याकडे आम्हीं पाहूं लागलों. आमच्याकडे वेळ असता तर आम्ही देखील तेथे जाऊन स्वर्गारोहणाचा थोडा आनंद लुटला असता

एखादा गात असलेला पक्षी पाहून जेव्हां आपण त्याच्याजवळ जातों तेव्हां तो आपल्याला पाहून संकोचानें किंवा भीतीनें गाणें बंद करतो. एखादें नाचणारें बागडणारें मूल पाहून जेव्हां आपण त्याच्याजवळ जातों तेव्हां तें आपली विश्रब्ध लीला सोडून कुतूहलानें आपल्याकडे पहात राहतें. धबधब्याचें असें नसतें. अनेक देशांतील हजारों स्त्री-पुरुषांचे डोळे त्या प्रपात-युगलाकडे लागलेले असतांना देखील त्याची आनंदसमाधि नष्ट-भ्रष्ट होत नाहीं. लक्षावधि क्युसेक पाण्याच्या या पडण्या बागडण्याला आपण समाधि कशी म्हणायची याचें कोणी आश्चर्य करूं नये. समाधीची अचल प्रतिष्ठा इथल्या अखंड गतींत देखील दिसते. निवांत ठिकाणीं दीप-ज्योति जशी अनिङ्ग रहाते त्याचप्रमाणें पाण्याचा अमोघ ओघ क्षणाक्षणाला फेंकणाऱ्या या प्रपाताकडे एकसारखा पहात राहिलों म्हणजे तो देखील अनिङ्ग आहे असें वाटल्यावाचून रहात नाहीं. निसर्गाची ही खरो-खर अद्भुत लीला आहे. एवढ्या दुर्दान्त वेगांत देखील ती एक प्रकारची आनंद-समाधि निर्माण करूं शकते.

आम्ही चालत चालत चंद्रप्रपाताच्या जवळ गेलों. चंद्राच्या तिन्ही बाजूंचें पाणी खालीं एकत्र आल्यामुळें तेथें तर एक प्रकारचा जणू जलप्रलयच होत असतो. नदीचें शांत पाणी वेगांत सांपडून जेव्हां वरून खालीं पडतें तेव्हां तेथें त्याचा रंग अगदींच हिरवा–हिरवा वाटत असतो. जेव्हां धबधब्याच्या पाण्यांत पावसामुळें माती मिसळते तेव्हां पाण्याचा स्रोत वर मळलेला दिसतो. खालीं उतरतां उतरतां त्याच्यांत पांढरा-पिवळा रंग निर्माण होतो आणि दोन प्रहरांच्या प्रकाशांत त्याचा रंग अगदीं सोन्याप्रमाणें चमकूं लागतो. पाण्याची ही खुबी आम्ही सर्वप्रथम आफ्रिकेंतील थींका प्रपातांत पाहिली होती. त्याचेंच सुवर्ण-वैभव पाहण्याचें भाग्य नुकतेंच ब्रिटिश गियानांतल्या कांतारांत पोटारो नदीच्या केचूरच्या धबधब्यांत मिळालें होतें. येथें नायगरामध्यें, वर सांगितल्याप्रमाणें, नदीचें पाणी एका सरोवरांतून येत असल्यामुळें माती, चिखल वगैरे सर्व सरोवर आपल्या पोटांत ठेवतें आणि आपलें विशुद्ध पाणी वरून सोडतें, त्यामुळें इथल्या धबधब्यामध्यें निर्मलता सघन होते आणि त्याचा निळा-हिरवा रंग आपली सात्त्विक शोभा प्रगट करतो. कापूर रगडल्यानें जसें पांढरें चूर्ण हातांत येतें त्याचप्रमाणें पाणी छिन्न-भिन्न केल्यानें कर्पूर-धवलिया निर्माण होत असतो. याची शोभा गोव्याच्या दूधसागरांतच पाहिली पाहिजे. अशाच प्रकारचे धवल रंगाचे मोठमोठे गठ्ठे बघायचे असल्यास नायगराच्या या धबधब्यांत पाहिले पाहिजे. हे गठ्ठे वरून खालीं पडतांच तुटतात आणि त्यांच्यांतला वायुमय पांढरा रंग ढगांचें रूप धारण करून वर उडतो आणि चहूंबाजूंस आपला शीतल आशीर्वाद सर्वांना देऊं लागतो.

आम्ही चालत चालत चंद्रप्रपाताच्या माथ्यापर्यंत जाऊन पोहोंचलों. तेथें पाणी निर्मळ नील रंगानें वाहात होतें आणि तें बरेंचसें खोल असून देखील प्रवाहाखालचे सर्व दगड आम्ही सहज पाहूं शकत होतों. येथें देखील पाण्याची शोभा पाहण्यासाठीं आम्ही जेवढे द्विपाद जमलों होतों तेवढेच सपक्ष द्विजगण देखील जमले होते. फरक एवढाच कीं आम्ही किनाऱ्यावरून पहात होतों. ते पाणच्या प्रवाहावर हवेंत पोहत पाहत होते. आम्हांला त्यांचा हेवा वाटायचा. त्यांना आमच्या संबंधीं काय वाटत असेल, त्यांनाच ठाऊक !

जेव्हां पाण्याचा पडदा वरून खालीं पडतो तेव्हां त्याच्यामागें जाऊन त्याची शोभा पाहण्याचें व त्या पडद्यांतून बाहेरचा प्रकाश कसा येतो हें पाहण्याचें

कुतूहल माणसाला अवश्य होत असतें. एका मुनीला वेरूळ-एलोराच्या गुंफेच्या जवळील वेळगंगेच्या धबधब्याची शोभा पडद्यामागें बसून पाहण्याचें सुचलें. त्यानें भिंतींत एक गुंफा खोदून त्यांत ध्यानाला बसण्याची जागा तयार केली. नायगराच्या धबधब्यामागें जाण्याचें माणसाला सुचलें नसतें तरच आश्चर्य म्हणायचें येथें अमेरिकन लोकांनीं एक बोगदा Tunnel खोदून प्रवाहाच्या मागें जाण्याचा रस्ता बनविला आहे. फी देणाऱ्याला आंत नेऊन ती सर्व शोभा दाखविण्याची व्यवस्था तेथें करण्यांत आली आहे. आमच्याकडे देण्यासाठीं पैसे होते. पण आमचें समयदारिद्र्य सर्वांत मोठें होतें. म्हणून आम्ही आमचे मनोरथ नायगरांत विलीन करून दुसऱ्या प्रकारचा आनंद अनुभवण्याचा विचार केला.

जेथून आम्ही आलों होतों त्या बाजूला जाऊन एका छोट्या पहाडी रेल्वेच्या मदतीनें खालीं पाण्याच्या प्रवाहापर्यंत जाऊन आम्ही एक स्टीमलँच घेतली. तिचें नांव देखील किती काव्यमय होतें !–Maid of the Mist! म्हणजे तुषारबाला ! तिच्यांत बसतांच प्रत्येक प्रवाशाला चामड्याचा एक-एक झगा देण्यांत आला. बरोबर डोकें झांकायला एक कानटोपीहि होती. जेव्हां ही नाव आम्हांला घेऊन प्रतीप गतीनें धबधब्याच्या बाजूनें गेली तेव्हां जणूं आम्ही यमराजाच्या तोंडांतच प्रवेश करीत आहोंत असें वाटायला लागलें. दोन बाजूला निसर्गाच्या उंच उंच भिंती, एका बाजूला अमेरिकन प्रपात आणि दुसऱ्या बाजूला पाण्यांतून वीज निर्माण करणारें यंत्रघर. येथून इंद्रधनुष्याची शोभा देखील बदलली. आम्ही पुढें गेलों आणि पाहतां पाहतां ‘ धार ’ धुवांमध्यें अडकलों. तुषारवर्षा गुदगुल्या करूं लागली. जेथें पहावें तेथें पाणी आणि पाण्याच्या कोसळणाऱ्या भिंती, हिंमत चालेपर्यंत आमची नाव पुढें जात राहिली. आतां तर आम्ही चंद्राकाराच्या मध्यें येऊन पोहोंचलों. याच्यापुढें गेलों असतों तर जलसमाधि मिळाली असती. धबधब्याची जलसमाधि पाहणें निराळें आणि धबधब्याच्या खालीं जहाजांतून जाऊन जलसमाधि घेणें निराळें. येथें रोज येणाऱ्या हजारों प्रवाशांपैकीं एकाची देखील अशा प्रकारें जलसमाधि घेण्याची इच्छा नव्हती. जीवनानंद मिळवून वाटेल तेवढा संतोष होवो, जीवनाचें जीवनांतच विसर्जन करण्याचा विचार तर ‘ मनुष्याणाम् सहस्रेषु कश्चित् ’ लाच व्हायचा. सुरक्षित राहून धबधब्याच्या उत्पातांत जेथपर्यंत जातां

येणें शक्य होतें तेथपर्यंत जाऊन आम्ही परतलों. या अनुभवाचें स्मरण रहावें म्हणून नाववाल्यांनीं आम्हांला नावेचें एक चित्र भेट दिलें. आम्हां सर्वांच्या चेहऱ्यावर धन्यतेचा आनंद तर तरळत होताच. परंतु या आनंदाचे सहभागी अनेकानेक प्रसन्न मानवांचें दर्शन देखील कमी आल्हादक नव्हतें. आम्ही यात्रेचा गणवेश अंगावरचा काढला. लगेच तो हा अनुभव घेण्याची इच्छा असलेल्या दुसऱ्या यात्रेकरूंनीं उत्साहानें धारण केला. जुने कपडे सोडून नवे कपडे जीव कसे धारण करतो याचा उल्लेख गीतेंत आला आहे. येथें तर एक जीव भाड्यानें घेतलेला झगा काढतो तर तो दुसरा जीव लगेच धारण करतो. याला परकाया प्रवेश देखील म्हणतां यायचें नाहीं. कारण ही काया कुणाचीच नसते. नुसती भाड्याची गोष्ट. दिवसांतून किती लोक हे झगे वापरत असावेत व काढत असावेत, कोण जाणे !

झगा आम्ही काढला पण जो आनंद मिळविला होता तो उतरण्याचा प्रश्न नव्हता. त्याची मस्ती घेऊनच आम्ही पहाडी ट्रेनमध्ये जाऊन बसलों आणि आमच्या तैलवाहनाजवळ गेलों.

तैलवाहनांत आम्ही चौवेजण होतों. परंतु आतां चौवेहि एक-एकटे झालों होतों. आपआपल्या आनंदाचें चर्वण करीत असतांना गोष्टी करण्याची कुणालाच इच्छा झाली नाहीं. 'मन मस्त हुवा, फिर क्यों बोले ?' त्याच दिवशीं या प्रकृतिमातेच्या विभूतीचा आनंद जर लिहायला बसलों असतो तर लिहू शकलों नसतों. आणि आज जेव्हां इतक्या दिवसांनंतर लिहायला बसलों आहे तेव्हां ती आनंद-विभूति पूर्णपणें उपस्थित होत नाहीं. हिला तर अनुगीताच म्हटलें पाहिजे. इथका प्रपातापासून ज्या अनुभव-परंपरेला सुरवात झाली तिची परिसीमा जलयात्रेंत झाली आणि तिचें चिंतन–मनन अमेरिकेच्या रस्त्यावर नायगराहून बफेलोपर्यंतच्या पंचवीस मैलांच्या प्रवासांत चाललें. त्या चिंतनांत सूर्यकिरणांचे तंतु विणले गेले; त्याच्यामध्यें आमचे आतिथ्यशील स्नेही नेड व मार्जेरी यांच्या प्रेमाची किनार साऱ्या स्मृति-पटलाला उठावदार करीत राहिली.

नायगराला अर्पण केलेल्या या श्रद्धांजली बरोबर भगिनी निवेदिता यांचा खालील उतारा जोडणें सर्वथैव उचित होईल—

"कुठल्याहि स्थानाच्या रमणीयतेनें जेव्हां भारतीयाला आकृष्ट केलें आहे तेव्हां त्यानें लगेच त्या स्थानाचें धार्मिक रूपांतर करून टाकलें आहे. भारताचें

हृदय जेव्हां एखादें अद्‌भुत, रमणीय किंवा भव्य दृश्य पाहतें तेव्हां लगेच त्याला वाटतें कीं गाय जशी वासराला बोलावते तसा येथें परमात्मा जीवात्म्याला हांक मारतो आहे. नायगराचा धबधबा जर हिंदुस्थानांत गंगेच्या प्रवाहांत असता तर इथल्या जनतेनें त्याचें वातावरण कसें बनवून टाकलें असतें ! आमोद-प्रमोदाच्या किंवा पिकनिकच्या टोळ्यांऐवजी किंवा रेल्वेच्या प्रवाशांऐवजी धबधब्याची पूजा करण्यासाठीं वार्षिक किंवा मासिक यात्रेकरूंच्या टोळ्याच येथें जमल्या असत्या, भोगविलासाचीं सर्व साधनें उपलब्ध करून देणाऱ्या हॉटेलांच्या ऐवजी धबधब्याच्या काठावर किंवा त्याच्या मधोमध उमाळ्याने भरून आलेली भक्ती ओतण्यासाठीं मोठमोठीं मंदिरें बांधलीं गेलीं असतीं. सृष्टीचें वैभव पाहून भडक ऐषआराम किंवा शानशौकत यांच्या ऐवजीं लोकांनीं येथें तप केलें असतें आणि एवढ्या प्रचंड शक्तीला माणसाच्या फायद्यासाठीं किंवा सुखचैनीसाठीं पकडून ठेवण्याचें सुचण्याऐवजी त्याला निसर्गाशीं ऐक्य अनुभव करणाऱ्या मस्तींत भैरवजपाबरोबर पाण्याच्या प्रवाहांत स्वतःचा जीवनप्रवाह मिसळवून देण्याची गोष्ट सुचली असती. स्वभावभिन्नतेंत काहीं बाकी राहतें काय ? ”

१९५८

ग्रंथसंग्रहालय
ज. क्र. ९८९२९
[redacted]
[redacted]
[redacted]

REFBK-0018129